म. ग्रं. सं. ठाणे
विषय इतिहास
ग्रं. नं. ३५
सन १९१८




# महायुद्धाचा संक्षिप्त इतिहास

REFBK-0001670

...त १२ आणे

XFORD · · UNIVERSITY · · PRESS

[illegible]: নভেম্বর ১৯

सन १९१९

# महायुद्धाचा संक्षिप्त इतिहास

जे. नेल्सन फ्रेजर यांच्या "The World at War"

या पुस्तकाचे आधारें


रा. द. रानडे, एम्. ए.

यांनीं तयार केलें



REFBK-0001670



HUMPHREY MILFORD
OXFORD UNIVERSITY PRESS
BOMBAY

1919

Printed by M. N. Kulkarni, at his Karnatak Printing Press,
No. 434, Thakurdwar, Bombay

ग्रंथ संग्रहालय
नं. ३२०
नं. ........

# प्रस्तावना

प्रस्तुतचें लहान पुस्तक नेल्सन फ्रेजर यांच्या "The World at War" या पुस्तकाचे आधारानें लिहिलें आहे. मूळ पुस्तकांत बऱ्याच सुधारणा केल्या आहेत व युद्धांतील आजपर्यंतच्या सर्व गोष्टींचा उल्लेख प्रस्तुतच्या पुस्तकांत केला आहे. "न भूतो न भविष्यति" अशा प्रकारचा संग्राम जो गेलीं चार वर्षें आपण पाहिला, त्याची माहिती आपल्या शाळांतील सर्व विद्यार्थ्यांस असणें अत्यंत जरूरीचें असल्यानें त्याची संकलित माहिती आपल्या विद्यार्थ्यांस मिळावी अशा उद्देशानें हें पुस्तक लिहिण्यांत आलें आहे. ज्या ज्या प्रांतांत मराठी भाषा बोलली जाते त्या सर्व प्रांतांतल्या शाळांतील विद्यार्थ्यांनीं या पुस्तकाचा अभ्यास करणें अवश्य आहे. या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तींत आजकाल जो तह होऊं पहात आहे त्याचा उल्लेख केला जाईल, व तहानंतर जी परिस्थिति उद्भवेल त्याचेंही दिग्दर्शन करणें अवश्य होईल.

हें पुस्तक तयार करण्याचे कामीं रा. रा. फफे, शाळामास्तर, ट्रेनिंग कॉलेज, पुणें, यांची मजला फार मदत झाली आहे.

फर्ग्युसन कॉलेज, पुणें
१।६।१९१९

रा. द. रानडे.

ग्रंथ संग्रहालय

# अनुक्रमणिका


| | | विषय | पृष्ठ |
|---|---|---|---|
| प्रकरण | १ | जर्मनी व ऑस्ट्रिया ... ... ... | १–२६ |
| ” | २ | फ्रान्स, बेल्जम व इटली .... ... ... | २६–३४ |
| ” | ३ | पूर्व यूरोप ... ... ... ... | ३४–४६ |
| ” | ४ | ब्रिटिश साम्राज्य ... ... ... | ४६–५३ |
| ” | ५ | आणीबाणीचा समय ... ... ... | ५४–६२ |
| ” | ६ | आधुनिक शस्त्रें व युद्धपद्धति ... ... | ६२–८३ |
| ” | ७ | जलयुद्ध ... ... ... ... | ८३–९३ |
| ” | ८ | जमिनीवरील युद्ध ... ... ... | ९३–१२४ |
| ” | ९ | युद्धनीति ... ... ... ... | १२४–१३० |
| ” | १० | ब्रिटन आणि ब्रिटिश साम्राज्य यांमधील युद्धकालीनपरिस्थिति ... ... | १३०–१३८ |
| ” | ११ | हिंदुस्थान आणि प्रस्तुत महायुद्ध ... ... | १३८–१४६ |
| ” | १२ | युद्धाचा शेवट व भावी परिणाम ... ... | १४६–१५५ |

१६७०

श्री ग्रंथ संग्रहालय
सं. इ. नं. ३२०
ता. २०/१/५८

# महायुद्धाचा संक्षिप्त इतिहास

## भाग पहिला

### पूर्वेतिहास

प्रकरण पहिलें

### जर्मनी व ऑस्ट्रिया

जर्मन लोकांचा उल्लेख अगदीं प्रथमतः रोमन इतिहासकारांनीं दोन हजार वर्षांपूर्वी केला आहे. “ जर्मन ” हें नांव त्यांनीं सर्वसाधारणपणें ऱ्हाईन, डॅन्यूब व व्हिस्टयुला या नद्यांमधील प्रदेशांत राहणाऱ्या सर्व लोकांस दिलें होतें.

रोमन इतिहासकारांच्या मतें हे लोक अगदीं रानटी होते. ते फार मदिरालोलुप होते पण तसेच लढवय्येही होते; आणि जरी ग्रीक आणि रोमन लोकांप्रमाणें विद्या व कला यांचा त्यांनीं अभ्यास केला नव्हता, तरी गायन-वादन-विद्येंत त्यांनीं कांहींसें प्रावीण्य मिळविलें होतें. ते ज्या प्रदेशांत रहात होते तो प्रदेश दलदलीचा असून तेथें मोठीं अरण्यें होतीं पण शहरें मात्र मुळींच नव्हतीं.

रोमन लोक जर्मनांचे वैरी होते तरी रोमन लेखकांनीं जर्मनांचे गुण जाणले होते. जर्मनांचें धैर्य, त्यांची स्वामिभक्ति व त्यांचें युद्धप्रेम यांचें त्यांनीं कौतुकच केलें आहे. त्यांच्या बायका पतिनिष्ठ व विनयशाली होत्या आणि त्या पुरुषांशीं बरोबरीच्या नात्यानें वागत असत.

जर्मनांच्या रक्तामध्यें संमिश्रण फारसें झालेलें नसल्यानें त्यांच्या स्वभावामध्येंही आजपर्यंत फारसा फरक झालेला नाहीं. दोन हजार वर्षांपूर्वी जे त्यांचे गुण व अवगुण होते तेच हल्लीं बहुतांशीं त्यांच्या स्वभावांत आढळून येतात.

ख्रिस्ती शकापूर्वी शंभर वर्षांमागें रोमन व जर्मन लोकांच्या कलहास सुरवात झाली, व जर्मन लोकांच्या निकराच्या हल्ल्यांपासून आपला बचाव करणें हें रोमन लोकांस फार कठीण जाऊं लागलें. परंतु जेव्हां रोमन लोकांचा मोठा सेनापति ज्यूलियस सीझर यानें इ. स. पूर्वी ५५ या वर्षी गॉल ह्मणजे हल्लींचा फ्रान्स देश काबीज केला, तेव्हां तो ऱ्हाईन नदी उतरून जर्मन लोकांच्या मुलुखावर चाल करून गेला, व त्यानें आपल्या युद्धकौशल्यानें जर्मन लोकांचा पूर्ण पराभव केला. तथापि जर्मन लोकांवर आपला ताबा त्यानें पूर्णपणें प्रस्थापित केला असें म्हणतां येणार नाहीं. रोमन लोकांस त्रास देऊन त्यांस सतावून सोडण्याची एकही संधि जर्मनांनीं वायां जाऊं दिली नाहीं; व जरी रोमन लोकांस गॉल देशाचें पूर्णपणें आधिपत्य मिळालें, तरी ऱ्हाईन नदीच्या पूर्वेकडील प्रदेशावर त्यांचा ताबा फार दिवस चालला नाहीं आणि जर्मन लोक पूर्वीप्रमाणेंच स्वतंत्र राहिले.

ख्रिस्ती शकाच्या पहिल्या दोन शतकांमध्यें रोमन राज्याचा अतिशयच उत्कर्ष झाला. पश्चिमेस अटलांटिक महासागरापासून तों पूर्वेस युफ्रेटीस नदीपर्यंत आणि उत्तरेस डॅन्यूब नदीपासून तों दक्षिणेस सहाराचे अरण्यापर्यंत रोमन लोकांची सत्ता अबाधित रीतीनें चालूं लागली. या सर्व विस्तृत प्रदेशावर रोमन लोकांच्या सुधारणेचा अंमल बसला व जेथें तेथें रोमन लोकांच्या कायद्याप्रमाणें राज्यकारभार चालूं लागला. तथापि कालपरत्वें रोमन लोकांच्या सत्तेचा ऱ्हास होऊं लागला, व रोमच्या राज्याचीं दोन शकलें झाल्यानें त्यांचें सामर्थ्य कमी झालें.

रोमन लोकांच्या पश्चिमेकडील राज्याची रोम हीच राजधानी राहिली, परंतु पूर्वेकडील राज्याची कॉन्स्टँटिनोपल ही राजधानी झाली. या संधीचा फायदा जर्मन लोकांनीं घेतला. ते रोमन लोकांच्या पश्चिमेकडील राज्यावर तुटून पडले व त्यांचा पुरा नायनाट होईपर्यंत त्यांनीं आपल्या स्वाऱ्या थांबविल्या नाहींत.

ही पश्चिमराज्यावरील स्वारी पूर्णपणें यशस्वी होण्यास इ. स. २०० पासून तों ६०० पावेतों अवधि लागला, व या कार्यांत बऱ्याच जर्मन टोळ्यांनीं पुढाकार घेतला. त्यांपैकीं हल्लीं आपल्यास एकाच टोळीचा म्हणजे फ्रँक लोकांचा उल्लेख करणें जरूर आहे. या फ्रँक लोकांनीं गॉल देश कांबीज केला, व त्यांनीं त्यास आपलें नांव दिलें. तेव्हांपासून गॉल हा देश "फ्रान्स" या नांवानें प्रसिद्ध झाला. या फ्रँक लोकांच्या राजांपैकीं शार्लमान या नांवाचा राजा फार प्रसिद्ध होऊन गेला. रोमन राज्यावर प्रथमतः स्वारी करणारे जर्मन लोक जरी रानटी होते तरी शार्लमान राजाच्या वेळेस रोमन लोकांच्या सुधारणेची खरी किंमत त्यांस कळूं लागली व तिचें ते अनुकरणही करूं लागले. शार्लमान राजास स्वतः रोमन लोकांच्या सुधारणेबद्दल इतका आदर असे कीं त्यास जणूं कांहीं आपण पूर्वींचेंच रोमन राज्य पुढें चालवीत आहों असा अभिमान वाटे. आपल्या राज्यास रोमन राज्य अशीच त्यानें संज्ञा दिली आणि या वेळेस जर्मन लोकांनीं ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला होता म्हणून त्यानें आपल्या राज्यास "पवित्र रोमन राज्य" असें नांव दिलें, व ख्रिस्ती धर्माचा अध्वर्यु जो पोप त्याचे हातून आपणास राज्याभिषेक करून घेतला. सर्व यूरोपखंडांत जे मोठे राजे होऊन गेले त्यांमध्यें शार्लमान ह्याची गणना होते. त्यानें जेथें तेथें सुराज्य स्थापून शिक्षणाचा व धर्माचा प्रसार केला.

शार्लेमानची राज्यव्यवस्था "फयूडल सिस्टिम" या नांवानें प्रसिद्ध आहे. या व्यवस्थेप्रमाणें राजाकडून लष्करी नोकरीबद्दल स्वामिभक्त सेनापतींस जहागिरी देण्यांत येत असत व या सेनापतींनाही आपापल्या जमिनीच्या विस्ताराच्या मानानें युद्धाचे वेळीं कमीजास्त सैनिकांसह राजास मदत करावी लागे. लढाईचा हुकूम आल्याबरोबर प्रत्येक मनुष्यास वरिष्ठाकडून मिळालेल्या जमिनीबद्दल व त्याकडून झालेल्या आपल्या संरक्षणाबद्दल लढाईस जावें लागे. या पद्धतीप्रमाणें प्रारंभीं राज्यकारभार बरा चालला. परंतु कांहीं दिवसांनीं या पद्धतीचे वाईट परिणाम दिसून येऊं लागले. ज्या सरदारांस जहागिरी मिळाल्या होत्या ते फार दुष्ट रीतीनें वर्तन करूं लागले व आपल्या प्रजेस लुबाडूं लागले. परस्परांच्या जहागिरी बलात्कारानें हस्तगत करून घेण्यांत त्यांचा सारा वेळ जाऊं लागला आणि त्यांनीं आपल्या उर्मट कृत्यांनीं प्रत्यक्ष राजास सुद्धां कित्येक वेळीं संकटांत आणिलें.

शार्लेमान राजा इ. स. ८१४ मध्यें वारला. त्याच्या मरणानंतर लवकरच त्याच्या मोठ्या राज्याचे बरेच विभाग झाले. फ्रान्सदेश स्वतंत्र होऊन त्यावर फ्रेंच राजे राज्य करूं लागले. जर्मन देशाचे बरेच तुकडे झाले व प्रत्येक तुकड्यावर एक एक स्वतंत्र राजा राज्य करूं लागला. हे राजे जरी वस्तुतः स्वतंत्र होते तरी ते बहुमतानें आपल्यापैकींच एकास आपला सम्राट् म्हणून निवडीत असत. अशा निवडलेल्या सम्राटांपैकीं कित्येक सम्राट् युद्धविशारद होते. त्यांनीं पुष्कळदां आल्प्स पर्वत ओलांडून इटलीवर आपला ताबा बसविण्याचा प्रयत्न केला. परंतु या सुमारास म्हणजे इ. स. ८०० पासून १००० पर्यंतच्या अवधींत इटलीमध्यें जिनोआ, वेनिस व फ्लॉरेन्स या नांवाचीं मोठीं व बलाढ्य शहरें निर्माण झाल्यानें जर्मन सम्राटांस तीं पादाक्रांत करितां येईनात. शिवाय पोपही या जर्मन राजांच्या विरुद्ध जाऊं लागले.

एकंदरींत या मध्ययुगांत* जर्मन लोकांच्या राज्याचें पाऊल जर्मनी-बाहेर पडलें नाहीं व एखादा जर्मन राजा निर्बल ठरल्यास त्याचें खुद्द जर्मन राष्ट्रामध्येंही विशेष वर्चस्व रहात नसे.

पुढें ख्रिस्ती शकाच्या तेराव्या शतकाच्या शेवटीं हाप्सबुर्ग घराण्याचा उदय होऊन जर्मन राष्ट्रास नवीन जोम आला. हाप्सबुर्ग हें नांव या घराण्यास स्वित्झर्लंडमधील एका लहान खेड्यावरून पडलें, व या घराण्याच्या ताब्यांत त्या खेड्या सभोंवतींचा प्रांतच काय तो होता. या घराण्यांतील कांहीं पुरुषांचे त्यांच्या लग्नांमुळें उत्कृष्ट संबंध जोडले गेल्यानें त्यांना नवीन प्रांत मिळवितां आले. अशा रीतीनें स्पेन, हॉलंड व बेल्जम हे देश हाप्सबुर्ग घराण्याच्या ताब्यांत येऊन सम्राट् पांचवा चार्ल्स याच्या ताब्यांत शार्लेमान याच्या ताब्यांत असलेल्या मुलुखाइतका मुलूख आला. या पुढें हाप्सबुर्ग घराण्यांतूनच सम्राट् निवडून येऊं लागले व त्यांची राजधानी व्हिएन्ना हें एक मोठें संपन्न, दाटवस्तीचें, आणि मोठ्या भरभराटीचें शहर होऊन बसलें.

पांचव्या चार्ल्सच्या मरणानंतर स्पेन देश जर्मन राष्ट्रापासून अलग झाला. खुद्द जर्मनीमध्येंच सम्राटाची सत्ता डळमळूं लागली व अंत:कलहामुळें त्या देशास उतरती कळा लागली. चार्ल्स राजा जिवंत असतांनाच मार्टिन ल्यूथर यानें ख्रिश्चन धर्माची सुधारणा करण्याच्या उद्देशानें पोपची सत्ता झुगारून दिली होती. त्याच्या अनुयायांस प्रॉटेस्टंट म्हणत. या कलहामध्यें सर्व जर्मन संस्थानिक सामील

---

*इ. स. ८०० च्या अगोदरचा तीन शतकांचा काल युरोपिअन इतिहासांत " तमोयुग " अगर "अज्ञानकाल" या नांवानें प्रसिद्ध आहे. त्यावेळीं यूरोपमध्यें विद्येचा ऱ्हास झाला. ज्यास " मध्ययुग " म्हणतात तो काल म्हटला म्हणजे शार्लेमानानंतरचा सरासरी सात शतकांचा काल होय. ज्या कालास " आधुनिक युग " म्हणतात त्याचे प्रारंभीं मुद्रणकला अस्तित्वांत आली, ग्रीक वाङ्मयाचा अभ्यास होऊं लागला, व अमेरिकेचा शोध इत्यादि गोष्टी घडून झाल्या.

झाले. कांहींनीं पोपची तर कांहींनीं धर्मसुधारकांची बाजू उचलली व त्यामुळें इ. स. १६१८ पासून इ. स. १६४८ पर्यंत तीस वर्षें त्यांच्यामध्यें घनघोर युद्ध झालें. या युद्धांत दोन्ही बाजूचे लोकांनीं निर्दयपणाची कमाल केली, व जेव्हां युद्धाचा शेवट झाला तेव्हां जर्मन राष्ट्र अत्यंत क्षीण व कंगाल बनलें.

हाप्सबुर्ग घराण्यांतील पुरुषांनीं जर्मन बादशाहा हाच किताब कायम ठेविला, परंतु या बादशहाची किंमत जवळ जवळ एकाद्या संस्थानिकाइतकीच होती. ऑस्ट्रिया देशाच्या बाहेर याच्या सत्तेस कोणीही जुमानीतनासे होऊन उत्तर जर्मनींतील संस्थानिकांनीं आपलें स्वातंत्र्य पुकारलें. खुद्द आस्ट्रियामध्यें देखील बादशाहाची फार हीन स्थिति झाली. यूरोपच्या पूर्वेस तुर्क लोक प्रबल होऊन त्यांनीं कॉन्स्टँटिनोपल काबीज केलें व डॅन्यूब नदीपर्यंत चाल केली. एका बाजूस तुर्कांस थोपवून धरण्यांत व दुसऱ्या बाजूस पोलंडच्या लोकांच्या स्वाऱ्यांचा प्रतिकार करण्यांत ऑस्ट्रियन बादशहा इतका चूर झाला कीं त्यास जर्मनींतील लहान संस्थानिकांच्या भानगडींत पडण्यास मुळींच वेळ सांपडला नाहीं.

या लहान संस्थानांपैकींच प्रशिया हें एक संस्थान असून त्याचें सामर्थ्य हळू हळू वाढत चाललें. मध्ययुगामध्यें नांव घेण्याजोगी कोणतीच कामगिरी या संस्थानानें केली नव्हती. या संस्थानांतील जमिनी नापीक होत्या, व तेथें खनिज द्रव्यांचाही अभाव होता. शिवाय या संस्थानास समुद्रकिनाराही नव्हता. यामुळें शेतीनें किंवा व्यापारानें या संस्थानाची भरभराट होण्याचा संभव नव्हता. परंतु या संस्थानचे बरेच अधिपति प्रबळ आणि दीर्घोद्योगी निपजल्यामुळें एके काळीं चिमुकलें असलेलें हें प्रशियाचें संस्थान पुढें जर्मन साम्राज्यसत्तेचें केंद्रस्थान बनलें. या राजघराण्याचा मूळपुरुष होहेनझोलर्न या गांवीं रहात असल्यानें हें घराणेंही त्याच नांवानें प्रसिद्ध आहे.

या होहेनझोलर्न घराण्यापैकीं फ्रेडरिक दि ग्रेट या नांवाचा एक मोठा उत्साही आणि कर्तबगार राजा अठराव्या शतकाच्या मध्याचे सुमारास होऊन गेला. याच्यामुळेंच प्रशिया हें संस्थान पुढें सरसावलें. यानेंच प्रथम प्रशियन लोकांना बाहेरचे प्रांत जिंकण्यास लाविलें, व लढाईतील आपल्या विजयांमुळें त्यानें प्रशियास युरोपांतील प्रबल राष्ट्रांच्या जोडीस आणून बसविलें. इ. स. १७४० मध्यें जेव्हां ऑस्ट्रियाच्या बादशहाच्या मरणानंतर त्याची कन्या मराया थेरिसा गादीवर बसली, तेव्हां फ्रेडरिक राजानें न्यायान्यायाची पर्वा न करितां संधि साधून ऑस्ट्रियाच्या राज्यांतील सायलीशिया या नांवाचा एक सधन प्रांत बळकाविला. मराया राणी फार धीराची बायको असल्यानें तिनें फ्रान्सशीं सख्य जोडून प्रशियाविरुद्ध युद्ध पुकारलें. या युद्धांत फ्रेडरिकचा पुष्कळदां पराजय झाला व त्याचे अतिशय सैनिक मारले गेले; तरी त्याचें युद्धकौशल्य इतकें होतें कीं त्यानें आपल्या राज्याचा नाश होऊं दिला नाहीं; इतकेंच नव्हे तर सायलीशिया प्रांतही त्यानें आपले ताब्यांत राखिला. फ्रेडरिक यानें आपलें राज्य चांगल्या रीतीनें चालविलें. तो मोठा मेहनती, न्यायी, काटकसरीनें वागणारा व धोरणी राजा होता. त्यानें ललितकला व विद्या यांच्या अभ्यासास उत्तेजन दिलें व विद्वान् लोकांच्या सहवासांत आपला फुरसतीचा वेळ घालविणें त्यास फार आवडत असे. समरांगणावर फ्रेंचांना जरी तो आपले शत्रु मानीत असे तरी फ्रेंच पंडितांस तो आपल्या दरबारांत पाचारण करी.

अठराव्या शतकाच्या शेवटीं फ्रान्समध्यें एक मोठी राज्यक्रांति घडून आली. जमीनदार व राजे यांच्या जुलमानें फ्रेंच लोक शेंकडों वर्षेंपर्यंत गांजून गेले होते. शेवटीं ही छळणूक त्या लोकांस असह्य होऊन त्यांनीं बंड उभारलें. राजशाहीचा व तिजबरोबर लष्करी नोकरी-

झाले. कांहींनीं पोपची तर कांहींनीं धर्मसुधारकांची बाजू उचलली व त्यामुळें इ. स. १६१८ पासून इ. स. १६४८ पर्यंत तीस वर्षें त्यांच्यामध्यें घनघोर युद्ध झालें. या युद्धांत दोन्ही बाजूचे लोकांनीं निर्दयपणाची कमाल केली, व जेव्हां युद्धाचा शेवट झाला तेव्हां जर्मन राष्ट्र अत्यंत क्षीण व कंगाल बनलें.

हाप्सबुर्ग घराण्यांतील पुरुषांनीं जर्मन बादशाहा हाच किताब कायम ठेविला, परंतु या बादशहाची किंमत जवळ जवळ एकाद्या संस्थानिकाइतकीच होती. ऑस्ट्रिया देशाच्या बाहेर याच्या सत्तेस कोणीही जुमानीतनासे होऊन उत्तर जर्मनींतील संस्थानिकांनीं आपलें स्वातंत्र्य पुकारलें. खुद्द आस्ट्रियामध्यें देखील बादशाहाची फार हीन स्थिति झाली. यूरोपच्या पूर्वेस तुर्क लोक प्रबल होऊन त्यांनीं कॉन्स्टँटिनोपल काबीज केलें व डॅन्यूब नदीपर्यंत चाल केली. एका बाजूस तुर्कांस थोपवून धरण्यांत व दुसऱ्या बाजूस पोलंडच्या लोकांच्या स्वाऱ्यांचा प्रतिकार करण्यांत ऑस्ट्रियन बादशहा इतका चूर झाला कीं त्यास जर्मनींतील लहान संस्थानिकांच्या भानगडींत पडण्यास मुळींच वेळ सांपडला नाहीं.

या लहान संस्थानांपैकींच प्रशिया हें एक संस्थान असून त्याचें सामर्थ्य हळू हळू वाढत चाललें. मध्ययुगामध्यें नांव घेण्याजोगी कोणतीच कामगिरी या संस्थानानें केली नव्हती. या संस्थानांतील जमिनी नापीक होत्या, व तेथें खनिज द्रव्यांचाही अभाव होता. शिवाय या संस्थानास समुद्रकिनाराही नव्हता. यामुळें शेतीनें किंवा व्यापारानें या संस्थानाची भरभराट होण्याचा संभव नव्हता. परंतु या संस्थानचे बरेच अधिपति प्रबळ आणि दीर्घोद्योगी निपजल्यामुळें एके काळीं चिमुकलें असलेलें हें प्रशियाचें संस्थान पुढें जर्मन साम्राज्यसत्तेचें केंद्रस्थान बनलें. या राजघराण्याचा मूळपुरुष होहेनझोलर्न या गांवीं रहात असल्यानें हें घराणेंही त्याच नांवानें प्रसिद्ध आहे.

या होहेनझोलर्न घराण्यापैकीं फ्रेडरिक दि ग्रेट या नांवाचा एक मोठा उत्साही आणि कर्तबगार राजा अठराव्या शतकाच्या मध्याचे सुमारास होऊन गेला. याच्यामुळेंच प्रशिया हें संस्थान पुढें सरसावलें. यानेंच प्रथम प्रशियन लोकांना बाहेरचे प्रांत जिंकण्यास लाविलें, व लढाईतील आपल्या विजयांमुळें त्यानें प्रशियास युरोपांतील प्रबल राष्ट्रांच्या जोडीस आणून बसविलें. इ. स. १७४० मध्यें जेव्हां ऑस्ट्रियाच्या बादशहाच्या मरणानंतर त्याची कन्या मराया थेरिसा गादीवर बसली, तेव्हां फ्रेडरिक राजानें न्यायान्यायाची पर्वा न करितां संधि साधून ऑस्ट्रियाच्या राज्यांतील सायलीशिया या नांवाचा एक सधन प्रांत बळकाविला. मराया राणी फार धीराची बायको असल्यानें तिनें फ्रान्सशीं सख्य जोडून प्रशियाविरुद्ध युद्ध पुकारलें. या युद्धांत फ्रेडरिकचा पुष्कळदां पराजय झाला व त्याचे अतिशय सैनिक मारले गेले; तरी त्याचें युद्धकौशल्य इतकें होतें कीं त्यानें आपल्या राज्याचा नाश होऊं दिला नाहीं; इतकेंच नव्हे तर सायलीशिया प्रांतही त्यानें आपले ताब्यांत राखिला. फ्रेडरिक यानें आपलें राज्य चांगल्या रीतीनें चालविलें. तो मोठा मेहनती, न्यायी, काटकसरीनें वागणारा व धोरणी राजा होता. त्यानें ललितकला व विद्या यांच्या अभ्यासास उत्तेजन दिलें व विद्वान् लोकांच्या सहवासांत आपला फुरसतीचा वेळ घालविणें त्यास फार आवडत असे. समरांगणावर फ्रेंचांना जरी तो आपले शत्रु मानीत असे तरी फ्रेंच पंडितांस तो आपल्या दरबारांत पाचारण करी.

अठराव्या शतकाच्या शेवटीं फ्रान्समध्यें एक मोठी राज्यक्रांति घडून आली. जमीनदार व राजे यांच्या जुलमानें फ्रेंच लोक शेंकडों वर्षेंपर्यंत गांजून गेले होते. शेवटीं ही छळणूक त्या लोकांस असह्य होऊन त्यांनीं बंड उभारलें. राजशाहीचा व तिजबरोबर लष्करी नोकरी-

बद्दल जहागिरी देण्याच्या पद्धतीचाही त्यांनीं शेवट लाविला. राजाचा व राणीचा शिरच्छेद करून त्यांनीं लोकांच्या स्वातंत्र्याची दवंडी पिटविली. हा राजक्रांतीचा वणवा सगळीकडे पसरेल अशा भीतीनें यूरोपांतील बहुतेक सर्व राजांनीं फ्रेंच लोकांच्या लोकसत्ताक राज्याविरुद्ध शस्त्र उचललें.

अशा रीतीनें फ्रेंच व जर्मन लोकांत युद्ध सुरू झालें. परंतु नेपोलियनचा उदय होईपर्यंत फ्रेंच लोकांस म्हणण्यासारखा जय मिळाला नाहीं. नेपोलियनच्या नेतृत्वाखालीं मात्र फ्रेंच लोक अजिंक्य झाले. ऑस्ट्रिया देश जरी नेपोलियनच्या विरुद्ध होता तरी त्यानें प्रारंभीं प्रशियाशीं सहकारित्व केलें नाहीं. कारण त्याच्या स्मृतींतून सायलीशियाचें प्रकरण अद्यापि गेलें नव्हतें. आपल्या समाईक शत्रूविरुद्ध एकमेकांशीं प्रेमभावानें वागूं लागण्यास ऑस्ट्रिया व प्रशिया यांस बराच वेळ लागला. मध्यंतरीं उभयतांचाही एकामागून एक असा पराजय करून फ्रेंचांनीं आपल्या प्रांताची मर्यादा ऱ्हाईन नदीपलीकडे नेली. आणि नेपोलियननें प्रशियन सैन्याच्या संख्येस मर्यादा घालून त्यांच्या राज्यामधून मनसोक्त लूट नेली.

इतकें झालें तरी प्रशियाच्या राजानें आपलें धैर्य खचूं दिलें नाहीं. तो उत्तम प्रकारचें एक कार्यक्षम सैन्य तयार करण्याच्या तयारीस लागला. नेपोलियनच्या हुकुमाप्रमाणें त्यास कांहीं एका विवक्षित संख्येच्या बाहेर सैनिक ठेवितां येईनात. ह्मणून त्यानें असा विचार केला कीं, जर या सैनिकांस कांहीं वेळ पूर्णपणें लष्करी शिक्षण देऊन नंतर त्यांस रजा दिली व त्यांचे ऐवजीं तितकेच नवे सैनिक तयार केले तर तहाचीं कलमें न मोडतां आपल्या प्रजेपैकीं बरेच लोक युद्धविशारद असे सैनिक बनतील. या पद्धतीप्रमाणें एकसमयावच्छेदानें पुष्कळ लोक सशस्त्र न राहिल्यामुळें लष्करी खर्चामध्येंही काटकसर करितां येते. शिवाय, युद्धाचें शिक्षण मिळवून परत गेल्यानंतर आपापले धंदे

चालवून लोकांस राष्ट्राचे संपत्तींत भर टाकितां येते. अशा रीतीनें लष्करी शिक्षण मिळवून परत शेतकीमध्यें, व्यापारामध्यें, अगर नाना प्रकारच्या हुन्नरकलांमध्यें जे लोक पडतात त्या लोकांस त्या देशाचे शिलकी फौजेंतील शिपाई असें म्हणतात. कारण, ज्या वेळेस जरूर लागेल त्या वेळेस सरकारास या लोकांस लढाईकरितां बोलावितां येतें. प्रशियन राजानें घालून दिलेली लष्करी शिक्षणाची ही पद्धति पुढें यूरोपांतील बहुतेक सर्व राष्ट्रांनीं उचलली.

नेपोलियनच्या अपकर्षाचा काळ लौकरच येऊन ठेपला. त्यानें कुरापती काढून इंग्लंड, प्रशिया, ऑस्ट्रिया, रशिया वगैरे यूरोपखंडांतील बहुतेक सर्व देशाच्या राजांस आपले शत्रु बनविले होते. रशियावरील स्वारीमध्यें त्याचें फार मोठें सैन्य नाश पावलें. पुढें ऑस्ट्रियन लोकांनीं प्रशियन राजाशीं सहकारिता केली व शेवटीं इंग्लंड व प्रशिया यांनीं केलेल्या समाईक प्रयत्नानें नेपोलियनचा भाग्यरवि वॉटर्लूच्या रणभूमीवर इ. स. १८१५ सालीं अस्तास गेला.

या युद्धानंतर यूरोपांतील राष्ट्रांचे प्रतिनिधि तहाचे वाटाघाटीकरितां व्हिएन्ना येथें एकत्र जमले. त्यांनीं युद्धापूर्वी ज्या राजाचे जे प्रांत होते ते त्यास बहुत करून परत दिले. या योजनेप्रमाणें पुष्कळ लोक परकी अमलाखालीं पुन: येतील याचा त्या प्रतिनिधिमंडळानें विचार केला नाहीं. उदाहरणार्थ, ऑस्ट्रियास त्यांनीं इटलीचा एक भाग दिला. बिचाऱ्या पोलंडास तर त्यांनीं मुळींच न्यायानें वागविलें नाहीं व अठराव्या शतकांत ऑस्ट्रिया, प्रशिया व रशिया यांमध्यें पोलंड देश त्रिखंड विभागिलेला होता तो तसाच राहिला. प्रशियाचे राजास बराच मुलूख मिळाला व त्यांतच त्यास जर्मनीच्या उत्तरभागांतील हांबुर्ग नांवाचें एक मोठें बंदर मिळालें.

वरील योजनेनें यूरोपांतील राजे थोड्या बहुत प्रमाणानें खूष झाले असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु त्यांच्या प्रजांचीं मनें मात्र मुळींच संतुष्ट

झालीं नाहींत. फ्रान्सच्या राज्यक्रांतीनंतर सर्व लोकांस स्वातंत्र्याची चव लागली होती. परंतु प्रशिया व ऑस्ट्रिया या देशाचे राजे प्रजासत्ताक राज्यपद्धतीच्या विरुद्ध होते. आपल्या प्रजेस राज्यकारभारासंबंधी हक्क देण्याऐवजीं त पूर्वीपेक्षां ज्यास्त स्वच्छंदवर्ती मात्र झाले.

या वेळीं जर्मनींत सर्वत्र शांतता नांदत होती. आणि कांहीं वेळपावेतों जर्मन लोक म्हणजे शांतताप्रिय लोक आहेत असें सर्वांस वाटूं लागलें. पिण्यास दारू व ऐकण्यास गाणें मिळालें कीं ते लोक संतुष्ट असत. शिवाय राजा व अधिकारिवर्ग फारसा जुलुमी नसला म्हणजे कोणत्याही पद्धतीनें त्यांच्यावर राज्य चालविलें जावो, त्याची त्यांस विशेष मातब्बरी नसे. अशा प्रकारची आरामप्रियता बव्हेरियांतील व इतर दक्षिण भागांतील संस्थानच्या लोकांमध्यें विशेषेंकरून दिसत होती. ज्या वेळीं नेपोलियननें प्रशिया व ऑस्ट्रिया हे देश पादाक्रांत केले त्या वेळीं या लोकांस स्वदेशभक्तीचा फारसा उमाळा आला नाहीं, इतकेंच नव्हे तर त्यांनीं नेपोलियनास द्रव्यद्वारा व सैन्यद्वारा मदत केली.

प्रशियामधील जर्मन लोक मात्र अशा प्रकारचे नव्हते. त्यांच्यामध्यें वीरश्रीचें वारें खेळत होतें, व दुसऱ्या लोकांची कुरापत काढण्यांत त्यांचा हातखंडा असे. त्यांचा पुढारी प्रसिद्ध प्रिन्स बिस्मार्क हा होय. प्रिन्स बिस्मार्क हा एक लोकोत्तर पुरुष होऊन गेला. शरीरानें हा धिप्पाड व खंबीर होता. हा जेव्हां आपल्या तरुणपणीं कॉलेजमध्यें होता तेव्हां त्यानें बाहुयुद्धामध्यें मोठें प्रावीण्य संपादिलें होतें. त्यानें मरेपर्यंत आपला करडेपणा व करारीपणा सोडला नाहीं. शारीरिक शक्ति, मनाचा दृढ निश्चय, योग्य लोक निवडून काढण्याची शैली, विलक्षण कल्पकता, व पुढाऱ्याच्या अंगीं लागणारे इतर सर्व आवश्यक गुण बिस्मार्कमध्यें पूर्णपणें वसत होते. त्यानें एकदां एकादी गोष्ट मनांत आणिली कीं कितीही संकटें आलीं तरी

ती साध्य केल्याशिवाय तो राहत नसे. व आपला बेत सिद्धीस जाण्यास एकादे वेळीं जुलूम करावा लागला अगर कावेबाजपणा लढवावा लागला तरी तो कचरत नसे. जर्मनीमध्यें प्रशियास अग्रस्थान मिळवून देण्याचा व प्रशियाच्या राजास जर्मनीचा बादशाहा बनविण्याचा त्यानें विडाच उचलला होता. लोकसत्ताक राज्यानें राष्ट्र दुबळें होतें अशी त्याची कल्पना होती. व राष्ट्राचा पूर्णपणें अभ्युदय होण्यास अनियंत्रित सत्ता ज्याच्या हातीं आहे व ज्यास प्रबल व राजनिष्ठ सैन्याचें पाठबळ आहे अशा कार्यक्षम राजाचीच जरूरी आहे असें त्याचें मत होतें.

बिस्मार्कचा अभ्युदय इ. स. १८४८ मध्यें झाला. याच वेळीं यूरोप खंडाचे पुष्कळ भागांत पुनः राज्यक्रांती घडून आल्या व याच वेळीं ऑस्ट्रिया व हंगेरी* यांच्यामध्यें कलहास सुरवात झाली. त्या कलहाचा परिणाम असा झाला कीं ऑस्ट्रियन बादशाहास हंगेरियन लोकांना स्वराज्य देणें भाग पडलें. बिस्मार्क हा त्या वेळीं प्रशियन राजाचा मुख्य प्रधान होता. ऑस्ट्रियाच्या राज्यास उतरती कळा लागली आहे हें पाहतांक्षणींच जर्मन लोकांचें मुख्य ठिकाण ऑस्ट्रिया

---

* ऑस्ट्रियाच्या उत्तर भागाकडे असलेल्या विस्तीर्ण सपाटीच्या प्रदेशाला हंगेरी हें नांव आहे. ख्रिस्ती शकाच्या दहाव्या शतकांत तुर्क जातीच्या एका टोळीनें आशियामधून येऊन तेथें ठाणें दिलें. पुष्कळ वर्षें झटापट करून हे लोक शेवटीं ऑस्ट्रियन लोकांच्या सत्तेखालीं गेले. यांच्या टोळीचें नांव मग्यार असें होतें. ख्रिस्ती शकाच्या चौथ्या शतकामध्यें पूर्वेकडून यूरोपांत टोळधाडीप्रमाणें आलेले रानटी हूण लोक यांचा मग्यार लोकांशीं अगर जर्मन लोकांशीं कांहीं संबंध नाहीं. हल्लीं कधींकधीं जर्मन लोकांस वर्तमानपत्रकर्ते ''हूण'' ही संज्ञा देतात. परंतु हें नांव चुकीचें असून जर्मन बादशाहावरच या नांवाची जबाबदारी आहे. त्यानें चिनी लोकांविरुद्ध सैन्य पाठविलें तेव्हां त्यास, "चिनी लोकांशीं इतक्या निर्घृणतनें वागा कीं तुम्हांस ते हूणच समजतील" असें सांगितलें होतें. हल्लींच्या युद्धामध्यें बऱ्याच वेळेस हूण लोकांइतकीच निर्घृणता जर्मन लोकांनीं दाखविली आहे.

नसून प्रशिया आहे असें सिद्ध करून दाखविण्याची त्यास उत्कंठा लागली. त्यानें श्लेस्विगहॉल्ष्टाइन* या नांवाच्या वसाहतीबद्दल ऑस्ट्रियाशीं कुरापत काढिली. हा प्रांत ज्या वेळीं बिस्मार्क यानें हिरावून घेतला त्या वेळीं तो डेन लोकांच्या ताब्यांत होता. ऑस्ट्रियाच्या ताब्यांत त्या वेळींही उत्तर जर्मनीपैकीं कांहीं प्रांत होते. ऑस्ट्रियन बादशाहानें आपल्या संमतीवांचून जर्मनीस श्लेस्विग प्रांताचा ताबा घेतां येणार नाहीं, असें जाहीर केलें. यास बिस्मार्क थोडीच भीक घालणार होता! त्यानें ऑस्ट्रियाविरुद्ध युद्ध पुकारलें, व कांहीं आठवडे जातात न जातात तोंच त्यानें ऑस्ट्रियास इतकें चीत केलें कीं ऑस्ट्रियन लोकांस उत्तर जर्मनींतून आपला पाय पूर्णपणें माघारा घ्यावा लागला. ही गोष्ट इ. स. १८६६ सालीं घडली.

बिस्मार्क हा फार धोरणी असल्यानें तो येथेंच थांबला. त्यानें ऑस्ट्रियास ज्यास्त दुखविलें नाहीं. प्रशियाचें लवकरच फ्रान्सशीं युद्ध जुंपण्याचा प्रसंग येईल व तसा आल्यास आपलें ऑस्ट्रियाशीं शत्रुत्वाचें नातें राहिल्यानें आपल्यास फार कठीण जाईल हें तो जाणून होता. याच वेळीं फ्रान्सलाही पूर्ववत् जोम आला होता. फ्रान्सचा राजा तिसरा नेपोलियन हा जर्मनीवर चाल करण्याच्या विचारांत आहे असें बिस्मार्क यास कळून आलें. या बातमीनें त्याचें धैर्य खचून गेलें नाहीं, इतकेंच नव्हे तर उलट त्यास मोठा आनंदच झाला, आणि त्यानें मोठ्या शिताफीनें नेपोलियनास युद्धांत खेचलें. प्रशियाचें सैन्य फ्रान्सच्या सैन्यापेक्षां इतकें जास्त होतें कीं, फ्रान्सविरुद्ध मिळणाऱ्या जयांत जर प्रशियानें पुढाकार घेतला तर जर्मनींतील इतर संस्थानें प्रशियाचें स्वामित्व सहज कबूल करतील असें त्यास खात्रीनें वाटलें. फ्रेंच लोक

---

* सुप्रसिद्ध कील कालवा श्लेस्विगहॉल्ष्टाईनमधून जातो. या कालव्यामुळें उत्तरसमुद्र बाल्टिक समुद्राशीं जोडला गेला आहे.

मोठ्या निकरानें लढले. परंतु त्यांच्या सेनापतींच्या ढोबळ चुकांमुळें त्यांस अपयशाचा वांटा पतकरावा लागला. तिसरा नेपोलियन हा सेडन येथें शत्रूस शरण गेला. फ्रान्सची राजधानी जें पॅरिस शहर त्यास जर्मनांनीं वेढा दिला व तें त्यांनीं हस्तगत करून घेतलें. शेवटीं फ्रेंचांस लढाईबद्दल तीनशें कोटी रुपये खंडणी द्यावी लागली व शिवाय आल्सेस व लॉरेन हे प्रांत जर्मनांना द्यावे लागले. अशा रीतीनें इ. स. १८७१ सालीं या लढाईचा शेवट झाला.


आल्सेस व लॉरेन या दोन प्रांतांबद्दल आपणांस थोडीशी माहिती असणें जरूर आहे, कारण हे प्रांत जर्मनांच्या हस्तगत झाले हें प्रस्तुत युद्धाचें एक मोठें कारण होय. फार पुरातन काळापासून या प्रांतांचा इतिहास पाहिला असतां आपणांस असें आढळून येईल कीं, हे प्रांत कधीं फ्रेंचांच्या तर कधीं जर्मनांच्या ताब्यांत जात आले आहेत. फ्रान्स व जर्मनी या देशांस विभागणारी अत्यंत जुनी सीमा म्हणजे ऱ्हाईन नदी होय. मध्ययुगामध्यें जर्मनांनीं आपल्या प्रांताचा विस्तार त्या नदीच्या पश्चिमेस केला पण सतराव्या शतकामध्यें हे प्रांत पुन्हां फ्रेंचांच्या हातीं आले. यामुळें आल्सेस व लॉरेन या प्रांतांमध्यें राहणाऱ्या लोकांची भाषा व वागणूक अगदीं फ्रेंच लोकांच्याप्रमाणें झाली. तिसऱ्या नेपोलियनच्या पराजयानंतर ते प्रांत जर्मनांच्या ताब्यांत पुनः आले तेव्हां त्या प्रांतांतील लोकांस बरेच हाल सोसावे लागले. गेलीं चाळीस वर्षें आल्सेस व लॉरेन हे प्रांत जर्मनांच्या ताब्यांत होते तरी त्यांस तेथील लोकांची प्रीति संपादितां आली नाहीं. जर्मनांस याचें वाईट तर वाटत नव्हतेंच पण उलट त्यांनीं या प्रांतांवर होईल तितका करडा अंमल चालविला होता.

फ्रेंचांवर जय मिळविल्यानंतर जर्मनीमधील संस्थानांनीं त्या वेळचा प्रशियाचा राजा जो पहिला वुइल्यम त्यास जर्मनीचा बादशहा म्हणून

निवडिलें. व या बादशहाच्या मदतीस सर्व संस्थांनांतून निवडलेल्या प्रति-निधींच्या एका सभेची योजना करण्यांत आली. या सभेच्या सल्लयानेंच परराष्ट्रांशीं व्यवहार करण्याचें ठरलें. शिवाय जकातीचे व सर्व जर्मन देशाच्या हिताहिताचे प्रश्नही या सभेकडे सोपविण्यांत आले. युद्ध करण्याचा अखत्यार मात्र एकटया बादशहाकडे ठेवण्यांत आला. प्रत्येक लहानशा संस्थानांत स्थानिक लोकनियुक्तांची एक सभा स्थापन करण्याचें ठरलें. आणि पोलिस, शिक्षण, इत्यादि स्थानिक प्रश्न सोडविण्याची मुभा त्या त्या संस्थांनांकडेच देण्यांत आली. जर्मनीमध्यें निरनिराळ्या संस्थानिकांस व बादशहास सल्लामसलत देण्याकरितां स्थानिक व वरिष्ठ सभा स्थापन करण्यांत आल्या तरी ब्रिटिश पार्लमेंटच्या हातांत जितकी सत्ता आहे तितकी सत्ता या सभांना केव्हांच नव्हती. लोकांच्या किंवा लोकप्रतिनिधींच्या मतास तेथील साम्राज्याच्या कारभारामध्यें फारसें कोणी विचारीत नसे.

ऑस्ट्रियामध्यें व तसेंच जर्मनीमध्यें सरकारी अधिकाऱ्यांना राज्य-व्यवस्थेचे बाबतींत अनियंत्रित अधिकार असत. अशा स्थितींत सुद्धां तेथील अधिकारी प्रामाणिक व वाकबगार असल्याकारणानें राज्यव्यवस्था सुयंत्रितपणें चाले ही मोठ्या सुदैवाची गोष्ट होय. जर्मनीमधील आगगाड्या व तारायंत्रें हीं सर्व सरकारच्या सत्तेखालीं आहेत व त्यांची व्यवस्थाही चांगली ठेविली जाते. जर्मन लोकांचीं शहरें फार स्वच्छ व सुंदर असून त्यांत रमणीय उद्यानें व उत्कृष्ट पदार्थसंग्रहालयें असतात. आपण जर्मनीमध्यें जेथें जेथें जावें तेथें तेथें पदोपदीं या लोकांना आपल्यास कोणतें कार्य करण्याचें आहे व तें कशा तऱ्हेनें करावें याची पूर्ण जाणीव असल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें.

वर ज्या सद्गुणाबद्दल प्रशंसा केली आहे तो गुण जर्मन लोकांच्या स्वभावांत पूर्वी इतका प्रामुख्यानें वसत नव्हता. जरी जर्मनांनीं



बर्लिन—कॅथेड्रलचा सामान्य देखावा

गायनवादनविद्येंत व काव्यरचनेंत प्रावीण्य मिळविलें होतें, तरी ते लोक विशेष व्यवहारचतुर नाहींत व इतर युरोपियन राष्ट्रांपेक्षां सामाजिक उन्नतीमध्यें ते फार मागें आहेत अशी एकोणिसाव्या शतकाचीं पहिलीं पंचवीस वर्षें होतपावेतों लोकांची कल्पना होती. फ्रेंचांवर विजय मिळविल्यानंतर आपल्या देशाची भौतिक सुधारणा घडवून आणण्याचा जर्मनांनीं आटोकाट प्रयत्न केला. कित्येक नवीन उद्योगधंद्यांत तर जर्मन कारखान्यांनीं आज जगांत पहिला नंबर पटकावला आहे. अशा कारखान्यांत क्रुपचे लोखंडी व पोलादी सामान तयार करण्याचे कारखाने व डामरापासून निरनिराळे रंग व औषधें तयार करण्याचे रासायनिक कारखाने यांची प्रामुख्यानें गणना केली पाहिजे. कालपरवांपर्यंत तर सर्व सुधारलेल्या जगाला लहान मुलांचीं खेळणीं पुरविण्याचा मक्ताच जणूं कांहीं जर्मनांकडे होता.

ज्या कारणांमुळें जर्मनांचें या नवीन उद्योगधंद्यांत पुढें पाऊल पडलें, त्या कारणांचा येथें उल्लेख करणें जरूर आहे. ( १ ) पहिलें कारण ह्मटलें ह्मणजे ज्यांच्या योगानें आपला व्यापार वाढेल अशीं नवीन साधनें शोधून काढण्याचें त्यांचें चातुर्य हें होय. उदाहरणार्थ, जरी प्रशियाची जमीन नापीक आहे तरी तींत बटाटे व चुकंदर यांचें पीक चांगल्या रीतीनें करून बटाट्यांपासून मादक पेयें व चुकंदरीपासून साखर तयार करण्याची त्यांनीं कृप्ति काढिली, व हे पदार्थ इतर देशचे व्यापाऱ्यांस विकून त्यांनीं विलक्षण फायदा मिळविला. ( २ ) दुसरें असें कीं जर्मन लोकांनीं शास्त्रीय शोध करून आपले धंदे सुधारण्याचे कामीं विलक्षण बुद्धिमत्ता दाखविली आहे. जर्मन रसायनशास्त्रज्ञांनीं डामराचें पृथक्करण करून त्यापासून असंख्य प्रकारचे रंग व औषधें तयार करितां येतात असें दाखविलें. स्वस्तपणाच्या दृष्टीनें बाजारांत या रंगांशीं टक्कर देण्यास हिंदुस्थानांतील नीळ टिकली

नाहीं व त्यामुळें ती नामशेष झाली आहे. ( ३ ) तिसरें, जर्मन लोकांनीं सर्व प्रकारचीं यंत्रें व विशेषतः विद्युच्छक्तीनें चालणारीं यंत्रें तयार करण्यांत पराकाष्ठेची प्रगति केली आहे. ( ४ ) आणि चौथें, जर्मन लोकांस संघटनेचें खरें रहस्य कळलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. निरनिराळ्या कामांकरितां योग्य लोक हुडकून काढून त्यांस त्या त्या कामाचें शिक्षण देण्याची व ज्यास जें काम उत्तम करितां येईल तेंच त्याजकडे सोंपविण्याची कला त्यांस चांगली साधली आहे.

या उपायांनीं जर्मनांचें अलीकडे बहुतकरून प्रत्येक उद्योगधंद्यांत पुढें पाऊल पडलें आहे. आतां भौतिक उन्नतीपलीकडे विचार करणें झाल्यास आपल्यास असें म्हणतां येईल कीं,जरी अठराव्या व एकोणिसाव्या शतकांत जर्मन लोकांस राजकीय बाबतींत फारच थोडें स्वातंत्र्य होतें, तरी त्यांनीं आपल्या बौद्धिक उन्नतीकडे लक्ष दिलें होतें. त्या वेळीं दुसऱ्या कोणत्याही देशापेक्षां अधिक अध्यापक व संशोधक जर्मन विश्वविद्यालयांतून होते. आणि त्यांमधून असे पुरुष निर्माण झाले कीं त्यांची कवि, तत्त्ववेत्ते, इतिहासज्ञ, किंवा शास्त्रवेत्ते म्हणून सर्व जगभर कीर्ति पसरली.

जर्मनांची भौतिक व बौद्धिक दृष्टीनें बरीच प्रगति झालेली होती हें आपण वर पाहिलेंच आहे. या प्रगतीची सुरवात फ्रान्सशीं युद्ध सुरू होण्याच्या अगोदर झाली व तिची परिपूर्णता युद्धसमाप्तीनंतर झाली. परंतु याच काळांत जर्मनांचें आध्यात्मिक तेज मात्र कमी झाल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. एकेकाळीं जर्मनींत मोठेमोठे धार्मिक लोक होऊन गेले; पण पुढें मात्र तशी स्थिति उरली नाहीं. प्रॉटेस्टंट पंथाचा उत्पादक ल्यूथर हा ज्या देशांत होऊन गेला, त्याच जर्मनींत ख्रिश्चन धर्माची फारशी किंमत राहिली नाहीं. तेथील लोकांचें लक्ष ईश्वरावरून उडून द्रव्यार्जनाकडे लागलें आणि विचित्र मतें प्रतिपादणाऱ्या त्यांच्यांतील कांहीं अर्वाचीन तत्त्ववेत्त्यांचे ते अनुयायी बनले. उ

होण्यास मुख्य कारण म्हटलें म्हणजे त्या देशांत येणारा संपत्तीचा ओघ हें होय. ज्या देशांत संपत्ति वाढते त्या देशांत आध्यात्मिक तेज कमी होतें असा सर्वसाधारण नियम आहे.

अलीकडे जर्मनींत नीच्शे या नांवाचा एक तत्त्ववेत्ता (१८४४—१९०० ) होऊन गेला. त्याच्या मतें नम्रता व दया हे गुण निर्बलतेचे द्योतक होत. जो पुरुष अभिमानी, क्रूर व शक्तिमान् आहे, ज्याच्यामुळें इतरांच्या मनांत भीति उत्पन्न होते, व ज्यास दुसऱ्या लोकांपासून वाटेल ती गोष्ट हिरावून घेतां येते तोच उत्तम पुरुष होय. ज्यांच्याजवळ सामर्थ्य आहे त्यांचे हातींच सत्ता व मत्ता असली पाहिजे अशी त्याची शिकवण आहे.

नीच्शाच्या या मतांत विशेषसें कांहीं नवीन आहे असें नाहीं. परंतु त्यानें या प्रकारचीं विषारीं मतें अशा मोहक पद्धतीनें लोकांपुढें मांडिलीं कीं, तीं जर्मन लोकांस अमृततुल्य वाटलीं. शिवाय हीं मतें जर्मन लोकांच्या उपजत गुणांशीं व भावनांशीं मिळतीं असल्याकारणानें त्यांस त्यांपासून आनंदच झाला. फ्रान्सवर मिळविलेला जय आणि उद्योगधंद्यांत, व्यापारांत, व शास्त्रीय शोधांत आलेलें यश यामुळें अभ्युदयोन्मुख जर्मन राष्ट्रास असें वाटलें कीं, आपणच युरोपियन राष्ट्रांचे अग्रणी होण्यास योग्य आहों व यास्तव सर्व जगानें आपलें प्रभुत्व कबूल केलें पाहिजे.

नीच्शानंतर झालेल्या दुसऱ्या पुष्कळ लेखकांनीं त्याच्या या विलक्षण मतांचा पुरस्कार केला. अशा लेखकांपैकीं ट्राइष्क हा अग्रगण्य होय. हा इ. स. १८७४ पासून १८९६ पर्यंत बर्लिन विश्वविद्यालयांत इतिहासाचा अध्यापक होता. सांप्रतचें युद्ध उद्भवल्याबद्दल जर कोणा एका मनुष्यास जबाबदार धरणें असेल तर तो ट्राइष्क हाच होय. यानें सांप्रतच्यासारख्या मोठ्या युद्धाची उपयुक्तता जर्मन लोकांचे

अंत:करणांत बिंबविण्यासाठीं जे विलक्षण कोटिक्रम लढविले ते त्याच्या ग्रंथांतून आपणांस पहावयास मिळतील.

आतां सारेच जर्मन लोक केवळ दुसऱ्यांस लुटण्यासाठीं लढत होते असें म्हणणें रास्त नाहीं. कारण आपण केवळ स्वसंरक्षणार्थ शस्त्र हातीं घेतलें अशी त्यांपैकीं पुष्कळांची समजूत आहे. स्वसंरक्षणाचे पांघरुणाखालीं दुसरे पुष्कळ उद्देश दडवून ठेविलेले आहेत हें त्यांस वेळींच कळलें असतें तर कदाचित् त्यांनीं हें युद्ध टाळलेंही असतें. जेव्हां त्यांचें फ्रान्सशीं पूर्वीचें युद्ध उपस्थित झालें तेव्हां बिस्मार्क यानें अशी युक्ति लढविली कीं फ्रान्सचा राजा नेपोलियन हा जर्मनीवर हल्ला करण्याच्या बेतांत आहे असें सर्वांस उघड दिसावें. सांप्रतचे युद्धाचे सुरवातीसही जर्मन लोकांची अशी समजूत करण्यांत आली होती कीं इंग्लंड, फ्रान्स व रशिया यांनीं केवळ जर्मनीचा नायनाट करण्यासाठीं एकजूट केली आहे.

आतां जर्मनीमध्यें पुरोगामी लोकांचा जो एक पक्ष आहे, त्याचा तरी खरा उद्देश काय होता हें आपण पाहूं. ज्याअर्थी जर्मन लोकांची झपाट्यानें वाढ होत चालली आहे त्याअर्थी कूपमंडूकांप्रमाणें केवळ जर्मनींतल्या जर्मनींतच आपणांस कोंडून घेऊन राहणें शक्य नाहीं असें त्यांस वाटत होतें. ज्याअर्थी योग्य तें सामर्थ्य आपल्या आंगीं आलेलें आहे त्याअर्थी आपल्या राष्ट्राचा विस्तार करण्याच्या मार्गास लागण्याची वेळ होऊन गेली आहे असेंही त्यांस वाटत होतें. जगामध्यें असे पुष्कळ देश आहेत कीं जेथें अगदीं रानटी व अर्धवट सुधारलेले लोक राहतात; त्या प्रांतांचा ताबा घेऊन सुधारलेल्या जर्मन राष्ट्रानें त्यांचा सदुपयोग करून कां दाखवूं नये? हे देश हस्तगत करून घेत असतांना जर लढाईचा प्रसंग आलाच तर त्यास काय हरकत आहे? राष्ट्राच्या जीवितास युद्धासारखें पोषक द्रव्य नाहीं; त्याच्या योगें लोकांत जोम वाढून राष्ट्रासाठीं स्वार्थत्याग करण्याचें शिक्षण

मिळतें; युद्धांत रक्तपात होणार या भीतीनें ज्यांच्या अंगांत कांपरें भरतें ते लोक अगदीं कुचकामाचे होत; युद्धाविरुद्ध असलीं क्षुल्लक कारणें पुढें करणारे लोक निःसत्त्व व भित्रे समजले पाहिजेत; ज्यांच्या आंगांत पौरुष आहे त्यांना युद्ध म्हणजे देशाच्या अभ्युदयाचें एक साधनच वाटलें पाहिजे, अशीं त्यांचीं मतें होतीं.

बिस्मार्कचीं मतें मात्र याप्रमाणें नव्हतीं. फ्रान्सवर जय मिळविल्यानंतर त्याला आपल्या जीविताची इतिकर्तव्यता झाली असें वाटलें. जर्मन लोक हे यूरोपांतील अग्रेसर लोकांमध्यें गणले गेले म्हणजे पुरे असें त्यास वाटत होतें. फ्रान्सची सूड घेण्याची बुद्धि फार वेळ दबून राहील असें नाहीं, आणि फ्रेंच लोक इतर राष्ट्रांशीं सख्य संपादण्याचा होतां होईतों प्रयत्न करतील हें तो जाणून होता, आणि म्हणून अशा वेळीं जर्मनांचा इतर युरोपियन राष्ट्रांशीं सलोखा राखणें फार अगत्याचें आहे असें त्यास वाटत होतें. आपल्या राष्ट्राच्या वसाहती असाव्यात असा त्यास लोभ नव्हता, व इंग्लंडशीं भांडण काढण्याची त्यास मुळींच इच्छा नव्हती. त्याच्या मताप्रमाणें जर जर्मन लोक वागते तर आजचें अशा प्रकारचें युद्ध आपणांस दिसतें ना. परंतु जर्मन राष्ट्रांतील तरुण पिढीस त्याचा उपदेश रुचला नाहीं व त्यास ज्या मार्गानें जाणें धोक्याचें वाटत होतें तोच मार्ग त्यांनीं स्वीकारिला.

अशा शिरजोर लोकांमध्यें जर्मनीचा विद्यमान बादशहा दुसरा वुइल्यम हा अग्रगण्य होय. हा राज्याधिष्ठित झाल्यावर त्यानें बिस्मार्क यास बडतर्फ केलें व आपल्या कल्पनांप्रमाणें राज्यशकट चालविला. त्याच्या स्वभावांतील बऱ्याच गोष्टी अद्यापि गूढ असल्यानें त्यासंबंधानें येथें थोड्या शब्दांत लिहितां येणें शक्य नाहीं. त्याची कार्यक्षमता अलोट होती, तथापि जर्मन राष्ट्राच्या अत्युच्च ध्येयासंबंधीं त्यानें ज्या चुकीच्या कल्पना करून घेतल्या होत्या त्यांपलीकडे त्यास कांहीं दिसत

नव्हतें. व जर्मन लोकांवर त्याचें इतकें वजन होतें कीं त्यांतील प्रत्येक मनुष्याचें मन त्यानें वश करून घेतलें होतें असें म्हटलें तरी चालेल.

या बादशहाची मुख्य करामत म्हटली म्हणजे त्यानें जर्मन आरमार निर्माण केलें ही होय. जरी फार प्राचीन काळापासून एखादें दुसरें बंदर जर्मनीच्या ताब्यांत होतेंच तरी त्या देशाचें आरमार असें केव्हांच नव्हतें. पूर्वीच्या प्रशिया प्रांतास समुद्रकिनारा मुळींच नव्हता व जरी पुढें त्या देशास हाम्बुर्ग व इतर बंदरें मिळालीं तरी बिस्मार्क यानें आरमार तयार करण्याकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं. परंतु सांप्रतच्या बादशहास असें आढळून आलें कीं, इंग्रज लोकांचें आरमारी सामर्थ्य हेंच त्यांच्या अभ्युदयाचें मूळ कारण होय. व आपलें आरमार असल्याविना इंग्लंडशीं चढाओढ करणें व आपले वसाहतीचे प्रांत राखणें अशक्य आहे. या कारणास्तव त्यानें १८९८ सालीं एक आरमारासंबंधाचा कायदा पास करून घेतला. या कायद्याअन्वयें खर्चाच्या वार्षिक अंदाजपत्रकामध्यें जहाजें बांधण्याकरितां मोठी रक्कम त्यानें मंजूर करून घेतली. जेव्हां इंग्लिश लोक "बे-डर" नांवाचीं मोठमोठीं लढाऊ जहाजें बांधूं लागले तेव्हां इतर राष्ट्रांनाही त्याच तोडीचीं लढाऊ जहाजें बांधण्याची गरज भासूं लागली. या बाबतींतही जर्मन लोक मागें पडले नाहींत. त्यांनींही इंग्लिश लोकांच्या बरोबरीनें जहाजें बांधण्यास सुरवात केली. आणि ते आपल्या खलाशांनाही इंग्रज खलाशांप्रमाणें उत्तम शिक्षण देऊं लागले.

जेव्हां एकाद्या देशांतील लोक बाहेर देशीं जातात व तेथें कायमची वस्ती करून तेथें राज्यकारभार करूं लागतात तेव्हां त्या नवीन देशास मातृदेशाची वसाहत असें म्हणण्याची वहिवाट आहे. या व्याख्येप्रमाणें जर्मनांच्या वसाहती नव्हत्या असें म्हटलें तरी चालेल. तरी पण ज्यांस ते आपल्या वसाहती म्हणत त्यांच्या द्वारा त्यांनीं आपले

उद्योगधंदे व व्यापार यांची बरीच भरभराट करून घेतली. या सर्व वसाहती उष्ण कटिबंधांत असून त्यांपासून रबर आणि दुसरे उपयुक्त पदार्थ यांचा त्यांना पुरवठा होत असे. यूरोपांतील मुख्य राष्ट्रांना आपल्या वसाहतींचें फार महत्त्व वाटतें आणि याच कारणामुळें जर्मनींतील पुरोगामी पक्षाला वसाहती मिळविण्याविषयीं उत्कंठा लागली होती. या वेळीं जर्मनांचें इंग्रजांशीं मुळींच भांडण नव्हतें आणि म्हणून जर्मनांस पॅसिफिक महासागरांत सॅमॉस आणि आफ्रिकेच्या पूर्व आणि पश्चिमकिनाऱ्यावरचे कांहीं भाग मुळींच त्रास न पडतां मिळाले. इंग्रज लोक या बाबतींत त्यांच्या विरुद्ध गेले नाहींत. लवकरच जर्मनांची महत्त्वाकांक्षा बळावली; आणि इतर दोन देशांत ती साधून घेण्याची त्यांस संधि मिळाली.

यांपैकीं पहिला देश चीन हा होय. यूरोपांतील सर्व राष्ट्रांनीं चीन देशाचा लचका कोणीही तोडावयाचा नाहीं असें आपसांत ठरविलें होतें. परंतु जेव्हां इ स. १८९७ खालीं चिनी लोकांनीं दोन जर्मन मिशनरी मारले तेव्हां जर्मन बादशहानें वरील ठरावाकडे दुर्लक्ष करून भरपाईदाखल म्हणून शानटुंग नांवाचा प्रांत बळकाविला. चीन देशाशीं झालेल्या जर्मनांच्या या व्यवहारांत व चिनी लोकांजवळ त्यांनीं केलेल्या मागण्यांत त्यांनीं आपलें नैर्घृण्य व लोभ हे नैसर्गिक गुण चांगलेच व्यक्त केले. आणि ज्या वेळीं यूरोपांतील कित्येक राष्ट्रांनीं चिनी लोकांनीं केलेल्या परकी लोकांच्या छळाबद्दल त्यांचें शासन करण्याकरितां आपलें सैन्य पाठविलें तेव्हां इतर कोणत्याही देशच्या लोकांपेक्षां जर्मन लोकांनीं चिनी लोकांस फार निर्दयपणानें वागविलें. जरी जर्मन लोकांचें बुद्धिचातुर्य इतर गोष्टींत दिसून येतें, तरी इतर लोकांशीं वागण्याचें चातुर्य मात्र त्यांच्यामध्यें नाहीं हें पदोपदीं आढळतें.

ज्या दुसऱ्या ठिकाणीं पुढें मागें मोठा लाग साधेल अशी योजना जर्मनीनें केली तो देश म्हणजे तुर्कस्थान होय. या तुर्क लोकांचें राज्य कॉन्स्टॅन्टिनोपलपासून युफ्रेटीस नदीपर्यंत एकसारखें पसरलें

होतें. जर्मनीनें कृष्णकारस्थानें रचून युद्ध न करितां तुर्कस्थानास आपलें मांडलिक बनविलें व तेथील राज्यव्यवस्थाही जर्मन अधिकाऱ्यांनीं पहावी असें ठरविलें. तुर्क लोकांच्या राज्यांत फार प्राचीन काळापासून कित्येक सुपीक व भरवस्तीचे प्रांत होते व तुर्कांच्या झोटिंगपादशाहीमुळें ते जवळजवळ उद्ध्वस्त होऊन गेले होते. हे प्रांत आपण ऊर्जितावस्थेस आणूं असें जर्मनांस वाटलें.

याच वेळीं जर्मनांचा इंग्रजांशीं बेबनाव होण्यास सुरवात झाली. इंग्रज लोकांच्या मनांत जर्मनीबद्दल बरेच दिवस सहानुभूति वसत होती. जर्मनीनें ज्या वेळीं आफ्रिकेंत प्रवेश करण्यास सुरवात केली त्या वेळीं इंग्लंडनें मध्यें कोणताही अडथळा आणिला नाहीं. जर्मन लोकांशीं चढाओढ करण्यामध्यें इंग्रज व्यापाऱ्यांचें जरी नुकसान झालें व जरी ते त्याबद्दल तक्रार करूं लागले, तरी या कामांत मध्यें पडावयाचें नाहीं असें इंग्रज सरकारनें ठरविलें. शेवटीं जर्मनीनें आपण होऊनच आपण इंग्लंडचे शत्रु आहों असें जाहीर केलें. इ. स. १८९९ सालीं इंग्रजांचें बोअर लोकांशीं दक्षिण आफ्रिकेंत युद्ध जुंपलें त्या वेळीं जर्मन बादशहानें बोअर लोकांस सहानुभूतीचा संदेश पाठविला व युद्ध चालू असेपावेतों जर्मन वर्तमानपत्रकारांनीं इंग्रजांच्या विरुद्ध लेख लिहिण्याचा सपाटा चालविला होता.

आपल्या राष्ट्राची वाढ करण्याबद्दलची जर्मनीची महत्त्वाकांक्षा पूर्ण न्यायाची आहे असें जर्मनींतील तरुण पिढीस साहजिकपणेंच वाटत होतें. आपल्या मार्गामध्यें जर कोणी अडथळा आणीत असेल तर तें इंग्लंडच होय असें त्यांस वाटत होतें. ज्यावेळीं जर्मन राष्ट्र विभागलेलें व दुबळें होतें त्या वेळीं इंग्लंडनें जगांतील उत्तम भाग आपल्या ताब्यांत घेतले; आतां आपण जेथें जेथें जाऊं तेथें तेथें इंग्लिश लोक दत्त म्हणून आपणापुढें उभे आहेतच; शिवाय इंग्रज लोकच चीन व तुर्कस्थान या

देशांमध्यें आपले बेत चालूं देत नाहींत व इंग्रज लोकांच्या आरमारांचेंच साऱ्या समुद्रावर वर्चस्व आहे, असें त्यांस वाटत होतें. या मताच्या जर्मन लोकांस इंग्लंडची जास्त भीति वाटत होती अगर द्वेष किंवा तिरस्कार वाटत होता हें सांगतां येत नाहीं. तथापि ते इंग्लिशांच्या स्वभावासंबंधानें अतिशय नाकें मुरडीत आणि ब्रिटिश सैनिक कसचे लढूं शकतात असा संशय प्रगट करीत. त्यांनीं इंग्लंडच्या इतिहासांतील कानें कोपरे धुंडून असें प्रमेय काढलें कीं इंग्लिश लोक हे वास्तविक बुद्धिहीन असून केवळ दैवयोगानें त्यांच्या ताब्यांत जगांतील चोहों-कडचे एवढे विस्तीर्ण प्रदेश आले आहेत.

जर्मन बादशहानें मात्र निरनिराळ्या वेळीं इंग्रज लोकांबद्दल आपली सहानुभूति व्यक्त केली. आपण शांतताप्रिय आहों असें जाहीर करण्यासही त्यानें मागें पुढें पाहिलें नाहीं. कदाचित् त्याचे हे उद्गार निष्कपटपणाचे असतील; परंतु शांतता म्हणजे काय हें त्यास समजलें होतेंसें दिसत नाहीं. त्याच्या मतें जर्मन लोकांचा हेका प्रत्येक गोष्टींत चालून इतर राष्ट्रांनीं त्यांशीं नमून वागल्यानेंच शांतता रहाणार होती असें दिसतें.

शेवटीं जर्मनीला इतर राष्ट्रें आपल्यावर नाखुष झालीं आहेत असें कळून चुकलें. आफ्रिकेच्या वायव्येकडच्या कोंपऱ्यास मोरोक्को नांवाचा एक देश आहे. हा देश जरी नांवाला स्वतंत्र आहे तरी त्यावर फ्रेंच लोकांचा ताबा आहे. एके दिवशीं जर्मन बादशहा स्वतः जाऊन त्या देशांत उतरला व तेथील सुलतानास त्यानें असें कळविलें कीं मोरोक्कोसंबंधाच्या राजकीय गोष्टींचा निर्णय करण्याकरितां एक परिषद् बोलाविली पाहिजे. व त्यांत जर्मनीचेही प्रतिनिधि जरूर असले पाहिजेत. या ज्या विलक्षण अटी जर्मन बादशाहानें मोरोक्कोपुढें मांडिल्या त्यांचा मुख्य उद्देश म्हणजे केवळ फ्रान्सचा नक्षा उतरावा

इतकाच होता; कारण जर्मनांचा राजकीय दृष्टीनें मोरोक्कोशीं अर्थाअर्थी संबंध नव्हता. तथापि या गोष्टीस फ्रेंच लोक कबूल झाले व १९०५ सालीं अशा प्रकारची परिषद् भरविण्यांत आली. या गोष्टीस कांहीं वर्षें झाल्यावर पुन्हां फ्रान्सचा अपमान करण्याच्या उद्देशानें फ्रेंच लोकांनीं मोरोक्कोसंबंधीं दिलेलीं आपलीं वचनें पाळलीं नाहींत अशा सबबीवर जर्मनीच्या बादशाहानें मोरोक्कोच्या पश्चिम किनाऱ्यावर असलेलें अगादीर नांवानें बंदर काबीज केलें. या वेळीं फ्रेंचांस इंग्लंडचें साहाय्य मिळणें शक्य होतें तथापि ते जर्मनीविरुद्ध लढाईस उभे राहिले नाहींत, आणि या वरील बंदराच्या मोबदला आफ्रिकेंतील कांहीं प्रांत त्यांनीं जर्मनांस दिला. तथापि त्यायोगें जर्मनांचें समाधान झालें नाहीं. आजवर जर्मन लोकांस जें जें पाहिजे होतें तें तें मिळत गेलें होतें, यामुळें त्यांस असें वाटलें कीं या वेळीं फ्रेंचांची बाजू उचलून इंग्रज लोकांनींच आपल्या महत्त्वाकांक्षेस अडथळा आणिला.

आतां ऑस्ट्रियासंबंधीं दोन शब्द आपणांस येथें सांगितले पाहिजेत. प्रशियानें ऑस्ट्रियाचा पराभव केल्यावर त्या देशाचें डोकें पुन्हां वर निघालें नाहीं. ऑस्ट्रियन साम्राज्यांत बऱ्याच निरनिराळ्या जातीचे लोक राहतात. खुद्द ऑस्ट्रियामध्यें जर्मनांची वस्ती जास्त आहे. हंगेरींत मग्यार या नांवाचे व बोहेमियांत आणि इतर कांहीं प्रांतांत स्लाव्ह नांवाचे लोक राहतात. जरी या निरनिराळ्या जातींचें एकमेकांशीं पटत नव्हतें तरी यांचें कधीं आपसांत युद्ध जुंपलें नाहीं. एकंदरीनें पाहतां ऑस्ट्रियन साम्राज्याची उद्योगधंदे व व्यापार यांच्या योगें भरभराटच झाली होती. ऑस्ट्रियन सरकारास बरेच दिवस असें वाटत होतें कीं एड्रिॲटिक समुद्राच्या पूर्वेकडचा भाग आपल्या ताब्यांत येईल व आपल्या देशाची मर्यादा ईजियन समुद्रापर्यंत वाढेल. परंतु हे दोन्ही बेत सर्व्हिया हा देश मध्यें असल्यानें फसले. जर्मनीनें आंतून

ऑस्ट्रियास उत्तेजन दिलें, व जर सर्व्हियन लोकांशीं कलह चालू होऊन रशियाशीं युद्धाचा प्रसंग आलाच तर आपण मदत करूं असें जर्मनीनें ऑस्ट्रियास आश्वासन दिलें. अशा रीतीनें आपण सांप्रतच्या युद्धाच्या अगदीं जवळ येऊन ठेपतों.

---

प्रकरण दुसरें

## फ्रान्स, बेल्जम व इटली

### ( अ ) फ्रान्स

फ्रान्सचें मूळचें नांव गॉल असें होतें, व तेथील मूळ रहिवाशांस गॉल लोक असें म्हणत असत. हे गॉल लोक एके काळीं फार सामर्थ्यवान् होते. त्यांनीं ख्रिस्ती शकापूर्वी ४०० वर्षांच्या सुमारास इटलीवर स्वारी केली व रोम शहर काबीज केलें. परंतु जेव्हां रोमन लोकांस पुन: जोम आला तेव्हां त्यांनींही इ. स. पूर्वीं ५८ या वर्षीं गॉल देश काबीज केला व तो आपल्या साम्राज्याचा एक घटकावयव बनविला.

हे मूळचे गॉल लोक पूर्वीच्या जर्मन लोकांप्रमाणें लढवय्ये पण बिनसुधारलेले असे होते. रोमन लोकांच्या सुराज्याखालीं त्यांनीं त्यांचे कायदे, समाजरीति, भाषा व खुद्द धर्म यांचा हळूहळू स्वीकार केला. याच कारणामुळें जर्मन व गॉल लोक यांच्या स्वभावामध्यें फार प्राचीन काळींच फरक पडला.

रोमन साम्राज्यास उतरती कळा लागल्यावर जर्मन लोकांपैकीं फ्रँक या नांवाच्या लोकांनीं ऱ्हाइन नदी उतरून गॉलमध्यें प्रवेश केला. त्यांच्यामुळेंच त्या देशास फ्रान्स असें नांव पडलें. हे फ्रँक लोक हळूहळू गॉल लोकांशीं मिसळून त्यांच्याप्रमाणें सुधारले. अशारीतीनें ऱ्हाईन नदीच्या पूर्वेस असणाऱ्या जर्मन लोकांशीं या फ्रँक

लोकांचा संबंध तुटला व इ. स. ८४३ सालीं फ्रान्स देश तेथीलच एका राजाच्या अमलाखालीं स्वतंत्र देश बनला.

ज्याप्रमाणें यूरोपांत इतरत्र "फ्यूडल सिस्टिम" या नांवाची लष्करी जहागिरी देण्याची पद्धत अमलांत आली त्याप्रमाणें ती फ्रान्समध्येंही सुरू झाली. या पद्धतीचा परिणाम असा झाला कीं तीमुळें तेथील लोकांस बरेंच अस्वास्थ्य व संकटें भोगावीं लागलीं. कांहीं फ्रेंच सरदार व खुद्द फ्रान्सचा राजा यांमध्यें पुष्कळ दिवसपर्यंत युद्ध झालें आणि इंग्लिश लोकांनीं मध्यें घुसून फ्रान्सचा ताबा घेण्याचा प्रयत्न केला. इंग्लिश लोकांचें सैन्य लढण्यांत फार कुशल असल्यानें फ्रेंच लोकांचा बरेच वेळां पराभव झाला; परंतु शेवटीं त्यांनीं इंग्रजांवर विजय मिळविला, व इ. स. १३३७ पासून शंभर वर्षेंपावेतों युद्ध झाल्यावर त्यांना फ्रान्समधील आपलीं ठाणीं सोडून द्यावीं लागलीं.

इंग्लिश लोक फ्रान्स देशांतून निघून गेल्यावर फ्रान्स हा एक मोठा प्रबळ देश बनला. फ्रान्सच्या राजानें आपल्या लष्करी सरदारांस आपल्या कह्यांत आणलें व आपसांतील अंत:कलहाचा शेवट लाविला. चौदाव्या लुईच्या कारकीर्दींत (१६३८—१७१०) फ्रान्स देशाच्या उत्कर्षाची सीमा झाली व सर्व यूरोपांत वाङ्मय व ललितकला यांमध्यें फ्रान्स देशानें धुरीणत्व मिळविलें.

फ्रान्स देशाच्या दुर्दैवानें लुई हा राजा शांतताप्रिय नव्हता. व त्यानें ज्या कुरापती काढल्या त्यांच्या योगें पुष्कळ काळ टिकणारीं युद्धें उद्भवलीं. या युद्धांत प्रथम प्रथम लुईस यश आलें, परंतु जेव्हां इंग्लिश लोकांनीं (१७०४ ते १७१३) त्याच्याविरुद्ध उठाव केला तेव्हां त्याच्या अपकर्षास सुरवात झाली. इंग्लिश लोकांचा राजा तिसरा वुइल्यम हा डच् असल्यानें, लुईविरुद्ध हॉलंडचा बचाव करण्याकरितां इंग्रजांस युद्धांत शिरावें लागलें. यामुळें इंग्लंड व फ्रान्स

यांमध्यें पुन: पुष्कळ दिवस टिकणाऱ्या युद्धास सुरवात होऊन, शेवटीं फ्रेंच लोकांस अमेरिका व हिंदुस्थान या देशांमधून परत जावें लागलें.

या युद्धांमुळें फ्रेंच लोकांचें सैन्य, पैसा व प्रदेश या बाबतींत फार नुकसान झालें. शिवाय देशांतील राज्यव्यवस्थाही पुष्कळ प्रकारें प्रजेस असह्य होती. राजा फार उधळ्या होता व राजाइतकेच सरदार लोक प्रजेवर जुलूम करीत. दिवसेंदिवस करांचें ओझें वाढत गेलें, आणि शेवटीं तें जेव्हां अगदीं असह्य झालें तेव्हां फ्रेंच लोक राजशाहीविरुद्ध उठले. त्यांनीं राजा व राणी यांस पकडून त्यांचा शिरच्छेद केला, राजशाही नष्ट केली, आणि लोकसत्ताक राज्यपद्धति स्थापिली. इ. स. १७८९ त ही जी उलथापालथ झाली तिला पहिली फ्रेंच राज्यक्रांति असें म्हणतात.

जेव्हां फ्रेंच लोकांनीं आपल्या राजास तुरुंगांत टाकिलें तेव्हां सभोंवतालच्या राजांस फार भीति उत्पन्न होऊन फ्रेंच राजास मदत करण्याकरितां त्यांस शस्त्र हातीं घ्यावें लागलें. फ्रेंच लोकांचेंही देहभान नाहींसें झाल्यासारखें होऊन त्यांनींही युद्ध पुकारलें. त्यांचा सेनापति नेपोलियन या नांवाचा होता. हा लवकरच त्यांचा अधिपति बनला. नेपोलियन हा राजा झाल्याबरोबर फ्रेंच लोकांचें प्रजासत्ताक राज्य नाहींसें झालें. इंग्रज लोकांस असें आढळून आलें कीं जर नेपोलियनची सत्ता अबाधित रीतीनें चालू राहिली तर त्यास लवकरच यूरोप खंड चिरडतां येईल. त्यांची अशी खात्री झाल्यामुळें त्यांनीं नेपोलियनाविरुद्ध युद्ध जाहीर केलें. जरी फ्रेंच लोकांपेक्षां इंग्रजांचें सैन्य कमी होतें तरी फ्रेंचांवर त्यांस जय मिळवितां आले; त्यांचें समुद्रावर प्रभुत्व असल्यामुळें त्यांस फ्रेंच लोकांचा इतर देशांशीं चाललेला व्यापार बंद करितां आला; व वेलिंग्टनच्या प्रभुत्वाखालीं त्यांच्या सेनेनें फ्रेंच लोकांस स्पेनमधून हुसकावून लाविलें. इंग्रज व जर्मन यांच्या संघटित प्रयत्नामुळें वॉटर्लूच्या मैदानावर इ. स. १८१५ सालीं नेपोलियनचा पुरा पाडाव झाला.

या युद्धानंतर जवळ जवळ शंभर वर्षेंपावेतों इंग्लंड व फ्रान्स या देशांमध्यें शांतताच होती. तरी या अवधींत या दोन राष्ट्रांमध्यें कुरापती अगदींच निघाल्या नाहींत असें नाहीं. फ्रेंच लोकांस भूमध्य-समुद्रामध्यें आपलें वर्चस्व वाढावें असें वाटलें. इ. स. १८७०-७१ मध्यें जर्मनांनीं त्यांचा जो पराजय केला त्या पराजयानंतर पूर्व स्थितीस आल्याबरोबर त्यांनीं भूमध्यसमुद्राच्या किनाऱ्या किनाऱ्यानें आपली सत्ता वाढविण्याचा प्रयत्न केला. कॉन्स्टॅन्टिनोपल, सिरिया, इजिप्त, व आल्जिअर्स या प्रांतांमध्यें फ्रेंच लोकांचें अतिशयच वर्चस्व होतें. इंग्लिश लोकांची तिळमात्र इच्छा नसतांनाही फ्रेंच लोकांनीं इ. स. १८६९ सालीं सुवेजचा कालवा तयार केला होता. फ्रेंच लोकांचें इजिप्तमध्यें बस्तान जमूं दिल्यास त्या मार्गानें आपल्यास हिंदुस्थानास येण्यास अतिशय अडचण पडेल अशा समजुतीनें इंग्रज लोकांनीं संधि येतांच इजिप्त देश आपल्या ताब्यांत घेतला. फ्रेंच लोकांस यामुळें इतका संताप आला कीं पुन्हां त्या उभयतांमध्यें युद्ध जुंपतें कीं काय अशी भीति वाटूं लागली. परंतु थोड्याच दिवसांत प्रबल होणारा जर्मनी हा आपला उभयतांचाही साधारण शत्रु आहे असें त्यांस वाटूं लागलें.

आल्सेस व लॉरेन हे प्रांत हातचे गेल्यामुळें तर फ्रान्स देशास इतका जोराचा घाव बसला होता कीं त्यास लवकर डोकें वर काढितां आलें नाहीं. शिवाय जर्मनीच्या कारस्थानांमुळें फ्रेंच लोकांचें तुर्कस्थानांतील वजन कमी झालें. जर्मनांच्या डोळ्यांत इंग्रज लोकही खुपूं लागले, आणि इंग्लंड व जर्मनी यांमध्यें पुष्कळ दिवसांपासून चालत आलेला मित्रभाव महाराणी व्हिक्टोरिया हिच्या निधनानंतर लयास गेला. राजा सप्तम एडवर्ड यास फ्रेंच लोकांबद्दल फार आदर व मित्रभाव वाटत असल्यानें त्याच्या नेतृत्वाखालीं इंग्लंड व फ्रान्स देश आपलीं पूर्वींचीं भांडणें विसरून जाऊन मित्रभावानें राहूं लागले.

इंग्रज लोकांनीं इजिप्तवरचा आपला ताबा सोडला नाहीं हें खरें, तथापि त्यांनीं फ्रेंच लोकांस इतक्या सवलती दिल्या कीं त्या योगानें ते लोक संतुष्ट राहिले. इ. स. १९०४ सालीं आपल्या मित्रभावाचा निदर्शक म्हणून इंग्लंड व फ्रान्स या देशांनीं एक तह घडवून आणला. या तहाचीं कलमें काय आहेत हें जगास अद्याप माहीत झालेलें नाहीं. परंतु जर्मनीशीं युद्धाचा प्रसंग आल्यास इंग्लंड व फ्रान्स यांनीं परस्परांस साहाय्य करावें असें मात्र एक कलम त्या तहांत असावें असें वाटतें. या करारास अनुसरून फ्रेंचांनीं आपलें आरमार भूमध्यसमुद्रांत व इंग्लिशांनीं आपलें आरमार उत्तर समुद्रांत एकत्र केलें, आणि त्या त्या बाजूकडील परस्परांच्या हितसंबंधाचें संरक्षण करण्याची जबाबदारी परस्परांनीं घेतली.

## ( आ ) बेल्जम

बेल्जन लोक हे मूळचे गॉल लोकांपैकींच होते. गॉल लोकांप्रमाणेंच ते प्रथमत: रोमन लोकांकडून जिंकले गेले व नंतर शार्लमान याच्या राज्याचा ते एक घटकावयव बनले. या राज्याचा नाश झाल्यावर मात्र बेल्जम देश फ्रान्सच्या ताब्यांत न जातां जर्मनीकडे आला व शेवटीं ऑस्ट्रियन साम्राज्याचा तो एक भाग बनला. पहिल्या नेपोलियनानें तो प्रांत ऑस्ट्रियापासून हिरावून घेऊन फ्रान्स देशास जोडला.

नेपोलियनच्या अपकर्षानंतर यूरोपांतील राष्ट्रांनीं फ्रान्स व जर्मनी या देशांच्यामध्यें एक बलाढ्य राष्ट्र असावें अशा हेतूनें बेल्जम व हॉलंड या देशांचें एक राज्य बनविलें, परंतु या दोन देशांमध्यें भाषेचें, धर्माचें, व हितसंबंधाचें इतकें भिन्नत्व होतें कीं त्यांस एकत्र रहाणें दुरापास्त झालें व शेवटीं इ० स० १८३० सालीं बेल्जन लोकांनीं आपलें स्वातंत्र्य जाहिर केलें. या गोष्टीस त्यांनीं यूरोपांतील सर्व राष्ट्रांची संमति मिळविली व इ. स. १८३९ मध्यें बेल्जमनें तटस्थ राष्ट्र या नात्यानें रहावें व युद्धप्रसंगीं कोणत्याही राष्ट्राची बाजू घेऊं नये असें ठरलें. या योजने-

प्रमाणें केवळ बेल्जमचाच फायदा व्हावयाचा होता असें नव्हे, तर फ्रान्स, इंग्लड, व जर्मनी यांसही त्यांत फायदा व्हावयाचा होता. पुष्कळ वर्षेपर्यंत बेल्जम देश कोणाच्या ताब्यांत असावा यासंबंधीं फ्रान्स व जर्मनी या देशांमध्यें रण माजून राहिलें होतें, व बेल्जम हें राष्ट्र तटस्थ आहे असें यूरोपांतील राष्ट्रांनीं मानल्यास यूरोपांत युद्ध पेटण्याचा संभव कमी होता.

हल्लींचें युद्ध सुरू होण्याचे पूर्वीं बेल्जममध्यें जगावरील इतर कोणत्याही राष्ट्रापेक्षां जास्त दाट वस्ती होती. शिवाय त्या देशांत उद्योगधंदेही बरेच होते व लोंकर, लोखंड, व काचेचीं भांडीं यांचा निर्यात व्यापारही मोठा होता. इप्रे व इतर शहरें यांत पुष्कळ सुंदर इमारती असून त्या मध्ययुगांतील उत्कृष्ट शिल्पशास्त्राची साक्ष पटवीत होत्या. गेल्या महायुद्धांत जर्मन लोकांच्या रानटी फौजेनें बेल्जमच्या सौंदर्यदेवतेची विटंबना केली व त्या देशांतील उत्कृष्ट इमारती जमीनदोस्त केल्या.

## ( इ ) इटली

या देशाच्या इतिहासकालाचे अगदीं प्रारंभीं या देशांत उत्तरेकडे गॉल लोक, मध्यें लॅटिन लोक, व दक्षिणेस ग्रीक लोक रहात होते. अशा प्रकारचे निरनिराळे लोक इटलींत रहात असतांना इ० स० पूर्वीं ७५३ मध्यें रोम शहराची स्थापना झाली. रोमन लोक जगांतील इतर कोणत्याही लोकांपेक्षां जास्त व्यवहारकुशल म्हणून नांवाजलेले होते. प्रत्येक मनुष्यानें कांहीं तरी उद्योग करावा असें त्यांस वाटत असे, आणि एकाद्या सभ्य गृहस्थानें शेतकऱ्याचा अगर व्यापाऱ्याचा धंदा केल्यास त्यांत कांहीं वैगुण्य नाहीं अशी त्यांची समजूत होती. लोकांचें आरोग्य व सौख्य वृद्धिंगत करण्याचे कामीं त्यांनीं फार प्रयत्न केले व २००० वर्षांपूर्वीं त्यांनीं बांधलेले रस्ते, नाले, व पूल हे अद्यापही चांगल्या

स्थितींत आहेत. त्यांनींच कायद्यासंबंधीं प्रथम विचार केला व आपली कायदेकानूंची पद्धति पूर्णावस्थेस नेण्याकरितां त्यांनीं केलेल्या प्रयत्नांची साक्ष त्यांच्या इतिहासावरून पटते. शिवाय त्यांचें धैर्यही इतक्या पराकाष्ठेचें होतें कीं, इ० स० पूर्वी ७५३ पासून तों इ० स० नंतर ४०० पर्यंतच्या हजार वर्षांत त्यांना अखेर जय मिळाला नाहीं असें एकाही युद्धांत घडलें नाहीं. रोमन लोकांस अनेक शत्रु होते, परंतु एकामागून एक या शत्रूंनीं आपला पराभव झाल्याचें कबूल करून ते रोमन साम्राज्याचे नागरिक बनले. ऱ्हाईन व डॅन्यूब या नद्यांच्या दक्षिणेपासून तों युफ्रेटीस नदीच्या पश्चिमेपर्यंत जिकडे तिकडे रोमन साम्राज्य पसरलें होतें. या सर्व राज्यांमध्यें रोमन लोकांच्या विचारसरणीचा व कायद्याचा फैलाव झाला व या राज्याच्या पश्चिम भागीं तर रोमन भाषाही स्वीकारली गेली. गॉल, स्पेन व इटली या सर्व देशांमध्यें एक प्रकारची लॅटिन भाषा प्रचलित झाली.

रोमन साम्राज्याच्या पूर्वभागांत ग्रीक ही मुख्य भाषा होती. रोमन साम्राज्याचा हा पूर्वभाग इ० स० ३३० सालीं पश्चिम भागापासून विलग होऊन त्याचें एक निराळेंच राज्य बनलें. या राज्याची राजधानी कॉन्स्टँन्टिनोपल ही होती. यानंतर कांहीं अंशीं जर्मन लोकांनीं एकसारख्या चालविलेल्या हल्ल्यांमुळें रोमन साम्राज्य लयास गेलें व कित्येक शतकेंपर्यंत ( ज्यास " तमोयुग " म्हणतात त्या अवधींत ) जगाच्या या भागांत सुधारणा अगदीं नाहींशी झाली. या सर्व अवधींत इटलीवर बहुतकरून जर्मनांचेंच राज्य होतें, परंतु कांहीं कालानंतर जिनोआ व वेनिस या शहरांची व्यापारानें भरभराट होऊन तीं स्वतंत्र झालीं. सर्व भूमध्यसमुद्रावर जिकडे तिकडे या शहरच्या लोकांनीं किल्ले व कारखाने यांची स्थापना करून यूरोपांतील अतिशय फायद्याचे व्यापार आपल्या हातीं घेतले. वेनिस

शहर तर इतकें प्रबल झालें कीं ऑस्ट्रियाचे बादशहास कित्येक वेळां प्रयत्न करून सुद्धां तें शहर हस्तगत करून घेतां आलें नाहीं. वेनिसच्या लोकांचें स्वातंत्र्य अशा रीतीनें इ० स० १७९७ पर्यंत चालू राहिलें. त्या वेळीं मात्र नेपोलियननें त्यांच्या स्वातंत्र्यावर गदा आणिली.

इटलींतील विभागांचें एकीकरण होऊन त्यांचें एक स्वतंत्र राष्ट्र बनेल असें अठराव्या शतकाच्या अखेरपावेतों कोणास वाटलें नव्हतें. परंतु फ्रान्सच्या राज्यक्रांतीच्या मुळाशीं असलेल्या कल्पना यावेळीं इटलीपर्यंत जाऊन पोंचल्या. अगदीं प्रथम स्वातंत्र्य मिळविण्याचे बाबतींत इटलीचे लोकांस फार अडचणी सोसाव्या लागल्या. ऑस्ट्रियाचें प्रभुत्व कायमच राहिलें व इटलीमध्येंही कोणी नेता पुरुष निर्माण होईना. शेवटीं पीड्माँटचा राजा व्हिक्टर इमॅन्युएल यानें जेव्हां पुढाकार घेतला, तेव्हां इटलीचा भाग्योदय होऊं लागला. परंतु केवळ आपल्याच प्रयत्नानें इटलीस ऑस्ट्रियाचें जूं झुगारून देतां आलें असतें किंवा नाहीं याबद्दल वानवाच आहे. इटॅलियन लोकांच्या सुदैवानें फ्रेंच लोक त्यांच्या साहाय्यास धावून आले, फ्रान्स व इटली यांच्या संयुक्त सैन्यानें ऑस्ट्रियन लोकांस घालवून दिलें, व इटली हा एक स्वतंत्र देश बनला.

परंतु जरी इटलीस स्वातंत्र्य मिळालें तरी इटलीचे लोक निर्धन असल्यानें त्या देशास ऊर्जितावस्था येईना. शिवाय यूरोपांतील कोणतें राष्ट्र आपलें खरें हितचिंतक आहे याचाही इटॅलियन लोकांस उलगडा पडेना. फ्रेंच लोकांनीं इटलीस मदत केली होती खरी, परंतु आपल्या मदतीचा मोबदला ह्मणून त्यांनीं इटलीच्या पश्चिमेकडील भागाचा एक लचका तोडून घेतला. या व इतर कारणांमुळें इटॅलियन लोकांस फ्रान्सविषयीं कृतज्ञता वाटण्याऐवजीं फ्रेंच लोकांचें उत्तरआफ्रिकेंत पुढें पाऊल पडतें असें पाहून ते त्यांचा द्वेष मात्र करूं लागले.

शिवाय ऑस्ट्रियन लोकांविषयीं त्यांच्या मनांत असलेली वैरबुद्धिही त्यांस सोडून देतां आली नाहीं. ट्रीस्ट येथील लोक जरी जातीनें व भाषेनें इटॅलियनच होते तरी ते अद्याप ऑस्ट्रियन साम्राज्याखालीं होते. यामुळें जरी ऑस्ट्रियन लोकांविषयीं इटॅलियन लोकांचे मनांत वैरभाव होता तरी फ्रेंच लोक आपल्यावर चाल करून येतील या भीतीनें आत्मसंरक्षणासाठीं त्यांनीं ऑस्ट्रिया व जर्मनी या देशांशीं तह केला. या तहास " त्रिकूटसंधि " अशी संज्ञा आहे.

गेल्या महायुद्धास सुरवात झाली त्या सुमारास मात्र ही सर्व परिस्थिति बदलली होती. आल्बानिया प्रांत एका जर्मन राजाच्या ताब्यांत गेला असें इटलीस आढळून आलें. जर्मन लोकांस या युद्धांत यश आल्यास एड्रिॲटिक समुद्राच्या सर्व किनाऱ्यावर जर्मन सत्ता गाजूं लागेल व ट्रीस्ट परत मिळविण्याची आपली आशा कायमची लयास जाईल असें इटलीस वाटल्यामुळें आपली सांपत्तिक स्थिति वाईट असतांनाही दोस्त राष्ट्रांस मिळण्यास इटली उत्सुक झाला. ऑस्ट्रियानें इटलीस कांहींसें आमिष दाखविलें पण ऑस्ट्रियन लोकांवर इटलीचा विश्वास बसला नाहीं व कांहीं महिने वाटाघाट चालून शेवटीं इटली दोस्त राष्ट्रांस येऊन मिळाला.

---

प्रकरण तिसरें

# पूर्व यूरोप

## ( अ ) रशिया

रशिया, पोलंड, सर्व्हिया, बल्गेरिया व बोहेमिया या देशांमध्यें बोलल्या जाणाऱ्या भाषांस स्लॅव्हॉनिक भाषा अशी संज्ञा असून त्या देशांत रहाणारे लोक बहुतांशीं स्लाव्ह वंशाचे आहेत. फ्रेंच व इंग्रजी

भाषांप्रमाणें या भाषा मूळच्या आर्य वर्गांतील आहेत. परंतु या भाषा बोलणाऱ्या लोकांचे जसे आपापल्यामध्यें चालीरीतींचे भेद आहेत, तसेच इतर युरोपियन लोकांच्या व यांच्या मध्येंही आहेत.

या वरील देशांमध्यें सर्वांत मोठा देश म्हटला म्हणजे रशिया हा होय. या देशाचा मूळचा इतिहास आपल्यास फारसा उपलब्ध नाहीं. रशियांतील ज्या अगदीं जुन्या लोकांबद्दल आपल्यास माहिती आहे ते लोक म्हटले म्हणजे ज्यांचें मूलस्थान स्कँडिनेव्हियांत होतें ते उत्तरेकडचे लोक होत. या लोकांनीं उत्तरफ्रान्स व इंग्लंड हे देश काबीज केले. त्यांनीं इ० स० १००० चे सुमारास रशियावर स्वारी केली व त्या देशांत राहून त्यांनीं खिस्ती धर्म स्वीकारला. त्यांच्या अमलाखालीं रशिया देश अधिकाधिक सुधारत गेला व कीव्ह हें त्या देशाची राजधानी बनलें.

या गोष्टीनंतर दोनशें वर्षांनीं रशियाच्या दुर्दैवानें मंगोलियन लोकांनीं मध्य आशियांतून येऊन त्या देशावर स्वाऱ्या केल्या व त्यांनीं अतिशय निर्दयपणें तेथील लोकांस लुटलें. या स्वाऱ्या केवळ रशियावरच झाल्या असें नाहीं तर इतर स्लाव्ह राष्ट्रेंही त्यांस बळी पडलीं. शेवटीं मंगोलियन लोकांची सत्ता प्रथम पोलंड व नंतर मॉस्को या प्रांतांनीं झुगारून दिली व आपलें स्वातंत्र्य मिळविलें.

रशियाचा पहिला मोठा राजा इव्हान दि टेरिबल या नांवाचा होता. हा इंग्लंडची राणी इलिझाबेथ, ऑस्ट्रियाचा राजा पांचवा चार्ल्स, तुर्कस्थानचा सुलेमान, व हिंदुस्थानचा अकबर बादशहा या सर्वांचा समकालीन होता. परंतु याच्या कारकीर्दींत व नंतर बरेच दिवसपर्यंतही रशिया देश पश्चिम यूरोपांतील देशांपासून अगदीं विलग राहिला. पीटर दि ग्रेट ( १६८९–१७२५ ) याच्या कारकीर्दींत मात्र रशियाचें एकछत्री व बलिष्ठ राज्य बनलें.

रशियास ऊर्जितावस्थेस आणण्यास पीटर दि ग्रेट हाच कारणीभूत झाला. त्यानें रशियांतील राज्यव्यवस्था सुनियंत्रित केली व निद्रितावस्थेंत असलेल्या आपल्या देशास जागृत केलें. त्याच्या कारकीर्दींत देशांत जूट होऊन देशाची भरभराट झपाट्यानें झाली. एकाद्या साध्या शिल्पकाराप्रमाणें आपल्या हातानें जहाजें बांधण्याची कला त्यानें अवगत करून घेतली; आणि त्या कलेचें शिक्षण त्यानें आपल्या प्रजाजनांस दिलें. व्यापाराची भरभराट व्हावी अशा उद्देशानें नेवा नदीच्या मुखाशीं त्यानें पेट्रोग्राड हें शहर वसविलें आणि आपल्या प्रजेस शिक्षण देण्याच्या इच्छेनें त्यानें पुष्कळ ठिकाणीं शाळा स्थापिल्या. यूरोपांतील इतर राष्ट्रांशीं तुलना करून पाहिली असतां रशियन लोक मागसलेले आहेत असें त्यास आढळून आलें. म्हणून रशियांतील लोकांचा इतर राष्ट्रांशीं व्यापार वाढेल व परकीय लोकांना रशियांतील लोकांशीं मिसळून आपल्या सुधारणेचा रशियन लोकांस फायदा करून देतां येईल अशाविषयीं त्यानें अगदीं प्रथम खबरदारी घेतली.

पीटर हा मोठा यशस्वी योद्धाही होता. त्या वेळेपर्यंत रशियाशीं मुख्यत्वेंकरून वैरभावानें वागणाऱ्या पोलंड व स्वीडन या देशांस त्यानें चिरडून टाकिलें व आपला राज्यकारभार नेटानें चालवून आपल्या प्रांताच्या दक्षिणेस असलेल्या बंडखोर मंगोल लोकांवरही त्यानें आपला ताबा बसविला.

त्याच्या मागून गादीवर बसलेल्या राजांनीं प्रशिया व ऑस्ट्रिया या देशांशीं एकोपा करून इ. स. १७७२ पासून १७९५ पर्यंतच्या अवधींत पोलंड देशास अगदीं नामशेष केलें. या हतभागी देशाचे तीन भाग करण्यांत आले. त्यांतील एक भाग जर्मनीकडे गेला, दुसरा ऑस्ट्रियास मिळाला व सर्वांत मोठा भाग रशियाचे पदरांत पडला. यामुळें यूरोपांतील राजकारणाशीं रशियाचा प्रथमतः संबंध जडला व अखेरीस पहिल्या नेपोलियनच्या विरुद्ध रशियास लढाईंत पडावें लागलें.

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीं नेपोलियननें ज्या वेळीं रशियावर स्वारी केली, त्या वेळेस नेपोलियनचें किती नुकसान झालें तें इतिहासाचे वाचकांस माहित आहेच. रशियन लोकांनीं आपल्या हातानें मॉस्को शहरास आग लावून तें उद्ध्वस्त करून टाकिलें व थंडीचा जोर जास्त झाल्यामुळें नेपोलियनास परत फिरावें लागलें. फ्रान्सकडे परत येत असतां भुकेनें व कडाक्याच्या थंडीनें त्याचें बहुतेक सर्व सैन्य मृत्युमुखीं पडलें.

नेपोलियनचा पाडाव झाल्यावर रशियन लोक आपला प्रदेश दक्षिणेकडे वाढविण्याच्या उद्योगास लागले. त्यांनीं कॉकेशस पर्वत ओलांडला व त्यामुळें तुर्कस्थानचें राज्य लवकरच लयास जाण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. परंतु इंग्रज व फ्रेंच लोकांनीं रशियाच्या मार्गांत अडथळा आणिला व क्रिमियामध्यें युद्ध सुरू झालें. रशियन लोकांचा पराभव झाला व तुर्कस्थानांतून माघार घेऊन त्यांनीं मध्यआशियाकडे आपलें लक्ष वळविलें. येथें त्यांस जास्त यश मिळालें. मध्यआशियांतील खानांचा उत्तरोत्तर बीमोड होत गेला. बुखारा व समरकंद हीं शहरें रशियन लोकांचे हातीं गेलीं; व त्याच वेळीं सैबीरियावर आपला हक्क दाखवून रशियनांनीं तो प्रांत काबीज केला.

रशियाची सर्वांत मोठी उणीव ह्मटली म्हणजे समुद्रावरील बंदरांची होय. आर्टिक महासागर वर्षांतून बराच कालपर्यंत बर्फाच्छादित होत असल्यामुळें जलमार्गानें चालणाऱ्या व्यापारास बराच अडथळा येतो. बाल्टिकसमुद्र व काळासमुद्र यांना इतर समुद्रांशीं जोडणाऱ्या अरुंद सामुद्रधुन्या इतर राष्ट्रांच्या ताब्यांत असल्यामुळें त्या समुद्रांचा व्यापारास उपयोग होत नाहीं. म्हणून भूमध्यसमुद्र, इराणचें आखात किंवा पीत-समुद्र यांवरील एकाद्या बंदराची रशियास अत्यंत जरूरी होती. पण या प्रत्येक ठिकाणच्या बंदराचे बाबतींत त्यास कोणाना कोणा तरी शत्रूबरोबर

झगडा करण्याचा प्रसंग आला. रशियाच्या भूमध्यसमुद्राकडे शिरण्याच्या प्रयत्नांस तुर्कस्थानानें, व इराणच्या आखाताकडे शिरण्याच्या प्रयत्नांस इंग्रजांनीं अडथळा आणिला. शेवटीं पीतसमुद्राकडे प्रगति करण्याचें रशियन लोकांनीं ठरवून सैबीरियामधून एक लांबच लांब आगगाडीचा फांटा तयार केला व पोर्टआर्थर व डाल्नी यांचा त्यांनीं ताबा घेतला. परंतु येथेंसुद्धां त्यांचेपुढें शत्रु दत्त ह्मणून उभा होता. जपानी लोकांची युद्धाची चांगली तयारी होती, व रशियन लोकांस यूरोपांतील आपल्या मूळ ठिकाणापासून फार दूर अंतरावर लढण्याचा प्रसंग आल्यामुळें शेवटीं त्यांचा १९०५ सालीं पराभव झाला.

रशियन लोकांनीं आशिया खंडांत प्रगति केल्यामुळें त्यांची व ब्रिटिशांची चुरस लागणें साहजिक होतें. आणि एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं बरींच वर्षेंपर्यंत या दोन राष्ट्रांमध्यें युद्ध होणें अपरिहार्य आहे असें वाटूं लागलें होतें. परंतु जर्मनीचा आकस्मिक अभ्युदय व महत्त्वाकांक्षा यामुळें हें युद्ध टळलें व या दोन्ही राष्ट्रांमध्यें सलोखा होण्यास सुरवात झाली.

तुर्कस्थानांत व बाल्कन संस्थानांत अप्रतिहत सत्ता गाजविण्याचा जर्मनीचा बेत होता. यामुळें पुढेंमागें रशियास आशियामायनरमध्यें जर्मनीशीं सामना करावा लागणार होता. व तसेंच इतर कांहीं कारणांमुळें यूरोपमध्यें सुद्धां या दोन राष्ट्रांचे दोन हात होण्याचा प्रसंग येणार होता. बाल्कन संस्थानांत जर्मनीचें वर्चस्व वाढूं दिल्यास सर्व्हिया व इतर स्लाव्ह संस्थानें यांस पराधीन व्हावें लागलें असतें. ह्मणून स्लाव्ह लोकांचें नेतृत्व रशियाकडे असल्यानें आपल्याच जातीचे इतर लोक संकटांत सांपडले असतां रशियन लोकांस तटस्थ राहणें शक्य नव्हतें. रशिया मोठा विस्तृत देश खरा परंतु तो निर्धन होता; व शास्त्रीय शोधांत अगर युद्धकौशल्यांत जर्मनीशीं तोंड देणें त्यास शक्य

नव्हतें. जरी रशियाचें फ्रान्स देशाशीं सख्य होतें तरी तेवढ्यानेंच भागण्याजोगें नसल्यानें रशियास ग्रेट ब्रिटनशीं सख्य जोडावें लागलें. जर्मनी हा दोघांचाही शत्रू असल्यामुळें हें सख्य दोन्ही राष्ट्रांस पाहिजे होतें. ब्रिटिश लोक व रशियन यांचा आशिया खंडांतील हितसंबंधांचा विरोध कांहीं न मिटण्याइतका मोठा नव्हता. ब्रिटिश लोकांचा सैबीरियावर मुळींच डोळा नव्हता व रशियालाही बराच काल पावेतों आपलें सारें लक्ष घालण्यास तो प्रांत पुरेसा होता. केवळ इराणबद्दल मात्र या दोन राष्ट्रांमध्यें कांहीं तडजोड होणें जरूर होतें. शेवटीं १९०७ मध्यें या उभयतांत असें ठरलें कीं इराणास राजकीय स्वातंत्र्य असावें पण व्यापाराचे बाबतींत त्या देशाचा उत्तरभाग रशियाच्या व दक्षिणभाग ब्रिटिशांच्या प्रभुत्वाखालीं असावा.

अशा रीतीनें आपण महायुद्धाच्या जवळ येऊन ठेपतों. ऑस्ट्रियन लोकांनीं सर्व्हियावर स्वारी केल्यामुळें रशियास या युद्धांत पडावें लागलें. आपण जर तटस्थ राहिलों तर सर्व्हियाचा अगदीं नायनाट होईल व स्लाव्ह लोकांचें रक्षण करण्यास आपण अगदीं असमर्थ आहों असा कबुलीजबाब दिल्यासारखें होईल असें वाटून सर्व रशियन राष्ट्र अभिमानानें प्रेरित झालें व तेथील सरकार व प्रजा या उभयतांनींही ऑस्ट्रिया व जर्मनी यांस तोंड देण्याचा निश्चय केला.

## (आ) पोलंड

पोलंडचा इतिहास सर्व यूरोपच्या इतिहासाच्या मानानें पाहिला असतां विशेष मनोरंजकही नाहीं अगर विशेष महत्वाचाही नाहीं. पोल लोकांचें एक स्वतंत्र राष्ट्र आहे ही गोष्ट मात्र आपण ध्यानांत ठेविली पाहिजे. हे लोक जर आहेत त्यापेक्षां अधिक शहाणे असते तर त्यांनीं जगाच्या इतिहासांत थोडेंसें अधिक नांव मिळविलें असतें. मध्य-

युगापर्यंत या लोकांचें फारसें नांव ऐकूं येत नव्हतें. मध्ययुगांत मात्र प्रशिया व रशिया यांच्या दरम्यान पोल लोकांचें एक राज्य हळूहळू बनत चाललें व त्यांत पुष्कळ मोठीं व संपत्तिमान् शहरें वसलीं गेलीं. या शहरांतील मुख्य म्हटलीं म्हणजे डांटझिग, वॉरसॉ व क्रॅको हीं होत. इ० स० १९१४ त हीं शहरें अनुक्रमें प्रशिया, रशिया, व ऑस्ट्रिया यांकडे होतीं. पोलंडचा अतिशय भरभराटीचा काल म्हटला म्हणजे रशियाच्या उदयाच्या थोडा पूर्वींचा होय. परंतु जेव्हां रशियाचा एकतंत्री राज्यकारभार बलाढ्य झारच्या ताब्यांत आला तेव्हां रशियाच्या राष्ट्रीय सामर्थ्यास पुष्टी मिळाली, पोलंडमधील उद्दाम सरदारांच्या आपापसांतील भांडणांमुळें त्या देशास उतरती कळा लागली, व शेवटीं अठराव्या शतकाचे आरंभीं त्याचे तीन भाग होऊन ते अनुक्रमें प्रशिया, रशिया व ऑस्ट्रिया या देशांकडे गेले.

पोल लोकांचें स्वातंत्र्य नष्ट झाल्या दिवसापासून त्यांनीं आपल्या जेत्यांस एकसारखा त्रास दिला आहे. जर्मन लोकांनीं त्यांस जर्मन करण्याचा व रशियन लोकांनीं रशियन करण्याचा प्रयत्न केला. पोल लोक या दोन्हीं राष्ट्रांपासून पुष्कळ बाबतींत भिन्न असल्यामुळें हे प्रयत्न स्वभावतःच फसले. पोल लोकांची भाषा जर्मनही नाहीं अगर रशियनही नाहीं, व त्यांचा धर्म सुद्धां निराळा आहे. या कारणामुळें पोल लोकांनीं आपल्या जेत्यांविरुद्ध सतत चळवळी चालू ठेविल्या व या चळवळींचा अतिशय कठोरपणानें बीमोडही करण्यांत आला. सांप्रतच्या युद्धांत कोणत्याही बाजूस यश अगर अपयश आलें तरी पोल लोकांच्या हिताचा त्याच्याशीं कांहीं संबंध नव्हता; व म्हणूनच आपल्यावर ज्या लोकांचें राज्य असेल त्याप्रमाणें कांहीं पोल लोक दोस्तांच्या बाजूनें तर कांहीं दोस्तांच्या विरुद्ध बाजूनें लढले.

## ( इ ) तुर्कस्थान

यूरोपांतील तुर्कस्थानचे हल्लींचे रहिवाशी हे जरी मूळचे आशियांतले आहेत तरी त्यांची शरीररचना व वर्ण इतर युरोपियन लोकांच्या प्रमाणेंच आहे. या लोकांचें मूलस्थान आशिया खंडांतील अमुदारिया नदीच्या तीरावर होतें तेथून त्यांनीं हळू हळू आशियामायनर देश व्यापला. यानंतर कांहीं काल गेल्यानंतर १५ व्या शतकाच्या मध्याच्या सुमारास त्यांनीं बॉस्फरसची सामुद्रधुनी ओलांडली व कॉन्स्टॅन्टिनोपल काबीज केलें व नंतर डॅन्यूब नदीच्या दक्षिणेस असलेला बाल्कन द्वीपकल्पाचा सर्व भाग त्यांनीं अतिशय जलद व्यापून टाकिला.

सुलेमान दि ग्रेट ( इ० स० १५२०–१५५६ ) हा तुर्कस्थानच्या सुलतानांत फार मोठा राजा होऊन गेला. त्याच्या कारकीर्दींत जमिनीवर व समुद्रावर तुर्क लोक अगदीं अजिंक्य झाले. त्यांनीं हंगेरियन लोकांस चिरडून टाकिलें व व्हिएन्ना शहर घेण्यापर्यंतही जवळजवळ त्यांची मजल येऊन ठेपली.

यानंतर तुर्कलोकांच्या सत्तेस उतरती कळा लागली. त्यांना आजूबाजूस रहाणाऱ्या लोकांशीं एकसारखें लढावें लागे आणि जरी मधून मधून त्यांस जय मिळत असे तरी त्यांचे लोक फार मारले जाऊन पैशाच्या दृष्टीनेंही त्यांचें अतिशय नुकसान होई व त्यांस आपली सत्ताही कायम ठेवितां येईना. त्यांचा मुख्य शत्रु प्रथम ऑस्ट्रिया हा होता व नंतर रशिया हा झाला.

एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीं जेव्हां ग्रीस देश स्वतंत्र होऊन तुर्कस्थानच्या राज्यांतून फुटून बाहेर पडला तेव्हां आतां तुर्कलोकांस लवकरच यूरोपांतून यःपलाय करावें लागेल असें बऱ्याच लोकांस वाटलें होतें. परंतु त्या शतकाच्या मध्याच्या सुमारास फ्रान्स व इंग्लंड

त्या देशांस रशियाच्या फाजील विस्ताराची भीति वाटून ते तुर्कस्थानाच्या मदतीस धावून आले व रशियाचा पराभव झाला.

तुर्कलोकांनीं आपली राज्यपद्धति इतर सुधारलेल्या राष्ट्रांप्रमाणें सुधारली असती तर बरें झालें असतें. परंतु त्यांनीं या सुसंधीचा फायदा घेतला नाहीं व त्यांच्या जुलमी अमलाखालीं त्यांच्या स्लाव्ह प्रजेमध्यें जास्त जास्त असंतोष पसरत चालला. रशियन लोक स्लाव्ह लोकांच्या मदतीस धावून आले व त्यानंतर जें युद्ध सुरू झालें त्यांत तुर्कस्थानास हार खावी लागली. सर्व्हिया व बल्गेरिया हे प्रांत तुर्कस्थानच्या राज्यापासून निराळे होऊन त्यांचीं स्वतंत्र राज्यें बनलीं. रुमानियानें तर बऱ्याच वर्षांमागें तुर्कस्थानाचें जूं झुगारून देऊन स्वातंत्र्य मिळविलें होतें.

या इतक्या अवधींत तुर्की सुलतानाचा जुलमी कारभार जशाचा तसाच चालू होता. तुर्कस्थानामध्यें सुशिक्षित "तरुण" तुर्कांचा एक वर्ग निर्माण झाला. आपल्या राज्यपद्धतीची सुधारणा करण्याचा त्यांचा निश्चय झाला होता व त्यांच्या प्रयत्नांमुळें इ० स० १९०८ सालीं राज्यकारभारावर लोकांचा ताबा सुरू झाला.

"तरुण" तुर्कांचे हेतु पवित्र होते खरे, परंतु त्यांस एकजूट म्हणून मुळींच माहीत नव्हती. त्यांचें तुर्की फौजेशीं भांडण जुंपलें. त्यांचा सुधारणा करण्याचा प्रयत्न वायां गेला व तुर्कस्थानची प्रगति खुंटली. मॅसिडोनियांतील लोक बहुतकरून ख्रिस्ती असल्यानें तुर्क लोकांकडून त्यांचा छळ चालूच राहिला. यामुळें हा प्रांत नेहमीं त्रासाचें एक माहेरघरच होऊन बसला. शेवटीं सर्व्हिया व बल्गेरिया यांनीं तुर्कस्थानांविरुद्ध इ० स० १९१२ सालीं युद्ध जाहीर केलें. यांत तुर्कस्थानचा पूर्ण पराजय झाला; व शेवटीं तुर्कस्थानास तह करावा

लागला. त्या वेळीं कॉन्स्टॅन्टिनोपल खेरीज यूरोपांत त्याजवळ कांहींच शिल्लक राहिलें नाहीं.

या वेळीं जर्मन बादशहानें आपण तुर्कस्थानचे मित्र आहों अशी बतावणी करण्यास सुरवात केली. एकोणिसाव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास तुर्कस्थानचा खरा मित्र म्हटला ह्मणजे ब्रिटन हा देश होता. परंतु इ० स० १८८२ सालीं ब्रिटिशांनीं इजिप्त आपल्या ताब्यांत घेतल्यापासून तुर्क लोकांस आपल्या पूर्वीच्या मित्रभावाचा विसर पडला. या संधीचा जर्मनांनीं फायदा घेतला व सुलतानास याबद्दल आपण सूड घेऊं असें आश्वासन दिलें. तुर्क लोकांच्या सैन्याची सुव्यवस्था करण्याकरतां जर्मन अधिकारी नेमले गेले व तुर्कस्थानांतील लोहमार्ग जर्मन लोकांच्या भांडवलानें तयार झाले.

## ( ई ) बाल्कन संस्थानें

या संस्थानांपैकीं आपण प्रथम सर्व्हिया व बल्गेरिया यांचा विचार करूं. हे दोन प्रांत कित्येक शतकेंपर्यंत परस्परांशीं शत्रुत्वाच्या नात्यानें रहात होते. हे दोन्ही प्रांत जुन्या रोमन साम्राज्याचे अवयव होते व रोमन साम्राज्याचा पाडाव झाल्यावर दोन्ही प्रांतांवर रानटी लोकांनीं आपला ताबा बसविला. दोघांसही केव्हां ना केव्हां तरी उत्कर्षाचे दिवस आले होते व दोघांचीही सत्ता कांहीं विवक्षित कालपर्यंत टिकली. बल्गेरियन लोक दहाव्या शतकांत, तर सर्व्हियन चौदाव्या शतकांत प्रबल झाले. परंतु यानंतर दोन्ही प्रांतांवर तुर्कस्थानानें स्वारी करून त्यांचें स्वातंत्र्य हिराऊन घेतलें.

कित्येक शतकेंपर्यंत हे प्रांत तुर्कस्थानच्या ताब्यांत राहिले. परंतु इ. स. १८७७ सालीं झालेल्या रुसो-तुर्क युद्धानंतर सुलतानानें त्यांचें स्वातंत्र्य कबूल केलें. अशा रीतीनें रशियाचे त्यांच्यावर इतके

उपकार झाले असतांही रशियन लोकांचें वर्चस्व त्यांस आवडत नाहीं व रशियामध्यें व त्यांच्यामध्यें पुष्कळ वेळां मित्रत्वाचा बिघाड झाला आहे.

इ० स० १९१२ सालीं मॅसिडोनियाच्या वतीनें सर्व्हिया व बल्गेरिया यांनीं मिळून तुर्कस्थानशीं युद्ध केलें हें आपण पूर्वींच पाहिलें आहे. परंतु युद्ध संपल्यावर त्यांचा पूर्वींचा असूयाग्नि पुन्हां भडकला व सर्व्हियाकडून पराभव पावून इ० स० १९१३ सालीं आपल्यास अत्यंत अनिष्ट असा तह बल्गेरियास करावा लागला. यानंतर बल्गार लोकांनीं सर्व्हियाचा सूड उगविण्याची बुद्धि जागृत ठेवून एकाद्या सुसंधीची वाट पहात बसावें हें साहजिकच होतें.

सर्व्हियन लोक सुद्धां असंतुष्टच होते. कारण त्यांच्या पश्चिमेस असलेला आल्बानिया प्रांत स्वतंत्र आहे असें मानून तेथील राज्यपीठावर एकाद्या जर्मन राजाची स्थापना व्हावी असा ऑस्ट्रियन बादशहानें आग्रह धरिला होता. या अन्यायाच्या सूचनेचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य सर्व्हियांत नव्हतें. यामुळें आल्बानिया प्रांत सर्व्हियाच्या ताब्यांतून गेला व त्यामुळें सर्व्हियास समुद्रकिनारा नाहींसा झाला. शिवाय आपलें आधिपत्य आपखुषीनें कबूल करणाऱ्या आल्बानिया व बॉस्निया प्रांतांतील प्रजेस परकीय अंमलापासून सोडविण्यास सर्व्हियन लोक असमर्थ असल्यामुळें त्यांच्यामध्यें अतिशय असंतोष पसरला होता. शेवटीं सेराजेवो येथें ऑस्ट्रियाचा युवराज व युवराज्ञी यांचा खून झाला तेव्हां ते खून एका सर्व्हियन मनुष्यानें केले असें ऑस्ट्रियानें जाहीर केलें. ( वास्तविक पाहतां खुनी इसम आस्ट्रियाचेच प्रजाजन होते ). अशा प्रकारें हें पशुतुल्य कृत्य सांप्रतच्या युद्धाचें एक कारण म्हणून पुढें करण्यांत आलें.

जेव्हां सर्व्हियनांनीं बल्गार लोकांचा पराभव केला तेव्हां जर्मनांनीं बल्गार लोकांस मदत करण्याचें आश्वासन देऊन त्यांचा द्वेषाग्नि धुम-

सत ठेविला, व ज्या वेळीं सांप्रतच्या युद्धास सुरवात झाली त्या वेळीं सर्व्हियावर स्वारी करण्याकरितां त्यांनीं बल्गार लोकांस पाचारण केलें. बल्गार लोकांनीं बराच वेळपर्यंत कांकूं केलें. परंतु इ० स० १९१५ सालीं ज्या वेळीं रशियन लोकांचे लागोपाठ पराभव होत गेले, तेव्हां ही संधि चांगली आहे असें वाटून ते ऑस्ट्रियन लोकांस जाऊन मिळाले व सर्व्हियावर निर्वाणीचा हल्ला करण्यास ऑस्ट्रियास त्यांनीं मदत केली.

रुमानियानें सर्व्हिया अगर बल्गेरिया यांच्यापूर्वींच ह्मणजे इ. स. १८२८ त आपल्या वरचें तुर्कस्थानचें जूं झुगारून दिलें होतें. त्या दिवसापासून रुमानियाची प्रगति कांहीं गाजावाजा न होतां धिमेपणानें होत आहे. त्याच्या असंतोषाचें मुख्य कारण ह्मणजे ट्रान्सिल्व्हानिया या प्रांतांतील लोक जातीनें रुमानियन असूनही ते अद्याप हंगेरियनांच्या अमलाखालीं आहेत हें होय. जेव्हां प्रस्तुत युद्धास सुरवात झाली तेव्हां ट्रान्सिल्व्हानिया काबीज करण्याची संधि आली असें रुमानियाच्या लोकांस वाटलें. त्यांनीं बराच काल अनिश्चिततेंत घालविल्यावर शेवटीं १९१६ च्या उन्हाळ्याच्या शेवटीं आतां आपण यापुढें तटस्थ राहिल्यास घोडचूक केल्यासारखें होईल असें वाटून त्यांनीं ऑस्ट्रियाविरुद्ध युद्ध जाहीर केलें.

## ( उ ) ग्रीस

तुर्कस्थानापासून स्वतंत्र होण्यास ग्रीस देशास ब्रिटन व फ्रान्स यांनीं मदत केली. एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीं हे दोन्ही देश ग्रीसच्या स्वातंत्र्याकरितां समुद्रावर व जमिनीवर लढले. त्या वेळेपासून ग्रीस देशाचें संरक्षण या राष्ट्रांनींच केलें आहे. शिवाय यूरोपांतील कोणत्याही राजघराण्यांतून ग्रीक लोकांनीं आपला राजा निवडावा अशी त्यांनीं त्यांस मुभा ठेविली होती. प्रस्तुत युद्धाचे प्रारंभीं

ग्रीसचा राजा हा डॅनिश असून त्याची बायको जर्मन होती. या राजाची सनुहाभूति जर्मनीकडे असल्यानें जर्मन लोकांच्या बाजूस होतां होईतों आपला देश ठेवण्याचा त्यानें प्रयत्न केला. या बाबतींत व्हेनेझेलॉस या नांवाच्या एका ग्रीक मुत्सद्यानें त्यास विरोध केला. हा व्हेनेझेलॉस राजपक्षाच्या विरुद्ध असलेल्या लोकपक्षाचा अग्रणी होता. बराच काल पावेतों राजपक्षाच्या हातीं सैन्याचा ताबा असल्यानें देशाच्या कारभाराचें धोरणही त्यांच्या हातीं राहिलें. व भूमध्यसमुद्रांत जर ब्रिटिशांच्या लढाऊ जहाजांचा प्रबल तांडा नसता तर ग्रीस देशाची आपल्या शत्रुपक्षांत गणना झाल्याचें आपणांस आढळून आलें असतें.

---

प्रकरण चवथें

## ब्रिटिश साम्राज्य

पूर्वीचे डेन, सॅक्सन व नॉर्मन लोक हे सर्व युद्धप्रिय होते व या लोकांपासूनच इंग्लिश राष्ट्र निर्माण झालें आहे. ज्या वेळेस यांचें एक राष्ट्र बनलें त्यावेळेस यांनीं इतर राष्ट्रांशीं एकसारखी लढाई चालू ठेविली. यांचे पहिले मोठे शत्रु म्हटले म्हणजे फ्रेंच लोक होत. इंग्लंड व फ्रान्स या दोन देशांमध्यें झालेल्या शंभर वर्षांच्या युद्धाचा आपण पूर्वींच उल्लेख केला आहे. हें युद्ध चौदाव्या शतकाच्या मध्यकालापासून पंधराव्या शतकाच्या मध्यकालापर्यंत टिकलें.

जरी इंग्लिश लोकांस बरेच जय मिळाले तरी त्यांस फ्रान्स देशावर कायमचा ताबा बसवितां आला नाहीं. नंतर पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धांत "वॉर्स ऑफ दि रोझेस" या नांवाचा अंत:कलह इंग्लंडमध्यें सुरू झाला, तेव्हां कांहीं कालपावेतों त्या देशाचा जोम कमी झाला; पण ज्यावेळीं इंग्लंड देश यानंतर पुन्हां पूर्वस्थितीप्रत आला तेव्हां त्यास आपलें सामर्थ्य दाखविण्यास नवीन संधि प्राप्त झाली.

सोळाव्या शतकांत पोर्तुगाल देशाचा व्यापार फार भरभराटीस चढ-लेला होता व अमेरिकेचा ताबा मिळाल्यानें स्पेन देशास अतिशय द्रव्यप्राप्ति झाली होती. या दोन राष्ट्रांशीं इंग्लंड देशास चढाओढ करणें प्राप्त झालें. स्पेन देशानें आपल्या वसाहतींशीं व्यापार करण्यास इंग्लंड देशास बंदी केल्यामुळें मध्य व दक्षिण अमेरिकेंतून सोन्यारुप्यानें भरून जीं जीं स्पेन देशाचीं जहाजें येत तीं तीं पकडण्याचा इंग्लिश लोकांनीं उपक्रम केला. यानंतर अमेरिकेंत जाऊन तेथें वसाहत करावी अशी कल्पना इंग्रज़ लोकांचे मनांत आली व त्याप्रमाणें इ. स. १६०७ सालीं त्यांनीं व्हर्जिनिया प्रांतांत जाऊन तेथें वसाहत केली. हा प्रांत सांप्रत युनायटेड स्टेट्सचा एक भाग आहे.

अशा रीतीनें आज सर्व जगभर पसरलेल्या इंग्लंडच्या वसाहतींस सुरवात झाली. स्पेन देशांतून जे लोक बाहेर पडले ते लढाई व लुटा-लूट करून आणवेल तितकें द्रव्य स्वदेशांत आणण्याच्या उद्देशानें बाहेर पडले. परंतु इंग्रज लोक मात्र दूरदेशीं आपली वसाहत करण्याच्या उद्देशानें बाहेर गेले. आपल्या मातृभूमीस कायमचा रामराम ठोकून केवळ अरण्यांत वसाहती करून आजपर्यंत अपरिचित असलेल्या देशांत शेतीचा व सुधारणेचा विस्तार करण्याच्या उद्देशानें बाहेर पड-लेल्या या पहिल्या लोकांचें धैर्य, साहस, व चिकाटी यांची जितकी स्तुति करावी तितकी थोडीच आहे.

इंग्लिशांमागून मुख्यत्वें फ्रेंचांनीं अमेरिकेंत आपल्या वसाहती स्थापिल्या. तेथें कांहीं काळपावेतों त्यांचा इंग्लिशांशीं सलोखा होता. परंतु अठराव्या शतकाच्या प्रारंभास यूरोपांत इंग्लिश व फ्रेंच यांमध्यें युद्ध सुरू झालें हें वर आलेंच आहे. हें युद्ध जरी वसाहतींसंबंधानें उद्भवलें नव्हतें तरी त्याचा वणवा अमेरिकेंतही पसरला आणि शेवटीं तह झाला तेव्हां उत्तर अमेरिकेंतील फ्रेंचांच्या बहुतेक सर्व वसाहती

ग्रीसचा राजा हा डॅनिश असून त्याची बायको जर्मन होती. या राजाची सनुहाभूति जर्मनीकडे असल्यानें जर्मन लोकांच्या बाजूस होतां होईतों आपला देश ठेवण्याचा त्यानें प्रयत्न केला. या बाबतींत व्हेनेझेलॉस या नांवाच्या एका ग्रीक मुत्सद्यानें त्यास विरोध केला. हा व्हेनेझेलॉस राजपक्षाच्या विरुद्ध असलेल्या लोकपक्षाचा अग्रणी होता. बराच काल पावेतों राजपक्षाच्या हातीं सैन्याचा ताबा असल्यानें देशाच्या कारभाराचें धोरणही त्यांच्या हातीं राहिलें. व भूमध्यसमुद्रांत जर ब्रिटिशांच्या लढाऊ जहाजांचा प्रबल तांडा नसता तर ग्रीस देशाची आपल्या शत्रु-पक्षांत गणना झाल्याचें आपणांस आढळून आलें असतें.

---

प्रकरण चवथें

## ब्रिटिश साम्राज्य

पूर्वींचे डेन, सॅक्सन व नॉर्मन लोक हे सर्व युद्धप्रिय होते व या लोकांपासूनच इंग्लिश राष्ट्र निर्माण झालें आहे. ज्या वेळेस यांचें एक राष्ट्र बनलें त्यावेळेस यांनीं इतर राष्ट्रांशीं एकसारखी लढाई चालू ठेविली. यांचे पहिले मोठे शत्रु म्हटले म्हणजे फ्रेंच लोक होत. इंग्लंड व फ्रान्स या दोन देशांमध्यें झालेल्या शंभर वर्षांच्या युद्धाचा आपण पूर्वींच उल्लेख केला आहे. हें युद्ध चौदाव्या शतकाच्या मध्यकालापासून पंधराव्या शतकाच्या मध्यकालापर्यंत टिकलें.

जरी इंग्लिश लोकांस बरेच जय मिळाले तरी त्यांस फ्रान्स देशा-वर कायमचा ताबा बसवितां आला नाहीं. नंतर पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धांत "वॉर्स ऑफ दि रोझेस" या नांवाचा अंतःकलह इंग्लंड-मध्यें सुरू झाला, तेव्हां कांहीं कालपावेतों त्या देशाचा जोम कमी झाला; पण ज्यावेळीं इंग्लंड देश यानंतर पुन्हां पूर्वस्थितीप्रत आला तेव्हां त्यास आपलें सामर्थ्य दाखविण्यास नवीन संधि प्राप्त झाली.

सोळाव्या शतकांत पोर्तुगाल देशाचा व्यापार फार भरभराटीस चढ-लेला होता व अमेरिकेचा ताबा मिळाल्यानें स्पेन देशास अतिशय द्रव्यप्राप्ति झाली होती. या दोन राष्ट्रांशीं इंग्लंड देशास चढाओढ करणें प्राप्त झालें. स्पेन देशानें आपल्या वसाहतींशीं व्यापार करण्यास इंग्लंड देशास बंदी केल्यामुळें मध्य व दक्षिण अमेरिकेंतून सोन्यारुप्यानें भरून जीं जीं स्पेन देशाचीं जहाजें येत तीं तीं पकडण्याचा इंग्लिश लोकांनीं उपक्रम केला. यानंतर अमेरिकेंत जाऊन तेथें वसाहत करावी अशी कल्पना इंग्रज़ लोकांचे मनांत आली व त्याप्रमाणें इ. स. १६०७ सालीं त्यांनीं व्हर्जिनिया प्रांतांत जाऊन तेथें वसाहत केली. हा प्रांत सांप्रत युनायटेड स्टेट्सचा एक भाग आहे.

अशा रीतीनें आज सर्व जगभर पसरलेल्या इंग्लंडच्या वसाहतींस सुरवात झाली. स्पेन देशांतून जे लोक बाहेर पडले ते लढाई व लुटा-लूट करून आणवेल तितकें द्रव्य स्वदेशांत आणण्याच्या उद्देशानें बाहेर पडले. परंतु इंग्रज लोक मात्र दूरदेशीं आपली वसाहत करण्याच्या उद्देशानें बाहेर गेले. आपल्या मातृभूमीस कायमचा रामराम ठोकून केवळ अरण्यांत वसाहती करून आजपर्यंत अपरिचित असलेल्या देशांत शेतीचा व सुधारणेचा विस्तार करण्याच्या उद्देशानें बाहेर पड-लेल्या या पहिल्या लोकांचें धैर्य, साहस, व चिकाटी यांची जितकी स्तुति करावी तितकी थोडीच आहे.

इंग्लिशांमागून मुख्यत्वें फ्रेंचांनीं अमेरिकेंत आपल्या वसाहती स्थापिल्या. तेथें कांहीं काळपावेतों त्यांचा इंग्लिशांशीं सलोखा होता. परंतु अठराव्या शतकाच्या प्रारंभास यूरोपांत इंग्लिश व फ्रेंच यांमध्यें युद्ध सुरू झालें हें वर आलेंच आहे. हें युद्ध जरी वसाहतींसंबंधानें उद्भवलें नव्हतें तरी त्याचा वणवा अमेरिकेंतही पसरला आणि शेवटीं तह झाला तेव्हां उत्तर अमेरिकेंतील फ्रेंचांच्या बहुतेक सर्व वसाहती

इंग्लिशांच्या कबज्यांत गेल्या. वसाहतींचें महत्त्व किती आहे हें फ्रेंचांस त्यावेळीं नीटसें कळलें नाहीं.

आशियाखंडांत वसाहत करण्याचा इंग्लिशांनीं केव्हांच प्रयत्न केला नाहीं. हिंदुस्थानांत प्रथम जे युरोपियन लोक आले ते पोर्तुगीज होत. त्यांनीं एथें वसाहती करण्याचा प्रयत्न केला होता. पण असले उष्ण कटिबंधांतील प्रदेश आपणास वसाहत करण्यास योग्य नाहींत हें इंग्लिशांनीं प्रारंभापासूनच ओळखिलें होतें. त्यांनीं केवळ व्यापाराच्या निमित्तानें या बाजूस सफरी केल्या. आणि त्यासाठीं ठिकठिकाणीं वखारी व किल्ले बांधून येथील राजांशीं व्यापारी दृष्टीनें तह केले. याप्रमाणें व्यापार करीत असतां त्यांस डच व फ्रेंच लोकांशीं झगडा करावा लागला. फ्रेंचांशीं हिंदुस्थानांत, आणि डचांशीं मलाया द्वीपसमूहांत, त्यांस दोन हात करावे लागले. इंग्लिशांचें सारें लक्ष हिंदुस्थानाकडे वेधलें असल्यामुळें डचांबरोबर झालेल्या या झटापटींत त्यांस हार खावी लागली. हिंदुस्थानांत देखील एके वेळीं त्यांजवर बिकट प्रसंग आला होता. त्यांच्या वखारी फारच थोड्या असून त्या परस्परांपासून फार दूर अंतरावर होत्या आणि मोंगल साम्राज्याचा डोलारा ढासळल्यामुळें साऱ्या हिंदुस्थानांत कोणाचा पायपोस कोणाचे पायांत राहिला नव्हता. प्रख्यात फ्रेंच सेनापति डुप्ले यानें ही उत्तम संधि आहे असें पाहून हिंदुस्थानांतून इंग्लिशांची हकालपट्टी करून येथें फ्रेंच साम्राज्य स्थापण्याचा संकल्प केला. फ्रेंच बादशहाकडून त्यास वेळेवर मदत मिळाली असती तर त्याची ही मनीषा कदाचित् पूर्णही झाली असती; परंतु त्यास पाठिंबा न मिळाल्यामुळें त्याची कल्पना जागच्या जागींच राहिली. इंग्लिश सेनापति क्लाइव्ह यानेंही डुप्लेचेंच अनुकरण केलें आणि त्यानें यश संपादून हिंदुस्थानांत ब्रिटिश साम्राज्याचा पाया घातला.

याप्रमाणें इकडे आशियांत ब्रिटिशांचे ताब्यांत् नवीन मुलूख येत असतां तिकडे अमेरिकेंतील त्यांच्या वसाहती गमावण्याचा प्रसंग येऊन व्हर्जीनियासुद्धां एकंदर तेरा संस्थांनांनीं आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें. नवीन वसाहती कशा स्थापाव्या हें ज्ञान यापूर्वींच इंग्रजांनीं संपादिलें होतें पण त्यांतील लोकांस संतुष्ट राखण्याची कला मात्र त्यांस अजून अवगत झाली नव्हती. या वेळीं इंग्रजांनीं अमेरिकेंतील वसाहतींची संमति न घेतां त्यांवर कर लादण्याचा प्रयत्न केला. परंतु कांहीं झालें तरी वसाहतींतील रहिवाशी जातीचे इंग्रज होते, आणि कर किती बसवावा व त्याचा विनियोग कसा करावा हें ठरविण्याचे कामीं जनतेचें मत घेतलें पाहिजे हें ब्रिटिश राजनीतींतील तत्त्व ते विसरले नव्हते. पुढें दहा वर्षेपर्यंत युद्ध चालल्यावर या वसाहतींस स्वातंत्र्य मिळालें. आणि उत्तरोत्तर या तेरा संस्थानांचा विस्तार व उत्कर्ष होऊन त्यांचेंच सांप्रतचें "युनायटेड स्टेटस्" हें प्रबल राष्ट्र बनलें आहे. या वसाहती गमावल्यानें इंग्लिशांचें मोठें नुकसान झालें खरें पण त्यापासून त्यांस एक लाभही झाला; कारण, वसाहतींच्या राज्यकारभारांत तेथील लोकांचें मत घेतलें पाहिजे हा धडा तेव्हांपासून ब्रिटिश मुत्सद्यांनीं घेतला.

यानंतर लवकरच म्हणजे इ. स. १७८७ त ब्रिटिश लोकांनीं आस्ट्रेलियांत जाऊन वसाहत केली. त्या वेळीं आस्ट्रेलियांत फक्त थोड्या रानटी लोकांचीच काय ती वस्ती होती. बाकी सारा प्रदेश ओसाड होता. फ्रेंचांचेही मनांत तो देश ताब्यांत घेण्याचे विचार घोळत होते. पण इंग्लिशांनीं त्यांचे पूर्वींच त्या देशाचा ताबा घेतला. पुढें कांहीं दिवसांनीं न्यूझीलंड बेटांतही इंग्लिशांनीं वसाहत केली.

आफ्रिकेच्या दक्षिण टोंकाशीं केपकॉलनीमध्यें पुष्कळ वर्षांमागें डच लोकांनीं वसाहत केली होती. पण डच हे नेपोलियनचे दोस्त असल्यामुळें इ. स. १८१४ सालीं इंग्लिशांनीं ती काबीज केली. आफ्रिकेचा

बहुतेक भाग फार दिवसपर्यंत तद्देशीय रानटी लोकांचेच ताब्यांत असून गेल्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत तो युरोपियन राष्ट्रांनीं वांटून घेतला नव्हता. पुढें त्या प्रदेशाची जी विभागणी झाली तींत इंग्लिशांनीं फार मोठा प्रदेश व्यापला हें खरें, तथापि जर्मनांशीं ते फार औदार्यानें वागले, आणि त्यामुळेंच आज आफ्रिकेच्या नकाशांत जर्मनीचे म्हणून जे तीन विस्तीर्ण प्रदेश दाखविलेले सांपडतात ते त्यांस मिळवितां आले.

याप्रमाणें संथपणें प्रगति होतां होतां ब्रिटिश साम्राज्याची उभारणी झाली. ब्रिटिशांनीं अमेरिकेंतील फ्रेंचांच्या सर्व वसाहती व डचांची आफ्रिकेंतील केप कॉलनी नामक वसाहत आपल्या साम्राज्यांत समाविष्ट केली, हें त्यांचे हातून निर्दयपणाचें कृत्य घडलें असें कोणी म्हणतात. पण तत्कालीन फ्रेंच व डच सरकारच्या वर्तनाचें परीक्षण केल्यास ब्रिटिशांचें हें कृत्य तत्त्वतः त्यांच्या कृत्यांपेक्षां अधिक योग्य होतें असें म्हणतां न आलें, तरी तें त्यांहून अयोग्य तरी खास नव्हतें असें आपणांस दिसून येईल. शिवाय विजयश्रीनें माळ घातली असतां इतर राष्ट्रांच्या मानानें ब्रिटिशांनीं फारच अल्प लाभांत संतोष मानिला आहे, आणि जिंकलेले प्रांतही उदार हस्तानें परत दिले आहेत. उदाहरणार्थ, ब्रिटिशांनीं जिंकलेलें जावा बेट इ. स. १८१८ त त्यांनीं हॉलंडला परत दिलें. सांप्रत तें बेट डचांच्या ताब्यांतील एक अतिशय संपन्न प्रदेश होऊन राहिलें आहे.

साम्राज्यांतील प्रजाजनांचा संतोष हीच त्याच्या चांगुलपणाची खरी कसोटी होय. प्रजाजनांस संतुष्ट राखतां न आल्यामुळें ब्रिटिशांना अमेरिकेंतील वसाहतींस मुकावें लागलें. परंतु तेव्हांपासून ब्रिटिश शहाणे झाले, आणि त्यामुळेंच सांप्रतच्या संग्रामांत कानडा, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि हिंदुस्थान येथील लोक शत्रूचा निःपात करण्यासाठीं ब्रिटिशांच्या खांद्यास खांदा लावून लढत असलेले आपणास दिसत आहेत.

१६५७०

ब्रिटिश साम्राज्य जरी तरवारीच्या जोरावर जिंकलें गेलें असलें तरी तें कांहीं तरवारीच्या जोरावर ताब्यांत राखलेलें नाहीं. कोणत्याही सरकारास प्रसंगविशेषीं शस्त्रबलाचा उपयोग करावा लागतोच. तथापि भीतीपेक्षां सुराज्यसंपादनार्थ प्रीतीचाच अधिक उपयोग होतो हें ब्रिटिश मुत्सद्यांस कळून चुकलें आहे आणि आपल्या प्रजाजनांस संतुष्ट ठेवून त्यांच्या राष्ट्रीय भावनांचा योग्य परिपोष करण्याचे कामीं ते शक्य तितके झटत असतात. ज्यांत नानाप्रकारच्या मानवजाति व समाज राहतात असल्या साम्राज्याचा राज्यकारभार करणें हें मोठें बिकट काम आहे; कारण, अशा साम्राज्यांत निरनिराळ्या जनसमाजांच्या हितसंबंधांत विरोध केव्हां ना केव्हां तरी उत्पन्न होतोच. तथापि ब्रिटिशांनीं हें अवघड काम शिरावर घेऊन त्यांत बरेंच यश संपादिलें आहे; आणि ते कोणाच्याही धर्मांत किंवा चालीरीतींत शक्य तोंवर ढवळाढवळ करीत नाहींत.

शिवाय, ब्रिटिश साम्राज्याचा कारभार केवळ ब्रिटिशांच्याच हिताच्या दृष्टीनें चालविला जातो असें म्हणतां येत नाहीं. इ० स० १८४६ पासून आजवर ब्रिटिश साम्राज्य हें एक खुला व्यापार करणारें साम्राज्य आहे. व्यापाराच्या ज्या पद्धतींत देशांत आयात होणाऱ्या परकीय मालावर जकात घेतली जात नाहीं तिला खुल्या व्यापाराची पद्धत असें म्हणतात. अन्यपक्षीं संरक्षक व्यापारपद्धतींत परदेशांतून आयात होणाऱ्या मालावर जकात घेतली जाते. तेणेंकरून परकीय माल महाग होतो आणि अशाप्रकारें स्वदेशांतील उद्योगधंद्यांस उत्तेजन मिळतें. ब्रिटनमधील खुला व्यापार म्हणजे खुली चढाओढ होय. कारण, तींत जो व्यापारी सर्वोत्तम वस्तु सर्वांत स्वस्त दरानें देऊं शकेल तोच विजयी होणार; मग तो ब्रिटिश असो, फ्रेंच असो, कीं जर्मन असो. ब्रिटिश व्यापाऱ्यांचे अंत:करणांतील आत्मविश्वासाचा जोर इतका मोठा होता कीं,

सरकारी संरक्षणानें आपले व्यापार यशस्वी करण्याची कल्पना त्यांनीं तुच्छ लेखिली आणि आपल्या प्रतिपक्षांनीं सरळ मार्गानें संपादिलेल्या कोणत्याही यशाबद्दल त्यांनीं कधीं कुरकूर केली नाहीं.

खुला व्यापार आणि शांतता हीं एकत्र नांदतात. शांततेच्या काळीं कोणासही व्यापारी किंवा कारखानदार या नात्यानें आपला उद्योगधंदा चालविण्यासाठीं ब्रिटिश साम्राज्यांत प्रवेश करण्याची पूर्ण मुभा आहे. त्याला जादा कर भरावा लागत नाहीं किंवा त्यासाठीं म्हणून कांहीं विशेष बंधनेंही ब्रिटिश साम्राज्यांत नाहींत. ह्या उदार राज्यधोरणामुळें जगांतील बहुतेक सर्व लोक इंग्लंडचे हितचिंतक बनले आहेत. हें औदार्यपूर्ण राज्यधोरण इंग्लंडनें अंगिकारलें नसतें, तर आज जर्मनीविरुद्ध लढणाऱ्या राष्ट्रसंघासारख्या एकाद्या मोठ्या संघाशीं इंग्लंडला पुष्कळ दिवसांमागेंच लढण्याचा प्रसंग आला असता.

जर्मनीचें राज्यधोरण मात्र याच्या अगदीं उलट होतें. परकीय मनुष्यास जर्मनीमध्यें वस्तुतः मुळींच स्वतंत्रता नव्हती; म्हणूनच इकडे ब्रिटिश साम्राज्य शांततेच्या व उदार राज्यपद्धतीच्या पायावर स्थिरता पावून आपलें आरमार व सैन्य कमी कमी करीत असतां, तिकडे जर्मनीला मोठ्या लष्करी सामर्थ्याची जरूर भासूं लागली. कालांतरानें सैन्य व आरमार यांची मुळींच गरज उरणार नाहीं असें ब्रिटिश मुत्सद्यांस वाटत होतें, पण तें सुखस्वप्न एकदम नाहींसें झालें.

इतर राष्ट्रांस ब्रिटिशांविरुद्ध एकवेळ कांहीं गाऱ्हाणें सांगतां येईल, परंतु जर्मनीला वास्तविक रीतीनें एकही गाऱ्हाणें सांगतां येणार नाहीं. इंग्लंडला फ्रान्स देशाशीं अनेक वेळां कलह करण्याचा प्रसंग येऊन त्यानें त्याचे उद्देश हाणून पाडले आहेत; परंतु जर्मनीशीं इंग्लंड नेहमीं औदार्यानेंच वागत आलें आहे. जर्मनींत तयार झालेल्या सवंग माला-

मुळें ब्रिटिश व्यापाऱ्यांचें बरेंच नुकसान होऊन ते कुरकूर करूं लागले असतांही ब्रिटिश मुत्सद्द्यांनीं जर्मन राष्ट्राच्या ध्येयास कधीं काडीइतकाही विरोध केला नाहीं. जर्मन लोकांस ब्रिटिशांनीं जेथून हुसकून लाविलें असें इराणी आखाताशिवाय दुसरें एकही स्थल त्यांस दाखवितां येणार नाहीं.

# भाग दुसरा

## युद्धेतिहास


प्रकरण पांचवें

## आणीबाणीचा समय

युद्ध सुरू होण्यापूर्वीं कित्येक वर्षें सारें यूरोपखंड मत्सराग्नीनें कसें धुमसत होतें हें आपण पाहिलें. आतां तो अग्नि एकदम कसा भडकला तें पाहूं.

हें महायुद्ध सुरू झालें हें एकपरी बरेंच झालें असें म्हणतां येईल. कारण, साऱ्या यूरोपखंडाची शस्त्रास्त्रांनिशीं सज्ज होऊन राहण्याची स्थिति प्रत्यक्ष युद्धाइतकीच असह्य आहे असें प्रत्येकास वाटत होतें. सर्व राष्ट्रें रात्रंदिवस मोठ्या फिकीरींत होतीं. प्रत्येक राष्ट्र शस्त्रास्त्रें व दारूगोळा तयार करण्याचे कामीं आणि लढाऊ जहाजें बांधण्याचे कामीं हजारों लोक गुंतवून पाण्यासारखा पैसा ओतीत होतें, आणि प्रत्येक देशांत सर्व तरुण, उत्साही, व सशक्त लोकांस लष्करी शिक्षण घेण्यासाठीं दोन किंवा क्वचित् तीन वर्षेंपर्यंत आपली नित्याची शेती किंवा दुसरा उदीमधंदा सोडून सैनिकाच्या कष्टकारक पेशानें रहावें लागत होतें. अशा स्थितींत प्रत्यक्ष युद्ध पुरवलें पण ही खोटी शांतता नको असें कोणाला वाटल्यास नवल नाहीं.

जर युद्ध टळणें अपरिहार्य असेल व तें केव्हां तरी व्हावयाचेंच असेल तर तें जितकें लवकर सुरू होईल तितकें बरें, असें प्रत्येक राष्ट्राला वाटावयासही कांहीं कारणें होतीं. जर्मन आरमार सारखें वाढत आहे आणि त्याहून आपली सरशी कायम राखण्यासाठीं खर्चाचें जें


अटलांटिक
महासागर
बिस्केचा उपसागर
ब्रिटिश आइल्स
एडिनबरो
डब्लिन
लंडन
इंग्लिश चैनल
हावरे
पैरिस
उत्तर समुद्र
बर्लिन
जर्मनी
पोलंड
वॉर्सा
क्रैको
लेम्बर्ग
रिगा
पिटर्सबर्ग
पेट्रोग्राड
हेलसिंगफोर्स
स्टॉकहोम
फिनलंड
आर्केंजल
मॉस्को
कीव्ह
नीपर
डॉन
ओडेसा
व्होल्गा
रशिया
आस्ट्रिया
हंगरी
बुडापेस्ट
बेलग्रेड
बल्गेरिया
कॉन्स्टन्टिनोपल
काला समुद्र
कॉकेशिया
टिफलीस
टेबिज़ोंड
तेहरान
पर्शिया
मेसोपोटेमिया
बगदाद
कूट
अमारा
आलेपो
आशिया तील तुर्कस्तान
अथेन्स
क्रीट
सायप्रस
जाफा
जेरुसलेम
पोर्टसैयद
अलेक्झेंड्रिया
फ्रान्स
मार्सेल्स
व्हेनिस
रोम
इटली
स्पेन
माद्रिड
लिस्बन
पोर्तुगाल
जिब्राल्टर
भूमध्य समुद्र
सिसिली
माल्टा
आफ्रिका
यूरोप
इंग्रजी मैल
० १०० २०० ३०० ४०० ५००

ओझें पडत आहे तें दिवसेंदिवस डोईजड होत चाललें आहे व तें असेंच सुरू राहिल्यास पुढेंमागें जर्मनीची आपल्या देशावर स्वारी होण्याचीही भीति आहे असें इंग्लंडला वाटत होतें. दरसाल आपली लोकसंख्या कमी होत असून जर्मनीची वाढत आहे, असें फ्रान्सला दिसत होतें; आणि इंग्लंड, फ्रान्स व रशिया यांमधील स्नेहभाव उत्त-रोत्तर वृद्धिंगत होत असून त्यांच्या एकजुटीपासून आपल्या देशास भीति उत्पन्न होण्याचाही संभव आहे असें जर्मनीस वाटत होतें.

फ्रान्स देशास संख्येनें जर्मन सैन्याची बरोबरी करणें अशक्य आहे असें दिसून आलें. म्हणून आपल्या सैन्यांतील प्रत्येक मनुष्य अधिक चांगला सैनिक बनविण्याच्या उद्देशानें सन १९१४ त त्यांनीं सक्तीच्या लष्करी नोकरीची मुदत दोन वर्षांची होती ती वाढवून तीन वर्षांची केली. जर्मनांनीं या गोष्टीचें अनुकरण केलें नाहीं. तथापि त्यांनीं आपलें खडें सैन्य अडीच लक्षांनीं वाढविलें आणि मालमत्तेवर एक जादा कर बसवून एक निराळा युद्धनिधि तयार केला. वस्तुतः फ्रान्स आणि जर्मनी हीं दोन्हीं राष्ट्रें आपली पराकाष्ठा करून युद्धाची तयारी करीत होतीं. इ. स. १९१४ तच युद्ध सुरू करण्याचा जर्मनांचा उद्देश होता असें आपल्यास निश्चयानें म्हणतां येणार नाहीं; तथापि त्या सालीं योग्य संधि प्राप्त झाल्यास युद्ध सुरू करण्याची त्याची तयारी होती हें मात्र निश्चित आहे.

अशी संधि लवकरच प्राप्त झाली. ऑस्ट्रियाच्या प्रजाजनांपैकीं एका सर्व्हियन तरुणानें सेराजेवो येथें तारीख २८ जून सन १९१४ रोजीं ऑस्ट्रियन युवराजाचा खून केला. ह्या गुन्ह्यास सर्व्हियांतील बड्या अधि-काऱ्यांनीं आंतून प्रोत्साहन दिलें होतें असें खात्रीपूर्वक सांगतां येणार नाहीं. तथापि ऑस्ट्रियन बादशहानें या खुनाबद्दल सर्व्हियाला दोषी मानिलें आणि साऱ्या जर्मन राष्ट्रानेंही हा दोषारोप खरा आहे असें

मान्य केलें. तारीख १३ जुलै सन १९१४ रोजीं ऑस्ट्रियानें सर्व्हियाकडे पुढील आशयाचा खलिता रवाना केला:—" आमच्या नजरेस असें आलें आहे कीं तुमच्या राज्यांतील कांहीं अधिकाऱ्यांनीं या खुनास प्रोत्साहन दिलें आहे. यास्तव त्यांस यथायोग्य शासन होणें जरूर आहे. तसेंच तुमच्या राज्यांत आमचे पुष्कळ शत्रु नांदत आहेत त्यांस हुडकून काढण्यासाठीं आमचे कांहीं अधिकारी सर्व्हियांत येतील. त्यांस तेथें जे इसम दोषी आढळतील त्यांचें शासन करण्याची पूर्ण मुभा असली पाहिजे. तुम्हांकडून या खलित्याचा जबाब ताबडतोब येणें जरूर आहे. "

हा खलिता प्रसिद्ध होतांच केवळ खुनी गुन्हेगारांस शासन करण्याचा ऑस्ट्रियाचा उद्देश नसून सर्व्हिया देश चिरडून टाकण्याचा त्याचा उद्देश आहे, असें सर्वांस कळून आलें. या प्रसंगीं रशियन सरकारास मोठा पेंच पडला. सर्व्हियांतील आपल्या जातिबांधवांचें संरक्षण करणें हें रशियन सरकारचें कर्तव्य होतें. तें त्यांच्या हातून न घडलें तर त्याची सर्व जगांत नाचक्की झाली असती. फार कशाला, खुद्द जर्मन लोकांनींही रशियन लोकांचा " भ्याड " म्हणून धिक्कार केला असता. परंतु रशियाची कांहीं जर्मनीसारखी युद्धाची जय्यत तयारी नव्हती. जपानी युद्धांत झालेलें नुकसानही त्यानें अद्यापि पूर्ण भरून काढिलें नव्हतें. शिवाय त्यापाशीं बड्या तोफा अगदीं थोड्या होत्या, किंबहुना मुळींच नव्हत्या म्हटलें तरी चालेल. अशा स्थितींत ऑस्ट्रिया व जर्मनी या उभयतांबरोबर लढावें लागल्यास आपला पराभव होईल अशी रशियास भीति वाटत होती. अन्यपक्षीं सर्व्हियाची उपेक्षा करून आपल्या स्वाभिमानास तिलांजलि देणेंही त्यास अशक्य वाटलें आणि त्यानें " सर्व्हियाला धक्का लागलेला आम्हांस खपावयाचा नाहीं " असें जाहीर केलें. ऑस्ट्रियन अधिकाऱ्यांचा

सर्व्हियांत प्रवेश व्हावा ह्या एका अटीशिवाय ऑस्ट्रियाच्या इतर साऱ्या अटी मान्य करण्याचा रशियानें सर्व्हियास सल्ला दिला; आणि एवढी एक अट मागें घेण्याचेंही अमान्य करून ऑस्ट्रिया युद्ध पुकारील तर आपण सर्व्हियाची कड घेऊं असें त्यानें सर्व्हियास आश्वासन दिलें.

रशियाकडून असें आश्वासन मिळतांच सर्व्हियन सरकारनें ऑस्ट्रियाच्या बादशहाकडे उत्तर पाठविलें कीं, “ आह्मी गुन्हेगारांस शासन करूं; पण ऑस्ट्रियन अधिकाऱ्यांस आमचे देशांत येऊं देऊन न्यायान्यायाचा निवाडा करण्याचा अधिकार त्यांस देणार नाहीं. ” यावर ऑस्ट्रियन बादशहानें गुन्हेगारांच्या शासनार्थ ऑस्ट्रियन अधिकाऱ्यांचा सर्व्हियांत प्रवेश व्हावा ही तर मुख्य मुद्याची गोष्ट आहे असें थोडक्यांत प्रत्युत्तर देऊन लगेच सर्व्हियाविरुद्ध युद्ध जाहीर केलें.

युरोपांतील सर्व राष्ट्रांनीं पुढें पेटणाऱ्या अफाट वणव्याची ही एक ठिणगीच आहे हें ओळखलें. या प्रसंगीं जर्मन सरकार काय विचार करतें हा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न होता; पण जर्मनी अगदीं गप्प राहिला होता. ब्रिटिशांचा परराष्ट्रीय प्रधान सर एडवर्ड ग्रे यानें या गोष्टीबद्दल वाटाघाट करण्यासाठीं राष्ट्रांच्या प्रतिनिधींची सभा भरवावी अशी सूचना केली, पण जर्मनीनें ती मान्य केली नाहीं. जर्मनी व ऑस्ट्रिया यांचें आपसांत काय बोलणें झालें तें अद्यापि बाहेर पडलें नाहीं. तथापि युद्धाचा नाद सोडून देण्याविषयीं जर्मनीनें ऑस्ट्रियाचें मन वळविलें नाहीं हें मात्र निश्चित आहे. ऑस्ट्रियाचे खलित्यास सर्व्हियानें दिलेलें उत्तर फारच नम्रतेचें होतें, आणि तेवढ्यानें ऑस्ट्रियानें समाधान मानिलें असतें तर त्याचे इभ्रतीस मुळीं देखील कमीपणा आला नसता; परंतु या वेळीं जर्मनी गप्प राहिला. एका खुनी मनुष्यास शिक्षा करण्याचे निमित्तानें ऑस्ट्रियानें सर्व्हियावर हल्ला करावा, आणि मग रशिया सर्व्हियाचे मदतीस आला कीं, तो खुनी माणसाचें संरक्षण

करीत आहे असें उघड उघड दिसावें हें जर्मनीस पाहिजे होतें. मग जर्मनीनें ऑस्ट्रियाला मदत करण्यासाठीं व आपल्याही हितसंबंधांचें संरक्षण करण्यासाठीं पुढें चालून यावें; आणि असें झालें ह्मणजे जर्मनीच्या शत्रूंशिवाय इतर सर्व जगाला वाटावें कीं जर्मनीनें केवळ न्यायाची बाजू सांभाळण्यासाठींच शस्त्र उचललें आहे !

परंतु जर्मनीची ही मनीषा सफल झाली नाहीं. ऑस्ट्रिया हा सर्व्हियाशीं अत्यंत अन्यायानें वागत आहे आणि या कामांत जर्मनी त्याचा साथीदार आहे असेंच सर्वांचें मत झालें. कारण, ऑस्ट्रियानें आपला खलिता सर्व्हियाकडे रवाना करण्यापूर्वीं जर्मन बादशहाकडे पाठवून त्याची संमति घेतली होती. ही गोष्ट जरी जर्मन लोक कबूल करीत नाहींत, तरी ती सत्य असल्याबद्दल सर्वांची जवळ जवळ खात्री झाली आहे. हें कसेंही असो, बाल्कन द्वीपकल्पावर आणि त्याचे लगतच्या पूर्वेकडील प्रदेशांवर आपली सत्ता बसविण्याची जर्मनीची प्रबल इच्छा आहे हें स्पष्टपणें सर्वांच्या दृष्टोत्पत्तीस आलें होतें.

जर्मनी व रशिया यांपैकीं कोणत्या राष्ट्रानें आपलें सैन्य गोळा करण्यास प्रथम सुरवात केली हें आम्हांस निश्चयानेंसांगतां येत नाहीं. कारण, त्या दोन्ही राष्ट्रांनीं प्रथम सैन्य उभारण्याचा परस्परांवर दोषारोप केला आहे. तथापि लष्करी शिक्षण घेतलेल्या लोकांस एकत्र करण्याची सुरवात जर्मनीनें युद्ध सुरू होण्यापूर्वीं पुष्कळ दिवस आधींच केली होती व इतर कोणत्याही राष्ट्रापेक्षां जर्मनीची तयारी अधिक जय्यत होती हें निर्विवाद आहे. हें कसेंही असो, प्रत्यक्ष लढाईचें शिंग प्रथमतः जर्मनीनेंच फुंकलें यांत संशय नाहीं. कारण ऑस्ट्रियानें सर्व्हियाकडे कूच केलें न केलें तोंच इकडे जर्मनीनें बेल्जममध्यें प्रवेश केला.

फ्रान्स ह्या युद्धांत पडणार ही गोष्ट ठरलेलीच होती. कारण, पूर्वींच्या तहाप्रमाणें रशियाला मदत करणें फ्रान्सला भागच होतें. परंतु इंग्लंड या

युद्धांत पडेल कीं नाहीं हें मात्र अनिश्चित होतें. सर्व्हियाशीं इंग्लंडचा अर्थाअर्थीं कांहीं एक संबंध नव्हता. आणि जर्मनीनें प्रथम कुरापत काढून फ्रान्सवर हल्ला केल्याशिवाय फ्रान्सला मदत करण्यास इंग्लंड बांधलेलें नव्हतें. परंतु या प्रसंगीं जर्मनीनें प्रथम फ्रान्सवर हल्ला केला नसून, फ्रान्सच रशियाचे साह्यार्थ जर्मनीवर हल्ला करीत होतें. अर्थात् इंग्लंड तटस्थ राहातें तर कोणीही त्यास दोष दिला नसता. याप्रमाणें तटस्थ राहणें कदाचित् दूरदर्शीपणाचें झालें नसतें. फ्रान्सशीं योग्यपणें न वागण्याचा दोषही त्याजवर आला असता; परंतु प्रत्यक्ष वचनभंगाचें पातक मात्र त्याचे माथीं कोणासही मारतां आलें नसतें. ब्रिटिश सरकार सुद्धां त्या वेळीं युद्धाविषयीं उत्सुक नव्हतें. आणि जर इंग्लिश तटस्थ राहतील तर युरोपांतील फ्रेंचांचे मुलुखास व त्यांचे आरमारास आह्मीं धक्का लावणार नाहीं असें अभिवचन जर्मनीनें दिलेलेंही होतें. परंतु बेल्जमची तटस्थता राखण्यासंबंधानें अभिवचन देण्याचें जर्मनीनें नाकारिलें आणि याच मुख्य बाबीमुळें इंग्लंड व जर्मनी यांचा बेबनाव झाला.

बेल्जमचें ताटस्थ्य राखणें किती आवश्यक आहे हें आपण मागें पाहिलेंच आहे. इतउत्तर बेल्जम ही रणभूमि होऊं द्यावयाची नाहीं ही गोष्ट इ. स. १८३९ पासून सर्व राष्ट्रांनीं मान्य केली होती. इतकेंच नव्हे तर कोणी बेल्जमवर स्वारी केल्यास त्या देशाचें संरक्षण करण्याची हमीही सर्व राष्ट्रांनीं तेव्हांपासून घेतली होती. जर्मनीनें देखील या करारावर सही केली होती. इतकेंच नव्हे, तर अगदीं अलीकडे देखील त्यानें आपल्या आश्वासनाचें पुन्हा दृढीकरण केलें होतें. असें असतांही या वेळीं एकाएकीं जर्मनीनें तो करार पाळण्याचें नाकारिलें. आणि बेल्जमला कळविलें कीं, "जर्मन सैन्य बेल्जममधून फ्रान्सवर हल्ला करण्यास जाईल, तेव्हां जर्मन सैन्य व इतर रणसाहित्य नेण्यास बेल्जमनें आपल्या आगगाड्यांचा उपयोग करूं द्यावा आणि अन्नसामुग्री व इतर

जरूरीचे जिन्नस मिळवून देण्याचे कामीं बेल्जम सरकारनें जर्मनीला मदत केली पाहिजे. ”

या प्रसंगीं कोणता मार्ग स्वीकारावा हें ठरविणें बेल्जन लोकांस मोठें कठीण होतें. फ्रेंच लोक हे त्यांचे जातिबांधव होते आणि त्यांचा पराभव करण्याचे कामीं आमचे साथीदार व्हा असें जर्मन लोक त्यांस सांगत होते ! हें त्यांचें ह्मणणें नाकारल्यास आपल्या बेल्जम देशाची राखरांगोळी उडणार हेंही त्यांस प्रत्यक्ष दिसत होतें. ज्यापुढें सारें युरोपखंड चळचळां कांपत होतें तो जर्मनीचा अफाट सेनासागर त्यावर लोटणार होता. विचार करावयालाही जर्मनीनें बेल्जमला अवसर दिला नाहीं. त्यानें केवळ कांहीं तासांच्या अवधींत उत्तर मागितलें. इतक्या थोड्या मुदतींत फ्रान्सला आपली तयारी करणें अशक्य होतें, व कोणत्याही बाजूनें बेल्जमला वेळेवर मदत पोंचणें शक्य नव्हतें.

असें असतांही बेल्जन लोकांनीं आपला धीर खचूं दिला नाहीं. काय करावयाचें याचा त्यांनीं क्षणार्धांत निश्चय केला; व तरवारी परजून त्यांनीं जर्मनीच्या हल्यास प्रतिबंध केला. बेल्जन लोकांनीं हें जें स्वार्थत्यागाचें कृत्य केलें तें जगाच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं नमूद केलें जाईल.

बेल्जमवर कसकसा प्रसंग ओढवला तें आपण पुढील एका प्रकरणांत पाहूंच. एथें आपण एवढें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं जर्मनीनें बेल्जमशीं केलेल्या ह्या दांडगाईच्या योगानें ब्रिटिश लोकांचा युद्धांत पडण्याचा निश्चय ठरला. आपल्या राष्ट्राच्या इभ्रतीखातर आपणास बेल्जमचें संरक्षण करणें भाग आहे असें ब्रिटिश मुत्सद्यांनीं ठरविलें आणि त्यांचा हा निर्णय साऱ्या ब्रिटिश राष्ट्रानें मान्य केला. बेल्जमचा शत्रूपासून बचाव करणें शक्य नव्हतें तथापि त्याची कांहीं झालें तरी मुक्तता करावयाची आणि शत्रूनें केलेल्या त्याच्या नुकसानीची सव्याज फेड करावयाची असा ब्रिटिशांनीं निश्चय केला.

युद्धापूर्वींच्या ह्या आणीबाणीच्या समयांत जर्मनांनीं पुष्कळ चुका केल्या; त्यांबद्दल त्यांस आतां बहुधा पश्चात्तापही होत असेल. त्यांनीं आपला दोस्त जो इटली त्याचा विचार न घेतां युद्ध जाहीर करून त्याचा अपमान केला. तसेंच इंग्लिश लोक तटस्थ राहतील अशीही त्यांनीं आपली मूर्खपणाची समजूत करून घेतली होती. बेल्जमवर स्वारी केल्यास इंग्लंड युद्धांत पडल्यावांचून राहणार नाहीं हें त्यांस कळावयास पाहिजे होतें. ब्रिटिश साम्राज्यांतील अत्यल्प असंतुष्ट लोकांच्या कुरकुरीच तेवढ्या त्यांनीं ऐकिल्या असल्यामुळें युद्ध सुरू होतांच ब्रिटिश साम्राज्याच्या प्रत्येक घटकावयांत बंडाळी माजेल अशीही त्यांची कल्पना होती. शिवाय बेल्जमसारखा क्षुद्र देश त्यांच्या अफाट सैन्याला प्रतिरोध करण्यास धजेल असें त्यांच्या ध्यानीं मनींही कधीं आलें नव्हतें.

जर्मनांसारख्या चाणाक्ष लोकांकडून अशा प्रकारच्या चुका व्हाव्या हें मोठें आश्चर्य होय. कारण, त्यांनीं इतर सर्व बाबतींत अत्यंत दूरदर्शीपणा दाखविला होता. त्यांनीं लढाईची आगाऊच तयारी करून ठेविली होती. शत्रूंच्या युद्धसाधनांची त्यांनीं अत्यंत बारीक रीतीनें चौकशी केली होती. प्रत्येक देशांत किती सैन्य आहे आणि त्याचीं शस्त्रास्त्रें कोणत्या प्रकारचीं आहेत याची त्यांस बरोबर माहिती होती. परंतु मानवी मनोवृत्ति आणि स्वभाव यांची पारख मात्र त्यांस बरोबर करतां आली नाहीं.

---

प्रकरण सहावें

## ( अ ) आधुनिक शस्त्रें व युद्धपद्धति

युद्धपद्धति या विषयाचे दोन विभाग पडतात; हालचाली आणि डावपेंच. प्रत्यक्ष लढाईला सुरवात होण्यापूर्वीं सेनापतीनें आपलें सैन्य

असें हालविलें पाहिजे कीं तेणेंकरून शत्रूला गैरसोईच्या जागीं लढाई करणें भाग पडेल; याला हालचालींची युद्धपद्धति असें म्हणतात. तसेंच प्रत्यक्ष लढण्याचे वेळीं सेनापतीनें आपल्या सैन्याची योग्यरीतीनें रचना करून अशाप्रकारें चढाई किंवा बचाव केला पाहिजे कीं तेणें-करून शत्रूचें शक्य तितकें अधिक व आपलें शक्य तितकें कमी नुकसान होईल; याला डावपेंचाची युद्धपद्धति असें म्हणतात.

सैन्याच्या हालचालींचे सामान्य नियम प्राचीन काळापासून आतां-पर्यंत बहुतेक एकच चालत आले आहेत. त्वरेनें व गुप्तपणें हालचाली करावयाच्या आणि जेथें शत्रूचें बळ कमी असेल तेथेंच अचानक आपलें सैन्य एकवटावयाचें. प्राचीन काळीं सैन्यास पायींच कूच करावें लागे. परंतु आतां त्याच्या हालचाली आगगाड्यांनीं करितां येतात. युरोपांतील आगगाड्यांच्या रस्त्यांपैकीं बरेच रस्ते सैन्याच्या हाल-चालींच्या दृष्टीनेंच तयार केलेले आहेत. जर्मन लोकांनीं युद्ध सुरू होण्यापूर्वी बेल्जमच्या सरहद्दीवर ज्यांच्यायोगें केंद्रीभवन करितां येईल असे कांहीं लोहमार्ग तयार करून ठेविले होते आणि म्हणूनच त्यांना बेल्जमवर इतक्या त्वरेनें चढाई करतां आली. युद्धाचे वेळीं उपयोगीं पडावीं म्हणून जर्मन लोकांनीं आपलीं जुनीं इंजिनें देखील काळजीपूर्वक जपून ठेविलीं होतीं.

त्वरेनें हालचाली करण्याचें दुसरें साधन मोटार गाड्या हें होय. आगगाडीच्या सडका तयार करावयास कांहींसा कालावधि लागतो; परंतु मोटार गाड्या साध्या खडीच्या सडकांवरून चालतात. सांप्रतच्या युद्धांत पुष्कळ वेळां सैन्याचें स्थलांतर मोटार गाड्यांतून झालें आहे आणि त्याची अन्नसामुग्रीही मोटार यानांनींच जलदीनें वाहून नेली आहे.

शस्त्रांत सुधारणा झाल्यामुळें लढाईतील डावपेंचांतही अलीकडे महदंतर पडलें आहे. प्राचीन काळीं लोक दगड, धनुष्यबाण, व तर-

वारी असल्याच हत्यारांचा उपयोग करीत असत. तो काळ मागें टाकल्यास आपणास असें दिसून येईल कीं एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभास सैन्यांतील शिपायांपाशीं साध्या तोड्याच्या बंदुका असत. त्यांत बाराची दारू खचून भरावी लागे आणि त्यांतून वाटोळ्या शिशाच्या गोळ्या सोडल्या जात. त्यांचा माराही दोनशें यार्डांहून फारसा अधिक होत नसे. अशी स्थिति असल्यामुळें थोड्याच वेळांत सैन्यें परस्परांशीं भिडत आणि संगिनींनीं लढूं लागत. यामुळें बचाव करणारांस चढाई करणाऱ्यांपेक्षां विशेष कांहीं फायदा मिळत नसे.

हल्लींच्या मानानें तेव्हांच्या तोफाही फार कमी प्रतीच्या असत. त्या तोफांचे गोळे म्हटले म्हणजे केवळ लोखंडाचे भरींव गोल असत आणि ते पुढच्या तोंडातून तोफेंत भरावे लागत. त्यांचा माराही फारसा लांबवर होत नसे; आणि त्या काळीं तोफांची शिपायांस फार भीति वाटे तरी तितकें त्यांचें वास्तविक सामर्थ्य नव्हतें.

परंतु अलीकडे बंदुका, तोफा वगैरे अग्न्यस्त्रांत फार विलक्षण सुधारणा घडून आल्या आहेत. जुनी तोड्याची बंदूक जाऊन तिचे जागीं आतां रायफल बंदूक आली आहे. मनुष्य जितक्या लांबून दिसूं शकतो तितक्या अंतरावर या बंदुकीनें त्यावर अचूक नेम मारतां येतो. या बंदुकीच्या नळींत मळसूत्रासारख्या खाचा केलेल्या असतात, त्यांच्या योगानें गोळ्या हवेंतून जातांना गरगर फिरतात आणि अधिक दूर जातात. शिवाय, ही बंदूक पुढील तोंडाकडून भरावी लागत नाहीं; तर नळी व दस्ता यांचे सांध्याशीं ती भरतां येते. आणि तेथें तिजमध्यें काडतुसें भरण्याच्या एका पेटीची योजना केलेली असल्यामुळें ही बंदूक पुन्हां पुन्हां भरावी न लागतां तींतून जलदीनें लागोपाठ गोळ्या सोडतां येतात. पण शोधकांची मजल येथेंच खुंटली नाहीं. त्यांनीं "मशीन गन" नांवाच्या बंदुका तयार

केल्या आहेत. त्यांतून रस्ता शिपायाच्या नळ्यांतून जसा जोरानें पाण्याचा फवारा उडतो तसा गोळ्यांचा सारखा वर्षाव होत राहतो. सोरा आणि कोळसा यांपासून बनत असलेली जुन्या प्रकारची बंदुकीची दारू जाऊन तिची जागा आतां नैट्रिक आसिड व ग्लिसरीन यांपासून तयार होणाऱ्या स्फोटक द्रव्यांनीं पटकावली आहे. हे स्फोटक पदार्थ धूमजनक नसून त्यांचें सामर्थ्यही साध्या बंदुकीच्या दारूपेक्षां फार अधिक असतें. बंदुकांत अशी सुधारणा झाल्यामुळें सैन्याला आपल्या शत्रूंच्या दृष्टीस न पडतां त्यांवर गोळ्यांचा वर्षाव करतां येतो आणि ह्मणूनच उभय सैन्यें परस्परांच्या दृष्टिपथांत न येतां त्यांची लढाई चालू रहाते; असले प्रसंग हल्लींच्या संग्रामांत वारंवार घडतात.

वरील गोष्टीमुळें मजबूद ठाणें लढविणाऱ्या सैन्यांचा मोठा फायदा होतो. कारण हल्ला करणारांस फार वेळपर्यंत गोळ्यांचा वर्षाव सहन करावा लागतो. चढाई करीत असतां ते दिसल्यावांचून राहात नाहींत आणि बचाव करणारांस आपल्या दबा धरून बसण्याच्या जागेंतून त्यांवर मारा करितां येतो. यास्तव हल्लीं रात्रीचे छापे घालणेंच अधिक श्रेयस्कर आहे असें आढळून आलें आहे. तथापि सेनापतींनीं केव्हां केव्हां शत्रूचा पिच्छा पुरविण्यासाठीं त्यावर दिवसासही हल्ले केले आहेत.

बचावाचें सांप्रतचें सर्वांत उत्तम साधन खंदक हें होय. अर्वाचीन शस्त्रांचा नेम इतका उत्तम असतो व तीं इतकीं भयंकर संहारक असतात कीं शत्रूच्या दृष्टीस पडणें म्हणजे मृत्यूला आमंत्रण देण्यासारखेंच आहे. म्हणून उघड्या मैदानांत देखील जेव्हां जेव्हां लढाईंत खंड पडतो तेव्हां सैनिक तेथेंच खंदक खणतात आणि त्यांत प्रवेश करून बसतात. या कामासाठीं प्रत्येक शिपाई आपणाबरोबर एक लहानसें खोरें बाळगतो. जेव्हां एकाद्या पक्षाचे लोकांच्या मनांत विवक्षित

जागा धरून बसावयाचें असतें आणि विशेषत: जेव्हां त्यांचें संख्याबल कमी असतें तेव्हां त्यांस आपले खंदक मोठ्या काळजीनें व परिश्रमानें तयार करावे लागतात. हे लोक पुढल्या बाजूस कांटेरी तारांचीं जाळीं बसवून त्यांची मजबुदी करितात आणि वरल्या बाजूनें ते खंदक आच्छादून टाकितात. अशा खंदकांवर पायदळाचा हल्ला चढवितां येण्याकरितां आधीं तोफांच्या माऱ्यानें रस्ता साफ करावा लागतो.


हल्लींच्या तोफांतही बंदुकांप्रमाणेंच सुधारणा झाली आहे. हल्लींच्या सर्व तोफांना मध्यावरच भरण्याची योजना केलेली असते. त्यांचा मारा कमींत कमी तीन मैलांवर तरी करितां येतो आणि त्यांचा नेमही अचूक साधतो. जुन्या तऱ्हेच्या भरींव गोळ्यांऐवजीं आतां कुलपी गोळ्यांचा उपयोग करितात. या गोळ्यांच्या पोकळींत स्फोटक द्रव्यें भरलेलीं असतात, आणि हे गोळे कशावर तरी आपटतात तेव्हां त्यांचा फार जोरानें स्फोट होतो. हे गोळे असेही करतां येतात कीं विवक्षित सेकंदांनीं त्यांचा स्फोट व्हावा; मग त्या वेळीं ते जमिनीवर आदळोत किंवा नुसते हवेंतच असोत. श्रॅप्नेल नांवाचे गोळे ह्याच प्रकारचे असतात. त्यांत पुष्कळ बारीक गोळ्या भरलेल्या असून श्रॅप्नेलचा स्फोट होतांच त्या चोहोंकडे पसरतात. अशा गोळ्यांचा मारा विशेषत: खंदकांवर करितात.

दुसऱ्या एका प्रकारचे तोफांचे गोळे असतात त्यांचा किल्ल्यांवर मारा करितात. जर बचाव करूं पहाणारांचें संख्याबल फार कमी असेल तर ते आपल्या किल्ल्यांचा आश्रय करून राहतात, आणि चढाई करणारांस प्रथम हे किल्ले जिंकावे लागतात; नाहीं तर ते पुढें चाल करीत असतां या किल्ल्यांतून त्यांच्या पिछाडीवर छापे घालण्याची व त्यांची रसद मारून नेण्याची किल्ल्यांतील लोकांस संधि मिळते. इ. स. १८७० त जर्मनांनीं फ्रेंचांचा पराभव केल्यानंतर

फ्रेंचांनीं आपल्या साऱ्या सरहद्दीभर किल्ल्यांची एक मजबूत मालिकाच तयार केली. बेल्जम देशांतही कित्येक मजबूत किल्ले होते. आणि पुष्कळ लोकांची अशी समजूत होती कीं जर्मन लोक फ्रान्सवर हल्ला करण्यासाठीं बेल्जममधून येत असतां त्यांस हे किल्ले काबीज करण्यासाठीं थांबावें लागून त्यांची बरीच खोटी होईल.

परंतु जर्मनांच्या योजना जय्यत तयार होत्या. आणि त्यांनीं प्रचंड हॉवित्झर तोफांच्या साह्यानें बेल्जन लोकांचे हे किल्ले जमीनदोस्त केले. ह्या हॉवित्झर तोफेचा गोळा प्रथम आकाशांत फार उंच जातो आणि तेथून तो भयंकर जोरानें तटबंदीच्या माथ्यावर येऊन आदळतो. त्याचा स्फोट होतांच विटा, दगड वगैरे हरएक पदार्थांचा चक्काचूर उडतो. बिनचूक नकाशांच्या साह्यानें जर्मनांनीं दहा मैलांवरून हे गोळे नेमके मारिले आणि बेल्जमच्या किंवा फ्रान्सच्या तोफांना त्यांचा मुळींच प्रतिकार करतां आला नाहीं. तथापि सुदैवानें फ्रेंच लोकांनीं आपलें फारसें सैन्य किल्ल्यांत अडकवून ठेविलें नसल्यामुळें अशा प्रकारें झालेली त्यांची प्राणहानि विशेष मोठी नव्हती.

प्रत्येक देशांत लष्करांचीं अनेक अंगें असतात. अगदीं अलीकडे युरोपियन लष्करांत तीन अंगें असत; घोडेस्वार, पायदळ आणि तोफखाना. आतां आकाशयानें हें एक चौथें अंग झालें आहे. आकाशयानांचे दोन प्रकार असतात; एरोप्लेन व झेपेलिन. झेपेलिनांचा उपयोग जर्मन लोक मात्र करितात. जर्मनींतील काउंट झेपेलिन नामक पुरुषानें या विमानांची कल्पना शोधून काढिली म्हणून त्याच्या नांवावरून यांस झेपेलिन अशी संज्ञा मिळाली आहे. झेपेलिन म्हटलें म्हणजे वस्तुतः धातूच्या एका मोठ्या कोशांत बसविलेली विमानांची एक मालिकाच होय. ह्या कोशाखालीं एक किंवा दोन हौदे टांगलेले असतात. विमानांच्या योगानें झेपेलिन जमिनीपासून उंच जातें आणि एंजिनानें चाल-



कील येथील झेपेलिन आणि लढाऊ जहाज


णाऱ्या एका पंख्याच्या योगानें त्यास गति प्राप्त होते. तें एका दिवसांत हजार मैल जाऊं शकतें, आणि तें कित्येक टन स्फोटक द्रव्य वाहून नेतें. जर्मनांचे मनांत ह्या राक्षसी झेपेलिनांमधून स्फोटक पदार्थ टाकून लंडन व पॅरिस ह्या शहरांची राखरांगोळी करण्याचा बेत होता. पण तो सिद्धीस गेला नाहीं. विशेषत: या झेपेलिनांचा मोठा आकारच त्यांच्या नाशास कारणीभूत होतो असें आढळून आलें आहे. झेपेलिनांस मुख्य भीति म्हटली म्हणजे एरोप्लेनांची आहे. आणि एकंदरींत युद्धांत झेपेलिनांपेक्षां एरोप्लेनांचीच उपयुक्तता अधिक आहे असें दिसून आलें आहे. एरोप्लेन हें झेपेलिनापेक्षां पुष्कळ लहान असून तें तोलून धरण्यासाठीं त्यास विमानांची जरूरी लागत नाहीं. एकादा पक्षिराज आपले पंख पसरून आकाशांतून तरंगत जातो त्याप्रमाणें एरोप्लेन हें आपल्या पक्षसदृश पातळ्यांवरून एका गतिदायक यंत्राच्या जोरानें तरंगत चालतें. एरोप्लेनांतून सामान्यत: दोनच इसम आणि एक लहान तोफ नेली जाते. शत्रूच्या व्यूहमालेवर उड्डाण करून शत्रुसैन्याच्या स्थानांसंबंधानें माहिती मिळविण्याचे कामीं यांचा उपयोग होतो. शिवाय शत्रूंच्या फौजा, गोट आणि तटबंदी यांवर त्यांतून पुष्कळ बॉंबगोळेही टाकण्यांत आले आहेत.

उभयपक्षांकडील वैमानिकांनीं ह्या युद्धांत अत्यंत कौशल्य व धैर्य प्रकट केलें आहे; परंतु या कामीं ब्रिटिशांनीं जसे नीतियुद्धाचे नियम पाळिले आहेत असें आपणांस खात्रीनें म्हणतां येईल, तसे ते नियम कांहीं शत्रूनें पाळिले नाहींत. ब्रिटिश वैमानिकांनीं जर्मनींतील खेड्यापाड्यांवर एकही बॉंब टाकिला नाहीं. त्यांनीं फक्त जेथून त्यांचेवर तोफांचा मारा करणें शक्य होतें अशा कॉन्स्टन्स सरोवर व उत्तर समुद्र यांचे किनाऱ्यावरील मजबूत तटबंदी ठाण्यांवरच हल्ले केले आहेत, आणि हवेंतून शेंकडों मैलांचीं उड्डाणें करून ते सुरक्षितपणें परत आले आहेत.

या आकाशांतील झटापटींनीं कांहीं अंशीं अति प्राचीन काळच्या युद्धपद्धतीचें पुनरुज्जीवन केलें आहे असें म्हणतां येईल. कारण, त्यांच्या योगानें पौराणिक काळच्या वीरांप्रमाणें वैयक्तिक पराक्रम दाखविण्याची संधि मिळाली आहे. या युद्धांत उभयपक्षांकडील वैमानिकांनीं साहस आणि कौशल्य यांविषयीं व्यक्तिशः कीर्ति संपादिली आहे, आणि ज्याप्रमाणें प्राचीन पौराणिक वीर आपल्या पराक्रमानें रणांगणांतून शत्रूस पलायन करावयास लावीत त्याप्रमाणें या वैमानिकांनीं आकाशांतून शत्रूच्या आकाशयानांस पिटाळून लाविलें आहे.

जलयुद्धांत देखील अलीकडे महदंतर पडलें आहे. हल्लींच्या जलयुद्धाशीं तुलना केल्यास नेल्सनच्या वेळचें जलयुद्ध म्हणजे कांहींच नव्हे असें म्हणतां येईल. त्या काळीं विरुद्ध बाजूचीं लढाऊ जहाजें फार जवळ जवळ भिडत आणि आपलें किंवा शत्रूचें जहाज फुटून जाईपर्यंत परस्परांवर तोफांचा भडिमार करीत.

परंतु सांप्रतचा काळ यंत्राचा असल्यामुळें आधुनिक लढाऊ जहाज हें जगांतील एक अत्यंत गुंतागुंतीचें यंत्र झालें आहे. शिवाय हल्लींच्या कप्तानाला आकाशांतून, पाण्याखालून व सभोंवतालून येणाऱ्या संकटांमधून हें यंत्र बचावून न्यावयाचें असतें. पूर्वकाळचीं जहाजें लांकडी असत, परंतु हल्लींचीं जहाजें पोलादी असून त्यांपेक्षां फारच प्रचंड असतात; त्यांस तरत्या किल्ल्यांची उपमा शोभेल. त्यांवरील तोफाही कधीं कधीं फार मोठ्या म्हणजे तेरा किंवा पंधरा इंच व्यासाच्या देखील असतात; त्यांचा मारा दहा मैलांपर्यंत पोंचतो; आणि त्यांतून पांच सहा मण वजनाचे गोळे फेकले जातात. या सर्व तोफांचीं कामें ज्या यंत्ररचनेनें होतात ती घड्याळांतल्या यंत्ररचनेइतकीच सूक्ष्म व कौशल्याची असते.



ब्रिटिश लड़ाऊ जहाज

सर्वांत मोठ्या प्रतीच्या लढाऊ जहाजांस "बे-डर" असें म्हणतात. त्यांवर अत्यंत मोठ्या तोफांशिवाय दुसरें कांहीं नसतें. लढाऊ क्रूझरें हीं त्यांहून किंचित् लहान असतात. तीं फार जलद चालणारीं असून तासास सुमारें तीस मैलांची मजल मारितात. आधुनिक काळीं आरमारी सैनिक बनण्यास पुष्कळ दिवसांच्या अनुभवाची जरूरी असते. पूर्वीं कोणत्याही सामान्य खलाशास प्रसंगीं आरमारी सैनिक बनतां येई, परंतु तें आतां अशक्य झालें आहे. हल्लींचे आरमारांतील सारे सैनिक बालपणापासून त्या कामांत शिरलेले असतात; यामुळें एखादें जहाज वरील सैनिकांसुद्धां रसातळास गेल्यास होणारी राष्ट्राची हानि भरून काढणें दूरापास्त होतें.

बिनतारी संदेशयंत्राच्या योगानें समुद्रावरील हालचालींच्या बाबतींत मोठीच क्रांति घडून आली आहे. त्याच्या साह्यानें आरमारावरील अधिपतीस शत्रु कोठें आहे हें समजूं शकतें, आपलीं सारीं लढाऊ जहाजें एकत्र करितां येतात, आणि किनाऱ्यावरील आपल्या अधिकाऱ्यांशींही संबंध राखितां येतो. जर्मनांनीं आपल्या झेपेलिनांवर बिनतारी संदेशयंत्रें ठेवून आकाशांतून दूर अंतरावरील शत्रूच्या हालचाली ओळखण्याची व्यवस्था केली आहे.

लढाऊ जहाजास शत्रूच्या आरमारी तोफांशिवाय दुसऱ्याही पुष्कळ गोष्टींपासून भीति असते. त्यांपैकीं टॉर्पेडो हा एक होय. टॉर्पेडो हा सिगारच्या आकाराचा असून त्यांत अत्यंत स्फोटक द्रव्य भरलेलें असतें. त्याच्या टोंकाला एक मळसूत्रासारखी योजना असून तिच्या योगानें त्यास पाण्याखालून गति मिळते. टॉर्पेडोबोटीच्या दोन्ही बाजूंस टॉर्पेडो ठेवण्याच्या नळ्या असतात त्यांतून तो सोडतात. आणि त्याच्या पुढें "बे-डर" जहाजाचाही निभाव लागत नाहीं. टॉर्पेडोच्या स्फोटानें जहाजाच्या बुडास मोठें भगदाड पडतें आणि केवळ

कांहीं मिनिटांच्या अवधींत तें बुडतें. यामुळें जहाजांना टॉर्पेडोबोटींची फार धास्ती वाटते. त्या लहान आकाराच्या असून फार जलद चालणाऱ्या असतात यामुळें त्यांचा तोफेच्या माऱ्यानें नाश करणें फार कठीण पडतें.

टॉर्पेडोबोटींस पिटाळून लावण्याचे कामीं विनाशिकांची योजना करितात. विनाशिका आकारानें टॉर्पेडो बोटींहून जरा मोठ्या असून वाफेच्या शक्तीनें त्यांस तासास ४० मैल पर्यंत जातां येतें. त्यांवर एक किंवा दोन मोठ्या शक्तीच्या तोफा असतात. आणि ह्या विनाशिका मोठ्या जहाजांच्या मार्गांतील टॉर्पेडो बोटींचा धोका दूर करण्यासाठीं त्या जहाजांच्या पुढें पुढें चालत असतात.

तथापि विनाशिकांस आकाशयानांच्या किंवा पाणबुड्यांच्या तडाक्यांतून जहाजांचा बचाव करतां येत नाहीं. पाणबुड्या बोटी अगदीं अलीकडे थोड्या वर्षांमागें निघाल्या. ह्या बोटी आकारानें लहान असून त्या पाण्याखालीं खोल गेल्या तरी त्यांत पाणी शिरत नाहीं. पाण्याखालीं नेणें असेल तर या बोटींत थोडेसें पाणी घेतात म्हणजे ती लगेच पाण्याच्या पृष्ठभागाखालीं जाते. आणि अशा प्रकारें ती पाण्यांत बुडाल्यावरही आंतील एंजिनाच्या योगानें तीस गति मिळते.

पाणबुडीच्या कप्तानाचा असा उद्देश असतो कीं एकाद्या लढाऊ जहाजासन्निध गुप्तपणें यावें व टॉर्पेडो मारून तें बुडवावें. परंतु पाण्याखालून त्यास आपला मार्ग दिसत नाहीं ही मोठीच अडचण असते. ती दूर करण्यासाठीं पाणबुडीचे वरल्या बाजूस एक परिवीक्षणयंत्र बसविलेलें असतें. हें यंत्र एका लहान टोपणांत काचेचा त्रिकोणी लोलक बसवून तयार केलेलें असतें. त्याच्या योगानें बाहेरील देखाव्याचें परावर्तन पाणबुडीच्या आंतल्या बाजूस होतें. परंतु हें परिवीक्षणयंत्र पाण्याच्या पृष्ठभागावर काढल्याखेरीज पाणबुडीस कांहींएक दिसत

नाहीं. एखाद्या लढाऊ जहाजाचे कप्तानास हें परिवीक्षणयंत्र नुसतें दिसलें तरी त्याखालीं पाणबुडी दडून बसलेली आहे हें समजतें.

पाणसुरुंग हा लढाऊ जहाजाचा दुसरा एक शत्रु होय. तो पोलादी पोकळ कवचीचा बनविलेला असून त्यांत स्फोटक द्रव्यें भरलेलीं असतात. हे सुरुंग कधीं कधीं पाण्यावर तरंगत मोकळे सोडतात आणि कधीं कधीं ते कायमचे नांगरून टाकितात. जेव्हां एकाद्या जहाजाचा पाणसुरुंगांस धक्का लागतो तेव्हां त्यांतील द्रव्यांचा स्फोट होऊन ते उडतात. एकेका पाणसुरुंगाचें एवढें सामर्थ्य असतें कीं त्याच्या योगानें मोठें लढाऊ जहाज देखील फुटून जातें. शिवाय, चोहोंकडे लहान बोटी पाठवून समुद्रांतून पाणसुरुंग काढून टाकण्यापलीकडे लहान सुरुंगांपासून बचाव करण्याची कांहीं आगाऊ तरतूदही करतां येत नाहीं.

वरील विवेचनावरून जलयुद्धाचें काम सांप्रत किती अवघड व धोक्याचें झालें आहे हें दिसून येईल.

## रुग्णशुश्रूषा

लढणाऱ्या लोकांविषयीं येथवर वर्णन झालें. आतां डॉक्टर व परिचारिका यांच्यासंबंधानें थोडेंसें लिहिलें पाहिजे. युद्धाचे प्रसंगीं डॉक्टर व परिचारिका ओळखण्याचें चिन्ह म्हटलें म्हणजे तांबडा क्रूस हें होय. अंतर्राष्ट्रीय कायद्यास अनुसरून सर्व राष्ट्रांत रुग्णशुश्रूषेचीं कामें करणाऱ्या लोकांचें हेंच चिन्ह असतें. जखमी झालेल्या लोकांस वाहून नेणारे, त्यांवर शस्त्रप्रयोग करणारे, आणि दवाखान्यांत त्यांची शुश्रूषा करणारे असे सर्व लोक हेंच चिन्ह धारण करितात. त्यांचें काम फार दगदगीचें व धोक्याचें असतें; आणि जेणेंकरून अंगीं वीरत्व बाणेल अशा परिस्थितींत त्यांना वारंवार काम करावें लागतें. सर्व्हिया देशांत इ. स. १९१५ सालीं उद्भवलेल्या विषमज्वराचे सांथीचे प्रसंगीं डॉक्टरांनीं व परिचारिकांनीं जें धैर्य दाखविलें, तशा प्रकारचें धैर्य प्रत्यक्ष रणांगणावर लढणाऱ्या सैनिकांनींही क्वचितच दाखविलें असेल.

# ( आ ) सैन्यें व सेनानायक

## ब्रिटिश सैन्यें

१९१४ सालीं ब्रिटिशांचें जें खडें सैन्य होतें तें ' अल्प नोकरीचें सैन्य ' या वर्गांतील होतें. या सैन्यांत पायदळांतील प्रत्येक शिपायास सात वर्षेपर्यंत नोकरी करावीच लागे; त्यानंतर त्यानें पाहिजे तर पुढेंही सैन्यांत राहावें अथवा नोकरी सोडून दुसरा एकादा धंदा पतकरावा. त्यानें नोकरी सोडून धंदा पतकरला तरी आणखी चार वर्षेपर्यंत त्याची शिलकी सैन्यांत गणना होत असे; म्हणजे लढाईचा प्रसंग आल्यास सरकारास त्याला सैन्यांत परत बोलावितां येत असे. तीं चार वर्षे झाल्यावर मात्र तो पूर्णपणें मोकळा होत असे. अन्यपक्षीं पहिल्या सात वर्षांच्या नोकरीनंतर त्याची इच्छा असल्यास त्यास पुढेंही सैन्यांत राहतां येई आणि आणखी अठरा वर्षे नोकरी केल्यानंतर त्यास पेनशन घेऊन घरीं बसतां येत असे. त्याला दररोज सुमारें एक शिलिंग पगार मिळत असे. शिवाय, त्याला अन्न व पोषाख सरकारी कोठींतून मिळे.

इंग्लंडांतील सामान्य सैनिक बहुतकरून कामकरी वर्गापैकीं असत. सरासरी तेराव्या वर्षापर्यंत त्यांचें प्राथमिक शिक्षण झालेलें असे. सैन्यांत दाखल होण्यापूर्वी त्यांस बहुतकरून कोणत्या ना कोणत्या धंद्याचें शिक्षण मिळालेलें असे व लष्करी नोकरींतून सुटका झाल्यावर ते तोच धंदा करूं लागत.

सैन्यांतील अधिकारी हे त्यांहून उच्च वर्गापैकीं असत. त्यांचें शिक्षण ईटन, हॅरो, विंचेस्टर यांसारख्या मोठ्या सार्वजनिक शाळांतून झालेलें असे आणि ते सतराव्या किंवा अठराव्या वर्षीं कोणत्या तरी लष्करी शिक्षणाच्या कॉलेजांत दाखल होत. पुढें लेफ्टनंटच्या दर्जावर त्यांची सैन्यांत नेमणूक होई. पुढें क्रमाक्रमानें कॅप्टन, मेजर, कर्नल, आणि शक्य तर जनरल या हुद्यांपर्यंत त्यांस चढतां येत असे. कोणत्याही

अधिकाऱ्यास आपल्या वयाच्या चाळीसाव्या वर्षापावेतों नोकरी सोडतां येत नसे.

प्रत्येक सैन्याचीं सामान्यत: तीन मुख्य अंगें असतात; पायदळ, घोडेस्वार आणि तोफखाना. एंजीनियर लोक हें देखील सैन्याचें एक अंगच आहे. या लोकांस जेथें शत्रूकडून अग्निवर्षाव होत आहे अशा स्थळीं पूल बांधणें किंवा ते उडवून देणें असल्या प्रकारचें फार अवघड व धोक्याचें काम करावें लागतें. खरोखर या लोकांशिवाय लढाईचें कामच चालणार नाहीं. शिवाय, इतर लढाऊ लोकांप्रमाणेंच एंजिनियरांसही पावलागणीक धोक्यांत पडावें लागतें. यांशिवाय रुग्णशुश्रूषेकरितां आणि लष्करी सामानाचा पुरवठा व वाहतूक वगैरे कामांसाठीं निराळीं पथकें करावीं लागतात. ज्यांत लक्षावधि लोक आहेत अशा सैन्यास अन्नाचा पुरवठा करण्यास फार काळजी व दूरदर्शीपणा लागतो.

ब्रिटिश पायदळाचे अनेक विभाग केलेले असतात त्यांस रेजिमेंट असें म्हणतात. हजार शिपायांचें एकेक बटेलियन, असल्या दोन बटेलियनांचें एक रेजिमेंट होतें. लढाईचे प्रसंगीं सैन्याचीं सारीं दळें एकत्र करून त्याचे ब्रिगेड नांवाचे विभाग पाडितात. प्रत्येक ब्रिगेडमध्यें पायदळाचीं चार बटेलियनें, घोडेस्वारांचीं तीन रेजिमेंटें, आणि तोफखान्याच्या तीन तुकड्या इतक्या सैन्याचा समावेश होतो. दोन किंवा तीन ब्रिगेड मिळून एक डिव्हिजन होतो आणि दोन किंवा अधिक डिव्हिजन मिळून एक सेना होते.

युद्ध सुरू होण्यापूर्वीं ब्रिटिश सैन्य सुमारें १० हजार अधिकारी आणि दोन लक्ष सैनिक इतकेंच होतें. यापैकीं सुमारें एक लक्ष शिलकी सैन्य होतें. आणि बाकीचें सैन्य रणांगणावर प्रत्यक्ष उभें राहण्यास तयार होतें. १९१४ च्या शरद् ऋतूंत केवळ कांहीं तासांच्या अव-

धींत हें सैन्य शस्त्रास्त्रांनिशीं सज्ज झालें आणि थोड्याच दिवसांत फ्रान्स देशांत दाखल झालें.

या खड्या सैन्याशिवाय 'देशसंरक्षक सैन्य' म्हणून ब्रिटिशांचें आणखी एक सैन्य होतें. एकोणिसाव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास फ्रान्सबरोबर लढाई जुंपण्याचा संभव दिसत असतां इंग्लंडांतील पुष्कळ नागरिक लष्करी शिक्षण घेण्यासाठीं स्वयंसेवक म्हणून पुढें आले. तेव्हांपासून हें सैन्य अस्तित्वांत असून कांहीं वर्षांमागें त्यास अधिक चांगलीं शस्त्रें देण्यांत आलीं. त्याच्या शिक्षणाची अधिक चांगली व्यवस्था केली गेली आणि त्यास 'देशसंरक्षक सैन्य' असें नांव देण्यांत आलें.

युद्ध जाहीर होतांच पहिल्या कांहीं दिवसांच्या अवधींत ब्रिटिशांचें बहुतेक सारें लष्कर फ्रान्स देशांत उतरलें. हिंदुस्थानांतील कायमच्या सैन्यांतील बहुतेक सारी ब्रिटिश फौज हिंदुस्थानांतून निघून गेली आणि तिच्या जागीं इंग्लंडाहून तेथील देशसंरक्षक सैन्य आलें. कालांतरानें यांतीलही बरेच लोक फ्रान्समध्यें किंवा अन्य रणक्षेत्रांवर गेले आणि या काळांत खुद्द इंग्लंडमध्यें कायमच्या सैन्यांत फारच मोठी भरती झाली. सांप्रत जगांतील निरनिराळ्या भागीं असलेल्या एकंदर ब्रिटिश सैनिकांची संख्या निदान ५० लक्ष आहे !

## इतर राष्ट्रांतील सैन्यें

जर्मन सैन्याचीं निरनिराळीं अंगें आणि त्यांची संघटना बहुतेक ब्रिटिश सैन्याच्या धर्तीचीच होती. परंतु इंग्लंडांत लष्करी नोकरी आपखुषीची होती व जर्मनीमध्यें वयांत आलेल्या प्रत्येक पुरुषानें दोन वर्षेंपर्यंत सैन्यांत नोकरी केलीच पाहिजे अशी सक्ती होती. शिवाय पुढें २२ वर्षेंपर्यंत त्याची शिलकी सैन्यांत गणना होत असे. या पहिल्या दोन वर्षांत सामान्य सैनिकांस मुळींच पगार मिळत नसे.

जर्मनीमध्यें सैन्यांतील अधिकारी प्रायः जमीनदार वर्गापैकीं असत. जर्मन साम्राज्यांतील लष्करी शिक्षण संपादिलेल्या लोकांची एकंदर संख्या लढाईचे सुरवातीस सुमारें ६० लक्ष असावी असा अंदाज आहे. शिवाय जर्मन सैन्याचा वार्षिक खर्च ६ कोटी पौंडांचा होता.

फ्रान्समध्यें देखील देशांतील वयांत आलेल्या सर्व पुरुषांची सैन्यांत गणना होत असून तेथें लष्करी शिक्षणाची मुदत तीन वर्षांची होती. एकंदर फ्रेंच सैन्याची संख्या लढाईचे प्रारंभीं ४० लक्ष होती; तसेंच ऑस्ट्रियाचें सैन्य सुमारें ४० लक्ष असून रशियाचें ५० लक्ष होतें. तथापि हल्लीं या राष्ट्रांचें किती किती सैन्य प्रत्यक्ष रणांगणावर आहे हें निश्चयपूर्वक सांगतां येत नाहीं. युद्ध सुरू झाल्यापासून देशांतील सामान्य कामापैकीं पुष्कळसें काम स्त्रियांकडे सोंपविण्यांत आलें आणि अशा प्रकारें पुरुषवर्ग लष्करी नोकरी करण्यास मोकळा झाला. शिवाय सर्व राष्ट्रांनीं लष्करांत दाखल करण्याची वयोमर्यादा इतकी खालीं आणिली कीं आज १६ वर्षांचीं पुष्कळ मुलें लष्करांत समाविष्ट झालीं आहेत.

## सेनानायक

युद्धाला प्रारंभ होतांच ब्रिटिशांनीं लॉर्ड किचनेर यास युद्धमंत्री नेमून आपल्या बाजूचीं जमिनीवरील युद्धाचीं सारीं सूत्रें त्याचे हातीं दिलीं. लॉर्ड किचनेर याची अलौकिक बुद्धिमत्ता पूर्वींच जगाच्या निदर्शनास आली होती. त्यानें जगांतील निरनिराळ्या भागीं झालेल्या अनेक युद्धांत कामगिरी केली असून त्यास त्यांतील सर्व प्रकारचा अनुभव आला होता. कोणत्याही गोष्टीचा भावी परिणाम जाणण्याचें दूरदर्शित्व त्याचे अंगीं वसत होतें; त्यास मनुष्याची पारख उत्तम होती. आणि फार मोठें सैन्य उभारणें व त्यास शिक्षण देणें या कामास तोच एक खरा लायक पुरुष होता. अर्थात् त्याच्या कर्तब-



लॉर्ड किचनर

गारीवर ब्रिटिश राष्ट्राची दृढ श्रद्धा होती यांत नवल नाहीं. हें युद्ध थोड्या काळांत आटोपणारें नव्हे, निदान तीन वर्षांच्या युद्धाची तरी तयारी करणें आवश्यक आहे हें त्यानें प्रारंभापासूनच ओळखिलें होतें. बिलकूल दिरंगाई न करितां त्यानें स्वत: हें मोठें काम आपल्या शिरावर घेतलें, आणि दहा लक्ष लोकांचें सैन्य उभारून त्यास आपल्या देखरेखीखालीं शिक्षण देऊन शस्त्रास्त्रांनिशीं सज्ज केलें. याप्रमाणें इंग्लंडांत केलेल्या कार्यानेंच त्याची कामगिरी संपली असें नाहीं. त्यास कित्येक वेळां फ्रान्स देशांतही जावें लागलें. तेथें त्यानें फ्रेंचांशीं इतकें एकोप्यानें काम केलें कीं मित्रराष्ट्रांमधील उत्कृष्ट सहकारितेचें याहून चांगलें उदाहरण इतिहासांतरीं सांपडणें शक्य नाहीं.

या पुरुषाचा एकाएकीं अंत झाल्यामुळें सर्वांस मोठा धक्का बसला. एका ब्रिटिश क्रूझरावरून रशियाकडे सफर करीत असतां आपल्या बरोबरच्या अधिकारिमंडळासह तारीख ५ जून १९१६ रोजीं ऑर्कनी बेटांचे नजीक समुद्रांत बुडून त्याचा अंत झाला. त्याच्या मृत्यूनें झालेलें राष्ट्रचें नुकसान सहसा भरून येणें शक्य नाहीं. तथापि त्यानें आपलें अंगीकृत कार्य पूर्ण सिद्धीस नेलें असून तें पुन: करण्याची आज जरूरी राहिली नाहीं. त्यानें आपल्या थोर बुद्धिमत्तेच्या योगानें इंग्लंडमध्यें नवीन सैन्य निर्माण केल्यामुळेंच युद्धाच्या प्रारंभीं कांहीं महिनेपावेतों ग्रेटब्रिटनचा बचाव झाला. लॉर्ड किचनेर या पुरुषानें जो पाया घातला त्यावरच मागून आलेल्या युद्धमंत्र्यांनीं इमारत उठविली. आपल्या श्रमाचें सार्थक झालेलें पाहण्यास लॉर्ड किचनेर जिवंत राहिला नाहीं, ही अत्यंत दु:खाची गोष्ट होय.

ब्रिटिशांचा रणांगणावरील पहिला मुख्य सेनापति व्हायकाउंट फ्रेंच ह्या नांवाचा होता. दक्षिण आफ्रिकेंतील युद्धांत सेनानायक या नात्यानें त्यानें कीर्ति संपादिली होती आणि मॉन्सपासून केलेल्या पिछे-

हाटीच्या दिवसांत, व इप्रेच्या लढाईत, त्यानें आपली कीर्ति पूर्णपणें कायम राखिली. एक वर्षपर्यंत अत्यंत परिश्रमाची कामगिरी केल्यावर तो इंग्लंडला परत आला आणि त्याचे जागीं सर डगलस हेग याची नेमणूक झाली. यानेंच सांप्रतच्या युद्धांत ब्रिटिशांस विजय मिळवून दिला आहे.

फ्रेंचांचा पहिला मुख्य सेनापति जनरल जॉफ्रे हा होता. याचा जन्म अगदीं सामान्य कुळांत झाला असून तो केवळ आपल्या अलौकिक गुणांच्याच योगानें इतक्या मोठ्या योग्यतेस चढला. साऱ्या रणांगणावरील एकंदर परिस्थिति कसकशी आहे हें जाणणें, प्रत्येक स्थलाच्या महत्त्वानुरूप तेथें कमजास्त सैन्य ठेवणें, आणि हरएक जागीं योग्य अशाच अधिकाऱ्याची योजना करणें या कामांत त्यानें आपलें विलक्षण चातुर्य दाखविलें. यानें केलेल्या संघटनेच्या योगानें ह्या दीर्घकालीन संग्रामांत जर्मनांचे बहुतेक सारे दल्ले निष्फळ झाले. अलीकडे जनरल जॉफ्रे यानें दुसरें काम आपल्या शिरावर घेतलें असून रणांगणावरील सेनाधिपत्य जनरल फॉक याचे हातीं दिलें आहे.

जर्मन सैन्याचें सेनाधिपतित्व केसर बादशहाकडे केवळ नांवाला होतें. तो स्वतः प्रत्यक्ष लढाईचें काम करीत होता असें दिसून आलें नाहीं. त्याच्या हाताखालच्या सेनापतींपैकीं ज्यांस रणांगणांत मोठे विजय मिळाले, असे सेनापति हिंडेनबुर्ग आणि मॅकेन्सन हे होत. ह्या दोघांकडेही पूर्व रणांगणावरच सेनाधिपत्य होतें. फ्रान्सांत मात्र एकाही जर्मन सेनापतीनें केव्हांही मोठेंसें नांव मिळविलें नाहीं. जर्मन युवराजाकडे पश्चिम रणांगणांत फार मोठ्या सैन्याचें आधिपत्य होतें पण त्यास अपयशाचाच वांटा पतकरावा लागला.

## निरनिराळ्या राष्ट्रांचीं आरमारें

युद्धाच्या प्रारंभास ब्रिटिश आरमारांत सैनिक आणि अधिकारी मिळून एकंदर दीडलक्ष लोक होते. फ्रेंच आरमारांत एकंदर साठ हजार



जनरल सर डगलस हेग

लोक असून जर्मन आरमारांत ८० हजार लोक होते. ब्रिटिशांच्या आरमारावरील मुख्य अधिपति सर जॉन जेलिको हा असून त्यानें सतत दोन वर्षेंपर्यंत अप्रतिहत विजय मिळविला. आतां त्याकडे दुसरें काम सोंपविलें गेलें असून सर डेव्हिड बीटी हा आरमारावरील मुख्य अधिपति झाला आहे. युद्धास प्रारंभ झाला तेव्हां निरनिराळ्या राष्ट्रांचीं एकंदर लढाऊ जहाजें पुढीलप्रमाणें होतीं; इंग्लंडचीं ५२२, जर्मनीचीं ३०३, आणि फ्रान्सचीं २८९. परंतु गेल्या चार वर्षांचे अवधींत पूर्वींच्या पुष्कळ जहाजांस जलसमाधि मिळाली असून पुष्कळ नवीन जहाजें बांधण्यांत आलीं आहेत.

---

प्रकरण सातवें

## जलयुद्ध

सांप्रतच्या युद्धाची हकीकत सांगण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हटला म्हणजे प्रत्येक राष्ट्राच्या काय काय आकांक्षा होत्या आणि त्या कितपत सफल झाल्या हें सांगणें होय. आपणासच विजय प्राप्त होणार अशी प्रत्येक पक्षास पूर्ण खात्री वाटत होती. परंतु पूर्वीं ध्यानींमनींही न आलेल्या गोष्टींच्या योगानें त्यांच्या पुष्कळ आकांक्षा विफल झाल्या आहेत.

कील आणि विल्हेल्म्सहावेन हीं जर्मन आरमाराचीं मुख्य ठाणीं होत. हीं स्थळें इतकीं बंदोबस्ताचीं आहेत कीं तेथें शत्रूच्या जहाजांचा रिघाव होणें शक्य नाहीं. विल्हेल्म्सहावेन या बंदरासमोर हेलिगोलँड नांवाचा मजबूत जंजिरा किल्ला आहे. सभोंवतींचा उत्तर समुद्राचा किनारा उथळ असल्यामुळें त्याची ज्यांस विशेषशी माहिती नाहीं अशा जहाजांस तो फार धोक्याचा आहे. शिवाय तेथें सर्वत्र पाणसुरुंग पेरून ठेविलेले आहेत. सारांश, समुद्राच्या मार्गानें विल्हेल्म्सहावेन आणि कील हीं ठिकाणें केवळ अभेद्य आहेत.

जर्मनीच्या आरमाराच्या या दोन केंद्रांची योजना अशी केलेली आहे कीं तेथील आरमाराचा इंग्लंडविरुद्ध किंवा रशियाविरुद्धही उपयोग करतां यावा. केसरविल्हेल्मकनाल या नांवाच्या कालव्यानें हीं दोन स्थलें जोडलेलीं आहेत. यामुळें केवळ कांहीं तासांच्या अवधींत जर्मन आरमारास बाल्टिक समुद्रांतून उत्तर समुद्रांत व उत्तर समुद्रांतून बाल्टिक समुद्रांत जातां येतें; आणि जर्मन आरमार केव्हां कोठें आहे हें ब्रिटिश आरमारास केव्हांही निश्चित समजत नाहीं. आकार, सामर्थ्य, आणि तोफा यांच्या बाबतींत जर्मनीचीं जहाजें ब्रिटिश जहाजांच्या तोडीचीं आहेत; पण संख्येनें तीं कमी असल्यामुळें आपल्या बंदरांतून बाहेर येऊन लढण्याची त्यांची छाती झाली नाहीं. जर्मनीचे आरमारी बेत पुढीलप्रमाणें होते असें दिसतें:—

१ पाणसुरुंग आणि टॉर्पेडो यांच्या साह्यानें एकामागून एक ब्रिटिश जहाजांचा नाश करावयाचा असा जर्मनांचा पहिला उद्देश होता. यासाठीं केवळ आपल्याच किनाऱ्यासभोंवतीं पाणसुरुंग पेरून ते राहिले नाहींत, तर आयर्लंडच्या पश्चिमेस अटलांटिक महासागरांतही त्यांनीं ते पेरिले. त्यांच्या पाणबुड्या बोटींनीं दिवसास व रात्रीसही ब्रिटिश जहाजांवर हल्ले केले. या हल्लयांमुळें एकदां ब्रिटिशांचीं तीन क्रूझरें नाश पावलीं; तरी एकंदरींत ब्रिटिश लढाऊ जहाजांस पाणबुड्यांपासून फारसें नुकसान पोंचलें नाहीं. पण ब्रिटिशांच्या व्यापारी जहाजांचें मात्र अतिशय नुकसान झालें.

२ इंग्लंडच्या किनाऱ्यावर अचानक हल्ले करावयाचे आणि शहरांवर भडिमार करून तेथील रहिवाशांस धाक उत्पन्न करावयाचा असा जर्मनीचा दुसरा बेत होता. याप्रमाणें हल्ले करण्याचा त्यांनीं अनेकवार प्रयत्न केला. अंधाऱ्या रात्रीं त्यांचीं शिघ्रगति क्रूझरें इंग्लिश किनाऱ्याकडे येत, निरनिराळ्या ठिकाणांवर तोफांचा मारा करीत, आणि त्वरेनें मागें परतून सूर्योदयापूर्वीं जर्मनीस परत जात.

३ भर महासागरांत सशस्त्र क्रूझरांच्या साह्यानें ब्रिटिशांच्या व्यापारी जहाजांचा नाश करून त्यांचा व्यापार बुडवावयाचा असा जर्मनीचा तिसरा उद्देश होता. सुधारलेल्या राष्ट्रांमध्यें युद्ध उपस्थित झाल्यास देशांतील रहिवाशी लोकांच्या जमिनीवरील मालमत्तेस धक्का लाविला नाहीं, तथापि समुद्रामध्यें सांपडेल त्या मालमत्तेचा नाश करितां येतो किंवा ती बळजबरीनें हस्तगत करून घेतां येते; मग ती मालमत्ता सरकारची असो कीं खासगी असो. या नियमास अनुसरून जर्मन लोकांनीं ब्रिटिश व्यापाराचा उच्छेद करण्यासाठीं आपली पराकाष्टा केली. तथापि इंग्लिशांच्या सुदैवानें युद्धास सुरवात झाली तेव्हां जर्मनीचीं फारच थोडीं लढाऊ जहाजें बाहेर उघड्या समुद्रावर होतीं. जर्मनीच्या एमडेन नामक जहाजानें हिंदी महासागरांत ब्रिटिशांचीं सुमारें वीस जहाजें बुडविलीं परंतु त्याचा अवतार थोड्याच दिवसांत आटोपला. कॉकॉस बेटांतील बिनतारी संदेशयंत्राचे ठाण्यावर त्यानें हल्ला केला तेव्हां तेथील अधिकाऱ्यांनीं आपल्यावरील संकटाचा संदेश बाहेर पाठविला. या वेळीं सिडने नांवाचें एक ऑस्ट्रेलियन जहाज जवळच होतें त्यास तो संदेश पोंचून तें त्वरेनें त्या स्थळीं येऊन दाखल झालें. यामुळें एमडेनला पळून जाण्यास अवसर मिळाला नाहीं आणि सिडने जहाजानें त्याचा चक्काचूर उडविला. यापुढेंही कित्येक जर्मन जहाजें तटस्थ राष्ट्रांच्या जहाजांसारखीं चिन्हें धारण करून उत्तर समुद्रांतील ब्रिटिश आरमाराच्या गराड्यांतून निसटलीं आणि त्यांनीं अटलांटिक महासागरांत पुष्कळ जहाजें बुडविलीं.

४ ब्रिटिशांचा व्यापार बुडविण्यापेक्षांही एक मोठा बेत जर्मनांच्या मनांत होता. इंग्लंडवर स्वारी करण्याची त्यांना फार दिवस आशा वाटत होती. परंतु ती कशा प्रकारें करावयाची त्यांनीं योजना केली होती हें निश्चयानें सांगतां येत नाहीं. जोंवर सागरावर सर्वत्र ब्रिटिश

आरमाराचें अबाधित प्रभुत्व गाजत आहे तोंवर इंग्लंडवर स्वारी होणें अशक्य आहे. उत्तर समुद्रावर पहारा करणारें प्रबल ब्रिटिश आरमार समोर दिसत असतां कील कालव्याबाहेर पडण्याचें धैर्य जर्मन आरमारास झालें नाहीं. तथापि कोणत्या ना कोणत्या तरी युक्तीनें ब्रिटिश आरमाराचे दोन भाग विलग पाडतां येतील आणि मग त्यांतील लहान भागाशीं आपणांस लढाई करतां येईल अशी जर्मनांस आशा वाटत होती. १९१५ च्या मे महिन्यांत एकदां त्यांचा हा बेत सिद्धीस जातोसें भासलें. सारें जर्मन आरमार बाहेर पडून डेन्मार्कच्या किनाऱ्या किनाऱ्यानें पुढें येत असतां तेथें त्यांची व काहीं ब्रिटिश क्रूझरांची गांठ पडली. तेव्हां जर्मन आरमारानें तत्काळ त्यांवर हल्ला केला. या प्रसंगीं ब्रिटिश क्रूझरें थोडीं होतीं तरी पळून न जातां त्यांनीं लढाईस तोंड दिलें. जर्मन जहाजें आकारानें मोठीं असून संख्येनेंही अधिक होतीं आणि सुरवातीला ब्रिटिशांचें बरेंच नुकसानही झालें. परंतु जेव्हां त्यांच्या आरमाराचा मुख्य भाग त्यांच्या मदतीस आला तेव्हां जर्मनांचा पूर्ण पराभव होऊन त्यांस त्वरेनें जीव घेऊन पळ काढावा लागला. ह्या युद्धास जटलंडचें जलयुद्ध असें म्हणतात. या प्रसंगीं ब्रिटिशांचीं ४ "बे–डर" जहाजें व कित्येक क्रूझरें नाश पावलीं. जर्मनांची हानि किती झाली तें त्यांनीं प्रसिद्ध केलें नाहीं, तथापि त्यांचीं ५ "बे–डर" जहाजें व पुष्कळशीं लहान जहाजें बुडालीं असावीं असा अंदाज आहे. सांप्रतच्या महायुद्धांत झालेलें हेंच सर्वांत मोठें जलयुद्ध होय; आणि या युद्धापूर्वीं ब्रिटिश आरमाराचें समुद्रावर जसें पूर्ण प्रभुत्व होतें तसेंच तें युद्धानंतरही कायम राहिलें.

आतां आपण ब्रिटिश आरमाराचे काय उद्देश होते तें पाहूं:—

१ उत्तर समुद्राची नाकेबंदी करून तेथें कोणत्याही जर्मन जहाजाचा संचार होऊं न देणें हा ब्रिटिश आरमाराचा पहिला उद्देश होता.

२ ब्रिटिश किनाऱ्याचें संरक्षण करून त्यावर समुद्राच्या बाजूनें जर्मनीची स्वारी होऊं न देणें हा त्याचा दुसरा हेतु होता.

हे दोन्ही उद्देश जवळ जवळ पूर्ण सिद्धीस गेले हें आपण पाहिलेंच आहे. कारण, जरी थोडीशीं जर्मन जहाजें ब्रिटिशांच्या गराड्यांतून चोरून निसटून इंग्लंडच्या किनाऱ्यानजीक आलीं तरी जर्मनांनीं फुशारकी मारण्याजोगी कांहींच कामगिरी त्यांचे हातून घडली नाहीं. एकदां हिवाळ्यांतील एके रात्रीं अत्यंत अंधार व धुकें पडलें असतां जर्मनीचीं चार अत्यंत शीघ्रगामी जहाजें चोरून उत्तर समुद्र ओलांडून आलीं, आणि त्यांनीं हार्टलपूल, व्हिटबी, आणि स्कारबरो या ठाण्यांवर तोफांचा मारा केला. तसेंच पुढें एकदां कांहीं जर्मन जहाजें इंग्लंडच्या किनाऱ्यापाशीं आलीं पण ब्रिटिश जहाजांच्या एका काफिल्यानें त्यांचा सुगावा काढून त्यांवर हल्ला केला; तेव्हां जर्मनांचें एक क्रूझर बुडालें व बाकीचीं दोन क्रूझरें अगदीं खिळखिळीं होऊन जेमतेम हेलिगोलँडला परत जाऊन पोचलीं.

३ ब्रिटिश आरमाराचा तिसरा उद्देश म्हटला म्हणजे ब्रिटिश फौज आणि तिला लागणारें सर्व प्रकारचें लष्करी सामान फ्रान्समध्यें आणि इतर निरनिराळ्या देशांत नेलें जात असतां त्याचें संरक्षण करणें हें होय. हीं कामगिरी फारच समाधानकारक रीतीनें बजावण्यांत आली. गेल्या चार वर्षांच्या काळांत लक्षावधि ब्रिटिश सैनिक समुद्र ओलांडून निरनिराळ्या देशांत जाऊन उतरले पण त्यांपैकीं अगदींच थोडे लोक समुद्रांत बुडून मेले.

या गोष्टींनीं आपणास बलाढ्य आरमाराची खरी किंमत काय आहे हें कळून येतें. इंग्लंडच्या बलाढ्य आरमारानेंच जर्मन स्वारीपासून त्याचा बचाव केला. त्याच्याच बळावर ब्रिटिश सैनिकांस स्वदेशसंरक्षणार्थ बेल्जममध्यें आणि फ्लांडर्समध्यें जाऊन लढतां आलें. आणि अलीकडे

तर जर्मन पाणबुड्यांची पर्वा न करितां मित्रराष्ट्रांच्या खांद्याशीं खांदा लावून लढण्यासाठीं लक्षावधि अमेरिकन सैनिक युरोपांत येत असतां त्यांची नेआण करण्याचे कामीं त्याची फार मदत झाली.

४ भर समुद्रावर जर्मन आरमाराशीं दोन हात करावयास ब्रिटिश आरमार फार उत्सुक होतें. पण अशी संधि त्यास जटलंडच्या जल-युद्धाखेरीज मुळींच मिळाली नाहीं. तथापि दुसऱ्याही कांहीं बारीक सारीक आरमारी झटापटी झाल्या त्या आपण विसरतां कामा नये. युद्धास सुरवात होऊन थोडे दिवस होतात न होतात, तोंच दक्षिण पॅसिफिक महासागरांत व्हालॅपरिसोनजीक जर्मन जहाजांच्या एका बलाढ्य काफिल्यानें चार ब्रिटिश जहाजांचा पराभव केला; पण पुढें लवकरच ब्रिटिशांच्या दुसऱ्या काफिल्यानें त्याच जर्मन काफल्यावर फॉकलंड बेटांपाशीं हल्ला करून त्यांतील एकाखेरीज बाकीचीं सारीं जहाजें बुडविलीं.

जटलंडचें जलयुद्ध झाल्यापासून पुढें केव्हांही जर्मन आरमार उघड्या समुद्रावर ब्रिटिश आरमारापुढें येण्यास धजलें नाहीं. पण ब्रिटिश आर-मारानें मात्र मोठ्या धाडसानें शत्रूवर हल्ले केले. १९१८ च्या एप्रिल महिन्यांत एके दिवशीं रात्रीं ब्रिटिश जहाजांचा एक लहानसा तांडा डोव्हर येथून निघून त्यानें बेल्जम किनाऱ्यावरील जर्मनांनीं हस्तगत केलेल्या झीब्रूज नामक मजबूत आरमारी ठाण्यावर हल्ला केला. गोळ्यांचा गारांसारखा वर्षाव होत असतांही ब्रिटिश लोकांनीं तेथें प्रत्यक्ष किना-ऱ्यावर उतरण्याचें धाडस करून तेथील तोफांचा नाश केला आणि बंदरांतील बांधकामाचा व जर्मन जहाजांचा विध्वंस केला. नंतर आपलें एक जहाज मुद्दाम मागें ठेवून त्या बंदराचें तोंडच बंद होईल अशा प्रकारें तेथें बुडवून, हीं ब्रिटिश जहाजें शत्रूचा मारा सोसूनही सुरक्षित-पणें परत येऊन पोंचलीं. ब्रिटिश नाविकांनीं केलेल्या या शौर्याच्या व

धाडसाच्या कृत्यापेक्षां जास्त मोठें कृत्य इतिहासांत क्वचितच नमूद असेल. तसेंच ह्या कामगिरीच्या योगानें ब्रिटिश जनतेला जितका हर्ष झाला तितका या युद्धांतील दुसऱ्या कोणत्याही विजयानें झाला नाहीं.

५ जर्मनीचा कोंडमारा करणें ही ब्रिटिश आरमाराची आणखी एक कामगिरी होय. जेव्हां एकाद्या बंदराचा किंवा देशाचा कोंडमारा करितात तेव्हां तटस्थ राष्ट्राचे जहाजांस सुद्धां तेथें जाण्यास मज्जाव असतो. युद्ध सुरू झालें तेव्हां ब्रिटिशांनीं जर्मन बंदरांचा असा कोंडमारा केल्याचें जाहीर केलें नाहीं; तर फक्त युद्धोपयोगी माल मात्र तेथें जाऊं देण्यास मनाई केली. अशा प्रकारें मना केलेल्या जिनसांची त्यांनीं एक यादी तयार करून तेवढ्यांसच मनाई आहे म्हणून जाहीर केलें, आणि तेच पदार्थ तेवढे घेऊन जाणारीं तटस्थांचीं जहाजें पकडण्यास प्रारंभ केला. तथापि अन्नसामुग्री आणि कापूस वगैरे कित्येक जिन्नस यांस त्यांनीं बंदी केली नव्हती.

पुढें कांहीं काळानें खुद्द जर्मनीच्याच वागणुकीमुळें इंग्लिशांस ह्या मना केलेल्या जिनसांच्या यादींत आणखी कित्येक पदार्थांचा समावेश करावा लागला. जर्मन सरकारनें आपल्या देशांतील सर्व खाण्यापिण्याचे पदार्थ लष्करी नियमाखालीं घेतले, तेव्हां अन्नसामुग्रीही युद्धोपयोगी पदार्थांत गणिली पाहिजे असें इंग्लिश सरकारनें ठरविलें आणि जर्मनीचा पूर्ण कोंडमारा केल्याचें जाहीर केलें. यावर जर्मनीनेंही आम्हीं ब्रिटनचा कोंडमारा केला आहे असें जाहीर केलें! परंतु जर्मनीचीं लढाऊ जहाजें संख्येनें कमी असून तीं कील कालव्याबाहेर काढण्याचें त्यांस धैर्य नव्हतें, अर्थात् ब्रिटिश बेटांचा कोंडमारा केल्याचें जर्मनीनें जें जाहीर केलें तें प्रत्यक्ष अमलांत आणावयास पाणबुड्यांशिवाय दुसरें साधन नव्हतें. आणि पाणबुड्यांचा उपयोग केल्यामुळें जर्मनीचे हातून युद्धाचे नियम अनेक प्रकारें मोडले गेले. व्यापारी जहाजांवर हल्ला

करण्यापूर्वीं त्यांवरील उतारू व नाविक यांच्या सुरक्षिततेची कांहीं तजवीज करतां यावी म्हणून त्यांस हल्ला करण्यापूर्वीं कांहीं वेळ आगाऊ इशारा देणें जरूर असतें. तथापि जर्मन लोकांनीं बिलकुल इशारा न देतां व्यापारी जहाजें टॉर्पेडो मारून बुडविलीं. आणि त्यांवरील उतारू व खलाशी यांस वांचविण्याचा काडीमात्र प्रयत्न न करितां त्यांस पाण्यांत तसेंच धडपडत राहूं दिलें. इतकेंच काय, पण इस्पितळी जहाजांवर हल्ला न करण्याची सर्व राष्ट्रांनीं कबूली दिलेली असतांही जर्मनांनीं तीं जहाजें देखील बुडविलीं आहेत ! अशा रीतीनें वागण्यापासून सर्व देशांतील लोक भयानें उद्विग्न होत असतांही त्याची पर्वा न करितां जर्मनीनें ब्रिटिशबेटांकडे येणारें व तेथून जाणारें प्रत्येक जहाज बुडविण्याचा हुकूम देऊन अधिकाधिक पाणबुड्या पाठविण्याचा क्रम सुरू ठेविला ! आमच्या पाणबुड्या १९१७ सालीं ब्रिटिशांची उपासमार करतील अशी जर्मनांनीं बढाई मारिली होती; आणि त्यांच्या पाणबुड्यांपासून उद्भवणारें संकटही फार मोठें होतें यांत संशय नाहीं. पण त्याचे निवारणार्थ ब्रिटिश आरमारानें अत्यंत जागरूक राहून प्रयत्न चालविला, आणि नवीन जहाजें बांधण्याचा उद्योगही त्यांजकडून फार झपाट्यानें करण्यांत आला. या दोन उपायांच्या योगानें १९१८ सालीं जर्मन पाणबुड्यांचें हें संकट नाहींसें झालें असें आपणांस म्हणतां येईल. इंग्लिश आरमाराकडून उत्तरोत्तर अधिकाधिक पाणबुड्यांचा नाश करण्यांत येऊं लागला, आणि पाणबुड्या जितकीं जहाजें बुडवीत त्यांहून अधिक जहाजें नवीं बांधलीं जाऊं लागलीं. अमेरिकनांस आपलें सैन्य फ्रान्समध्यें आणावयास आपण प्रतिबंध करूं अशीही जर्मनीस खात्री वाटत होती. पण या बाबतींत देखील ब्रिटिशांनीं त्यांचें कांहीं चालूं दिलें नाहीं. ब्रिटिशांच्या सैन्यवाहक जहाजांनीं फ्रान्समध्यें अमेरिकन सैन्याचा एवढा मोठा प्रवाह एकसारखा सुरू ठेविला,

कीं युद्धाच्या अखेरच्या मोहिमेंत दोस्तसैन्यांस जरूर तर मदत करावयास २० लक्षांवर अमेरिकन सैनिक त्यांच्या पाठीशीं हजर होते !

ब्रिटिश किनाऱ्याचे व जहाजांचे संरक्षणाबद्दल केवळ सरकारी आरमाराचेच आभार मानून भागणार नाहीं. तर त्यास या कामीं विशेषतः उत्तर समुद्रांत ज्या दुसऱ्या शेंकडों जहाजांनीं मदत केली त्यांचेही आपण आभार मानिले पाहिजेत. या जहाजांनीं पाणसुरुंग उपटून त्यांचा नाश करण्याचें फार धोक्याचें कर्तव्य बजावलें आहे. आणि दुसऱ्याही पुष्कळ प्रकारें आरमारास मदत केली आहे. हीं जहाजें वास्तविक साध्या खलाशांनीं व कोळ्यांनींच चालविलीं असतांही त्यांनीं मोठें कौशल्य, धैर्य, आणि चिकाटी दाखविली आहे. यांपैकीं पुष्कळ जहाजें जर्मनांनीं बुडविलीं तथापि या लोकांचें धैर्य खचलें नाहीं; आणि मेलेल्यांची जागा भरून काढण्यास त्यांस लोकांची उणीव कधीं पडली नाहीं. ब्रिटिश व्यापार चालू ठेवण्यासाठीं समुद्रावरून सफरी करणाऱ्या व्यापारी जहाजांवरील धैर्यशाली खलाशांचेंही ब्रिटिश राष्ट्र फार ऋणी आहे. एका वर्षाच्या अवधींत साधा माल नेणारीं सुमारें सहाशें व्यापारी जहाजें जर्मनांनीं बुडविलीं, त्यांवरील हजारों खलाशी प्राणांस मुकले, आणि दैवयोगानें जे बचावले त्यांचे देखील समुद्रांत कल्पनातीत हाल झाले; तथापि या जहाजांस खलाशांची वाण कधींही पडली नाहीं.

जर्मन लोकांतही धैर्य व उत्साह यांची कमतरता होती असें बिलकूल म्हणतां येत नाहीं; कारण त्यांनीं उत्तरोत्तर अधिकाधिक मोठ्या पाणबुड्या बोटी बांधिल्या. पाणबुड्यांचा उपयोग करण्याचें काम मोठें अवघड व धोक्याचें असतांही त्यांत त्यांनीं सतत प्रयत्नाच्या योगानें मोठें कौशल्य संपादिलें होतें. ब्रिटिश आरमारानें त्यांच्या पुष्कळ पाणबुड्या पकडल्या व बुडविल्या, तथापि नवीन नवीन पाणबुड्या न कचरतां पुनः पुनः येतच राहिल्या. आणि युद्धसमाप्तीपर्यंत त्या ब्रिटि-

शांचीं व्यापारी जहाजें बुडविण्याचें काम करीतच होत्या. तटस्थांच्या इंग्लंडकडे येणाऱ्या जहाजांवर देखील जर्मन पाणबुड्या हल्ले करीत असत. ह्या जर्मन पाणबुड्या पाण्यांत बुडून ब्रिटिश आरमाराचे खाढून त्याचे पार निघून जाऊन केव्हां केव्हां अटलांटिक महासागरांतही फार दूरवर जात! युद्ध सुरू झाल्यावर कांहीं दिवसांनीं जर्मनांनीं आपल्या कित्येक पाणबुड्या जमिनीच्या मार्गानें ऑस्ट्रियन किनाऱ्यावरील पोला बंदरीं व तुर्कांची राजधानी जें कान्स्टँटिनोपल तेथें नेऊन सोडल्याकारणानें भूमध्य समुद्रांतही त्यांचा संचार होऊं लागला. भूमध्यसमुद्रांत आपल्या पाणबुड्या न्याव्या लागतील हें फार दिवसांमागेंच जर्मनांच्या ध्यानीं आलें होतें. कॉर्फ्यू बेटांत जर्मन बादशहाची कांहीं शेतवाडी होती तेथें जर्मनांनीं तेलाचे पुष्कळ खजिने करून ठेविले होते. शिवाय, ईजियन समुद्राच्या खडकाळ बेटांतही त्यांच्या पाणबुड्यांच्या दडावयाच्या पुष्कळ जागा होत्या.

डार्डानेलिसच्या सामुद्रधुनीचा मार्ग खुला करणें हा भूमध्यसमुद्रांतील ब्रिटिश व फ्रेंच आरमाराचा मुख्य उद्देश होता. जर्मन व तुर्क लोकांनीं या अरुंद जलमार्गाच्या संरक्षणाची फारच उत्कृष्ट तजवीज केली होती. त्यांनीं त्याचे दोहों अंगांस किल्ले बांधिले होते आणि सामुद्रधुनींत सर्वत्र पाणसुरुंग पेरून ठेविले होते. जर इंग्लिशांना या सामुद्रधुनींतून मार्ग काढून कॉन्स्टँटिनोपलवर हल्ला करतां आला, तर तुर्कांची हिंमत खचेल, आणि जोंपर्यंत हा मार्ग बंद राहील तोंपर्यंत रशियाचा व्यापार खुंटून राहील, हें ते लोक जाणून होते. ब्रिटिश सरकाराच्या नजरेसही या गोष्टी येऊन त्यांनीं डार्डानेलिसमधून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला. परंतु हें काम त्यांनीं फार उशिरां हातीं घेतलें. शिवाय हें दुर्घट काम केवळ आपल्या आरमाराच्याच साह्यानें करावयाचें त्यांनीं योजिलें. तुर्क लोकांनीं जर्मनांच्या नेतृत्वाखालीं गॅलि-

पोलींतील डोंगरांमधून गुप्त ठिकाणीं पुष्कळ मोठमोठ्या तोफा रोखून ठेविल्या होत्या. ब्रिटिश आरमारास त्या तोफा कोठें आहेत हेंही कळेना, आणि त्यांचा नाशही करतां येईना. शिवाय त्यांच्या पाणसुरुंगांच्या योगानेंही ब्रिटिशांचीं कित्येक मोठीं क्रूझरें बुडालीं. शेवटीं ब्रिटिश व फ्रेंच यांनीं जमिनीच्या बाजूनें डार्डनेलिस सर करावयाचें ठरवून तेथें बरेंच सैन्य उतरविलें; परंतु गॅलिपोलीचें द्वीपकल्प केवळ डोंगराळ असून त्यांत पुष्कळ किल्ले बांधून व तोफा ठेवून त्याच्या संरक्षणाची कडेकोट व्यवस्था केलेली असल्यामुळें ब्रिटिश व फ्रेंच यांच्या अत्यंत निकराच्या हल्ल्यांचाही तुर्कांस प्रतिकार करतां आला. थोड्या महि-न्यांच्या अवधींत ब्रिटिश व फ्रेंच यांचे मेलेले व जायबंदी झालेले मिळून एक लाख लोक कामास आले. शेवटीं १९१५–१६ च्या हिंवाळ्यांत त्यांनीं आपली फौज तेथून काढून सालोनिका येथें नेली.

---

प्रकरण आठवें

# जमिनीवरील युद्ध

## ( अ ) पश्चिम रणक्षेत्र


भूमीवरील युद्धाचा इतिहास लिहितांना देखील आपण पूर्वींचीच पद्धति कायम ठेवून युध्यमान राष्ट्रांचे काय उद्देश होते आणि ते कित-पत सिद्धीस गेले हें पाहण्याचा प्रयत्न करूं; पण यासंबंधानें आपलें वर्णन सदोदित पूर्ण खात्रीलायकच होईल असें म्हणवत नाहीं. कारण उभयपक्षाकडील सेनापतींनीं स्वतः आपल्या योजना जगाला कधींच उघड करून सांगितल्या नाहींत. अर्थात् त्यांचे बेत कसकसे होते हें आपणास निश्चयानें कळणें शक्य नाहीं. त्याचप्रमाणें युद्धांतील हाल-चाली कसकशा झाल्या आणि त्यांचे परिणाम काय झाले हेंही आप-णास नेहमींच कळलें आहे असें नाहीं; आणि सैन्याच्या संख्येसंबंधानें

तर आपण नेहमींच केवळ अंधारांत आहों. तथापि आपणास कांहीं तरी अनुमानें खास बांधितां येतील आणि घडलेल्या गोष्टींची ढोबळ-मानानें तरी रूपरेषा आंखतां येईल.

प्रथम फ्रान्सचा समाचार घेण्याचा जर्मनांचा निश्चय झाला होता असें दिसतें. कारण, रशियाला आपलें सैन्य प्रत्यक्ष कार्यक्षेत्रांत आणावयास कांहीं काळ लागेल असें त्यांस वाटलें. शिवाय त्यांच्या पूर्व सरहद्दीवर संरक्षणाची कडेकोट तयारी असल्यामुळें तिकडे रशियाला फारसें नुकसान करितां येणार नाहीं अशी त्यांची खात्री होती. अर्थात् आपलें बहुतेक सैन्य फ्रान्सवर न्यावयास मुळींच हरकत नाहीं असें त्यांस वाटलें.

फ्रान्स व जर्मनी हे देश जेथें स्वित्झर्लंडला मिळतात तेथें ऱ्हाईन नदीच्या वळणाशीं फ्रान्स व जर्मनी यांचे मधील सरहद्दीस प्रारंभ होतो. तेथून ती व्हॉस्गेस नांवाच्या डोंगराळ प्रदेशांतून वायव्येकडे जाते. पुढें तीस याहून कांहींसा सपाट प्रदेश लागतो. याच प्रदेशांतून ऱ्हाईनला मिळणारी मॉसेल नदी वाहते. त्यानंतर तीस आर्देनीस नांवाचा डोंगराळ व अरण्यमय प्रदेश लागतो आणि त्यापुढें फ्रान्सच्या ईशान्येकडील सपाट प्रदेश लागतो. त्यांतून ती सरहद्द बेल्जम देशास जाऊन मिळते.

या सरहद्दीवर ठिकठिकाणीं फ्रेंचांचे मजबूत किल्ले आहेत. बेलफर्ट हा सर्वांत दक्षिणेकडील किल्ला असून, व्हर्डून हा मध्यभागीं, आणि मॉबॉग हा उत्तरेस बेल्जमचे हद्दीवर आहे. जर्मनांनीं आपल्या सैन्याची एक बगल बेल्जममधून मॉबॉगच्या रोखानें आणि दुसरी बगल लक्सें-बर्गमधून व्हर्डूनकडे चालविली. उत्तरेकडे एलाशॅपेल आणि दक्षिणेकडे मेट्झ हे त्यांच्या सैन्याचे मुख्य तळ होते. एलाशॅपेल आणि मॉबॉग




१९१४ साल चें पश्चिम रणांगण मुख्य किल्ले •

यांचे मध्यें बेल्जमचा कांहीं तटस्थ मुलूख होता. तो कांहीं तासांच्या आंत ओलांडून जाण्याचा जर्मनांचा विचार होता.

जर्मनांची तयारी इतकी जय्यत होती, त्यांची संघटना इतकी उत्कृष्ट होती, आणि त्यांनीं इतक्या त्वरेनें हालचाली केल्या कीं ते केवळ कांहीं तासांच्या अवकाशांत बेल्जमच्या सरहद्दीवर येऊन थडकले. परंतु याच थोड्या तासांच्या अवधींत बेल्जमचें सैन्यही जर्मनांचा प्रतिबंध करावयासाठीं कूच करून गेलें. बेल्जमचा लिएज हा मोठा किल्ला काबीज न करितां तसाच मागें राहूं देऊन आपण पुढें चाल करणें मूर्खपणाचें होईल असें जर्मनांस वाटलें. कारण, तेणेंकरून बेल्जम लोकांस आपले पिछाडीकडून आपणांवर हल्ला करितां येईल असें त्यांस वाटत होतें. परंतु जर्मनांच्या वेढ्याच्या मोठ्या तोफा तेव्हां तेथें येऊन पोंचल्या नव्हत्या, म्हणून त्यांनीं लिएजवर पायदळाचे हल्ले चढविले. अशा प्रकारें त्यांनीं तो किल्ला सर केला खरा, पण त्यांत त्यांची प्राण-हानि फार भयंकर झाली.

यापुढें नामूरचा किल्ला लागला तेव्हां जर्मन लोक आपल्या हॉवित्झर तोफा येत तोंपर्यंत थांबले. आणि त्या तोफा येतांच एकदम भडिमार करून त्यांनीं तो किल्ला सर केला. यानंतर त्यांनीं बेल्जमची राजधानी ब्रुसेल्स हस्तगत केली आणि बारा कोट रुपये खंडणी घेऊन तें शहर विध्वंस न करतां राखिलें. तथापि बेल्जमच्या मध्यभागांतील पुष्कळ शहरांची व गांवांची त्यांनीं राखरांगोळी उडविली. बेल्जमच्या चिमुकल्या सैन्यास जर्मनांच्या अफाट सेनेला प्रतिबंध करणें अशक्य होऊन तें लढत लढत उत्तरेस अँटवर्पपर्यंत मागें हटलें.

या अवधींत फ्रेंच लोक आपलें सैन्य एकत्र करीत होते आणि इंग्लंडचें सैन्यही बोलोन येथें उतरलें. आतां बेल्जमवर विजय मिळविण्याचें सोपें काम समाप्त होऊन जर्मनांस त्याहून जोराचा विरोध

होऊं लागला. तथापि त्यांनीं आपली चढाई चालूच ठेविली. आणि मॉबॉगपासून व्हर्डूनपर्यंतच्या साऱ्या अघाडीवर ब्रिटिश व फ्रेंच सैन्यें जर्मनांची लाट थोपवून धरण्यास असमर्थ होऊन धिम्मेपणानें मागें हटूं लागलीं.

या वेळीं ब्रिटिश सेनापति सर जॉन फ्रेंच हा होता. त्याजपाशीं अवघें एक लक्ष सैन्य होतें. एवढ्या चिमुकल्या सैन्यानेंही जो चिकाटीनें विरोध केला त्यामुळें जर्मन लोक चिडून जाऊन त्यांनीं त्या साऱ्या सैन्याचा विध्वंस करण्याचा बेत योजिला.

मोठी मजल मारून ब्रिटिश सैन्यानें ता. २२ आगस्ट १९१४ रोजीं बेल्जममधील मॉन्स या ठिकाणीं तळ दिला. तेथें दुसरे दिवशीं सेनापति जॉफ्रे याजकडून जनरल फ्रेंच यास असा संदेश आला कीं दोन लाखांपेक्षां अधिक जर्मन सैन्य उत्तरेकडून त्याच्या डाव्या बगलेस वळसा घालीत आहे आणि त्याच्या उजव्या बगलेकडील फ्रेंच सैन्य पराभव पावून पीछेहाट करीत आहे. अर्थात् अशा स्थितींत जनरल फ्रेंच यास आपलें सैन्य मागें घेण्यावांचून गत्यंतर राहिलें नाहीं. म्हणून तारीख २४ रोजीं त्यानें सूर्योदयींच आपलें सैन्य हालवून मॉबॉगचा किल्ला गांठला. परंतु जर्मनांनीं तेथेंही त्यास वेढण्याचा प्रयत्न केला; आणि तारीख २५ रोजीं तेथें उभयतांचें भयंकर युद्ध झालें. तथापि ब्रिटिश सैन्यानें तेथूनही मोठ्या शिताफीनें निभावून आपली पीछेहाट केली आणि त्याच दिवशीं सायंकाळीं तें कँब्रे येथें येऊन दाखल झालें. येथेंही त्यांस थांबणें शक्य झालें नाहीं. तारीख २६ रोजीं ब्रिटिश सैन्यानें विसावा न घेतां अहोरात्र पीछेहाट चालू ठेविली; मग तारीख २७ व २८ रोजीं त्यांस फ्रेंचांकडून कांहीं कुमक मिळाली. या वेळीं ब्रिटिश सैन्य मॉन्सपासून ७० मैलांवर कॉंपिएन्य येथें जाऊन पोंचलें. हा वेळपर्यंत अत्यंत निकराचे हल्ले त्यांनीं मागें परतविले होते आणि

या फार लांब व अत्यंत शीण आणणाऱ्या पीछेहाटींत त्यांचें जबर नुकसान झालें होतें; तथापि आतां त्या सैन्यास भीति उरली नाहीं.

या चढाईंत जर्मनांचीही भयंकर प्राणहानि झाली. त्यांच्या सैनिकांच्या लाटांमागून लाटा ब्रिटिशांच्या आघाडीवर येऊन आदळल्या; पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. शिवाय, तेही इतके थकून गेले होते कीं त्यांस चढाई पुढें चालू ठेवणें शक्य नव्हतें.

कॉंपिएन्य येथें पोंचल्यावर ब्रिटिश सैन्य संकटापासून मुक्त झालें. फ्रेंचांनीं अमीन्स येथून सैन्य आणून तें त्यांच्या डाव्या बगलेस ठेविलें आणि मग उभयतांचें सारें सैन्य दक्षिणेकडे मागें हटून ऐनी आणि मार्न या नद्यांचे पलीकडे गेलें.

पुढें जर्मनांनीं ऱ्हीम्स हें ठाणें काबीज केलें. तेव्हां कदाचित् पॅरिस जर्मनांच्या हातीं जाईल अशी फ्रेंच सरकारास भीति पडून त्यांनीं आपले सरकारी कागदपत्र गुंडाळून, आणि फ्रेंच बँकेनें सोनेंरुपें जमा करून, तेथून दूर अंतरावर बोर्दो येथें प्रयाण केलें. व जरूर पडल्यास तात्पुरती तेथेंच फ्रान्सची राजधानी करावी असेंही ठरविण्यांत आलें. या वेळीं जर्मन लोक पॅरिस पासून अवघे दहा मैलांच्या आंत येऊन थडकले होते आणि तेथून ते लवकरच पॅरिसवर मारा सुरू करतील व मोठ्या डौलानें त्या शहरांत प्रवेश करतील अशी त्या वेळीं भीति वाटणें अवास्तव नव्हतें.

तथापि सुदैवानें या वेळीं जर्मन लोक फारच थकून गेले होते. ते विश्रांति न घेतां सतत महिनाभर लढत होते आणि त्यांचे बरोबरचा दारूगोळा व अन्नसामुग्री संपुष्टांत आली होती. यामुळें पॅरिसच्या वेढ्याचें काम आपल्या हातून रेटेल कीं नाहीं याची त्यांस शंका वाटली. कदाचित् याच कारणानें त्यांची उजवी बगल आग्नेयीकडे त्यांच्या डाव्या बगलेकडे वळून पॅरीस पासून दूर दूर जाऊं लागली.

ही जर्मनांची पीछेहाट सप्टेंबरच्या तिसऱ्या तारखेस सुरू झाली. आणि लगेच पॅरिसपाशीं तळ देऊन राहिलेलें फ्रेंच सैन्य पुढें होऊन जर्मनांच्या पिछाडीवर तुटून पडलें. या वेळीं जर्मनांचा तळ मार्न नदीवर होता आणि म्हणूनच या वेळीं झालेल्या लढाईस मार्नची लढाई असें म्हणतात. या लढाईंत जर्मनांचा पूर्ण पराभव होऊन ते उत्तरेकडे मागें हटूं लागले. येथेंच लढाईचा फांसा उलटला असें म्हणतां येईल. आणि जर्मनांस पॅरिस काबीज करण्याची कल्पना सोडून देऊन आत्मसंरक्षणाचाच विचार करावा लागला.

जर्मनांनीं फार व्यवस्थितपणें आपली पीछेहाट चालविली. आणि तारीख ७ सप्टेंबरपासून पुढें प्रत्यहीं त्यांचें फ्रेंचांशीं निकराचें युद्ध होत होतें, तरी त्यांची व्यूहरेषा अखंड राहिली. शेवटीं जर्मन लोक ऐनी नदी ओलांडून तिच्या उत्तर तीरावरील बळकट जागा धरून बसले.

जर्मनांनीं या वेळीं दाखविलेल्या असाधारण दूरदर्शित्वाची स्तुति करावी तितकी थोडीच आहे. त्यांनीं आधींच ठरवून ठेविलें होतें कीं यदाकदाचित् पॅरिसवरील मोहिमेंत आपणास माघार घ्यावी लागलीच तर ऐनी नदीचें उत्तरतीर हें बचाव करण्यास फार मजबुतीचें ठिकाण आहे. आणि या धोरणानें बचावाची तयारीही त्यांनीं तेथें फार उत्तम करून ठेविली होती. या वेळीं त्यांनीं त्या रेषेची उत्तम तटबंदी केली आणि आपणावर समोरून हल्ला येणें केवळ अशक्य करून टाकिलें. याच सुमारास उत्तरेकडे जर्मन लोकांनीं अँटवर्प वर चाल करून तें मोठें शहर लवकरच हस्तगत केलें.

यानंतर उत्तरेस समुद्राकडे आणि दक्षिणेस व्हॉस्गेसच्या बाजूला असंख्य खंदक तयार करण्यांत आले. लवकरच हिंवाळा सुरू झाला आणि दोन्हीं दळें आपआपल्या जागीं खंदक तयार करून लढूं लागलीं. या खंदकयुद्धपद्धतीचें इतिहासांत वर्णिलेल्या पुष्कळ वेढ्यांशीं कांहीं

अंशीं साम्य आहे, परंतु कोणत्याही वेळ्यांत इतक्या मोठ्या सैन्याचा उपयोग केला गेलेला नाहीं. या खंदकांमध्यें सैनिक रात्रंदिवस राहतात, तेथेंच निजतात, आपलें अन्न व इतर सामान तेथेंच ठेवतात, आणि युद्धपरिषदाही तेथेंच भरवितात ! जमिनीखालीं तयार केलेल्या या खोल्यांतून विजेचे दिवे लाविलेले असतात आणि एका खंदकांतून दुसऱ्या खंदकांत टेलिफोननें संदेश पाठविण्याचीही व्यवस्था केलेली असते ! कांहीं खंदक तर इतके काळजीपूर्वक बांधलेले असतात कीं ते राहण्यास सुखाचे आहेत असेंही म्हणतां येईल. तथापि बहुतेक खंदक अगदीं भिकार स्थितींत असून पाण्यानें, बर्फानें, किंवा चिखलानें भरलेले असतात. अशा खंदकांतून सैनिकांचे कितीही हाल होत असले तरी त्यांस आपल्या संरक्षणाची तजवीज केल्याशिवाय खंदकांतून बाहेर पडतां येतच नाहीं. कारण, विरुद्ध बाजूचे खंदक कित्येक वेळां इतके जवळ असतात कीं एका पक्षाकडील लोक आपल्या खंदकांत काय बोलतात तें दुसऱ्या पक्षाच्या खंदकांत ऐकूं देखील जातें ! शिवाय आधुनिक अग्न्यस्त्रांचा नेम इतका अचूक असतो कीं खंदकांच्या बाहेर जरा डोकें काढलें पुरे कीं मृत्यु आलाच म्हणून समजावें.

अशा स्थितींत युद्ध तरी कसें चालविलें जातें असा प्रश्न येथें उद्भवणें साहजिक आहे.

१. खंदकांमध्यें परिवीक्षण यंत्राचा उपयोग करून त्यांच्या योगानें वरील जमिनीवर चाललेल्या सर्व गोष्टींचें परावर्तन करून त्या खंदकांतूनच पाहतां येतात. खंदकांपुढील तटांच्या झरोक्यांमधून रायफल बंदुका व यांत्रिक तोफा ठेविलेल्या असतात; त्यांचा या परिवीक्षण यंत्राच्या साह्यानें शत्रूवर अचूक मारा करितां येतो.

२. या पद्धतीच्या युद्धांत बॉंबगोळ्यांचा फार उपयोग करितात. आणि हे गोळे आपल्या खंदकामधून शत्रूच्या खंदकावर हातांनींच फेंकतात.

३. शत्रूच्या खंदकाखालीं सुरुंग भरून ते उडवितात. आणि त्यांच्या स्फोटानें पडलेलें खिंडार काबीज करण्यासाठीं सैनिक पुढें चाल करून जातात.

४. खंदकांच्या पिछाडीस कित्येक मैलांवर प्रचंड तोफखाना असतो त्यांतून शत्रूंच्या खंदकावर मारा करून त्यांस त्या खंदकांमधून पिटाळून लावण्याचा प्रयत्न केला जातो.

५. शत्रूच्या यांत्रिक तोफांच्या माऱ्यांतून पुढें चाल करणें अशक्य आहे असें इंग्लिशांस आढळून येतांच त्यांनीं टँक नांवाचे एक प्रकारचे प्रचंड रथ तयार केले. हे बाहेरून जाड लोखंडी पत्र्यानें मढविलेले असतात. आणि आंतील मोठ्या शक्तीच्या इंजिनाच्या जोरानें पाहिजे तसल्या विकट प्रदेशांतून त्यांस जातां येतें. या रथांत बसून इंग्रज लोक यांत्रिक तोफांचा अखंड मारा करीत प्रत्यक्ष शत्रूच्या खंदकांपर्यंत चाल करून जात आणि त्यांच्या मागोमाग दुसरे सैनिक त्यांच्या मदतीस व शत्रूवर हल्ला करण्यास पुढें सरसावत. अलीकडे जर्मन लोकांनीं देखील ही कल्पना उचलून आपले स्वत:चे टँक तयार केले होते.

प्रस्तुत युद्धांत रात्रीचे हल्ले नेहमींच चालू असून शत्रूची व्यूहरेषा मागें सारण्याच्या हेतूनें उभयपक्षाकडून मोठ्या प्रमाणावर हल्ले चढविण्यांत आले, अशा हल्ल्यांपैकीं पुढील हल्ले विशेष महत्त्वाचे होत:—

१. १९१४ सालीं जर्मनांनीं इप्रेवर केलेला हल्ला. मार्नची लढाई झाल्यावर ब्रिटिश सैन्यानें ऐनी नदीवरून उत्तरेस फ्लांडर्समध्यें जाऊन इप्रेनजीक तळ दिला. तेथें त्यांच्या बाजूस बेल्जमचें सैन्य होतें. ही व्यूहरेषा फोडून कॅले बंदर गांठण्याच्या उद्देशानें जर्मन लोक इप्रेवर तुटून पडले, आणि त्यांनीं सतत पंधरा दिवस फार निकरानें हल्ला चालविला. त्याचा एवढाच परिणाम झाला कीं उभयपक्षाकडील कित्येक

लोक युद्धांत पडले व घायाळ झाले. पण जर्मनांना आपला हेतु सिद्धीस नेतां आला नाहीं.

२. १९१५ सालचे नॉव्हशॅपेल आणि लूस यांवरील ब्रिटिशांचे हल्ले. हे हल्ले फार दिवस सुरू असून अत्यंत निकराचे होते. शेवटीं ह्या हल्ल्यांत ब्रिटिशांस कळून चुकलें कीं ज्या खंदकांपुढें कांटेरी तारांचीं कुंपणें घातलेलीं असतात व मागें आधुनिक प्रचंड तोफा असतात असल्या खंदकांची मोठी मालिका केवळ पायदळाच्या जोरानें सर करणें अशक्य आहे.

३ शँपेनमध्यें फ्रेंचांनीं जर्मनांवर केलेला हल्ला. १९१५ सालांतील सर्व हल्ल्यांत हाच विशेष यशस्वी झाला. या हल्ल्यांत पुष्कळ जर्मन लोक पकडून कैद करण्यांत आले, आणि जर्मनांस थोडेंसें मागेंही हटावें लागलें पण त्यांची व्यूहरेषा फुटली नाहीं.

४ जर्मनांचा व्हर्डूनवर हल्ला. या हल्ल्याची तयारी जर्मनांनीं १९१५ च्या हिंवाळ्यांत केली. आणि हिंवाळा संपून बर्फ वितळूं लागण्यापूर्वींच १९१६ च्या फेब्रुवारींत हल्ल्यास सुरवात केली. व्हर्डून हें शहर फार मजबुतीचें असून त्याचे सभोंवतीं किल्ल्यांचा वेढा आहे; आणि याच्या आसपासचे प्रदेशांत चोहोंकडे पुष्कळ टेकड्या असून त्यांवर दाट झाडी आहे. अशा प्रकारचा प्रदेश हल्ला चढविण्यास फार सोईचा असतो; आणि जर्मनांनीं या हल्ल्यांत यश मिळविण्यासाठीं फार जय्यत तयारीही केली होती. त्यांनीं प्रथम आपल्या असंख्य तोफांनीं फ्रेंच किल्ल्यांवर गोळ्यांचा अव्याहत मारा केला; आणि जेव्हां त्या किल्ल्यांतील संरक्षक सैन्याचा पुरा विध्वंस झाला असें त्यांस वाटलें तेव्हां त्यांचे हजारों सैनिक ते किल्ले काबीज करण्यासाठीं पुढें सरसावले. परंतु या कामांत त्यांस यश आलें नाहीं. फ्रेंचांचा तोफखाना जर्मनांच्या तोडीचाच होता; तथापि जर्मन लोक तोफांचा भडि-



जर्मन लड़ाक सिपाही

मार करीत असतां फ्रेंच लोक छिद्रांतून दडून बसले. आणि जेव्हां जर्मनांचें पायदळ पुढें सरसावलें तेव्हां फ्रेंचांनीं यांत्रिक तोफांनीं त्यांचा संहार केला. या प्रसंगीं व्हर्डूनपाशीं जर्मन सेनापतीनें आपले जितके सैनिक बळी दिले तितके दुसऱ्या कोणत्याही सेनापतीनें केव्हांही दिल्याचें इतिहासांत नमूद नाहीं.

एकेक पाऊल पुढें टाकीत जर्मन लोक व्हर्डूनपासून ३ मैलांवर येऊन ठेपले. परंतु इतक्यांत सॉमनदीवरील जर्मन सैन्यावर ब्रिटिशांनीं इतक्या जोराचा हल्ला चढविला कीं जर्मनांस आपली व्हर्डूनकडील कांहीं फौज काढून तिकडे पाठविणें भाग पडलें. तसेंच फ्रेंचांनीं जर्मनांचा प्रतिकार करण्यांत जें अलौकिक सामर्थ्य दाखविलें तें पाहून जर्मनांचें धैर्य गळून गेलें, आणि व्हर्डून सर करण्याची आशा त्यांनीं समूळ सोडून दिली. पुढें कांहीं आठवड्यांनीं म्हणजे १९१६ च्या शरद् ऋतूंत फ्रेंचांनीं एकदम पुढें घुसून जर्मनांनीं काबीज केलेल्या जवळच्या साऱ्या प्रदेशांतून त्यांस हुसकून मागें लाविलें.

१९१६ सालीं आरासच्या दक्षिणेस सॉमनदीवरही भयंकर रणसंग्राम झाला. या ठिकाणीं जर्मनांनीं तयार केलेले खंदक कल्पना होणार नाहीं इतके मजबूत होते. जमिनीखालीं तयार केलेलीं कांहीं कांहीं दालनें इतकीं विस्तीर्ण होतीं कीं त्यांत हजारों सैनिक सहज राहूं शकतील ! या भुयारांतील तळचे सैनिक व दारूगोळा जमिनीच्या पृष्ठभागाशीं आणावयास तेथें विजेचे पाळणे तयार केले होते. ब्रिटिश व फ्रेंच लोकांनीं या ठाण्यांवर हल्ला केला तेव्हां जर्मनांनीं मोठ्या चिकाटीनें त्यांचें संरक्षण केलें. तोफेच्या गोळ्यांचा कित्येक आठवडेपर्यंत एकसारखा वर्षाव झाल्यामुळें शेवटीं हे खंदक अजीबात ढासळले आणि मग संयुक्तांचे पायदळानें त्यांवर हल्ल्यांमागून हल्ले केले. याप्रमाणें हल्ले करीत असतां हजारों सैनिक पतन पावले तथापि संयुक्तांचें धैर्य खचलें नाहीं

आणि शेवटीं त्यांनीं जर्मनांस तेथून थोडेंसें मागें लोटिलें. ही गोष्ट १९१६ च्या शरद् ऋतूंत घडली. पुढें सारा हिंवाळा जर्मनांनीं विचार करण्यांत घालविला, आणि शेवटीं या ठिकाणची आपली आघाडी त्यांनीं आपण होऊनच मागें घेतली. ते अशी माघार घेतील असें संयुक्तांस वाटलें नव्हतें. माघार घेण्याचें त्यांनीं कां ठरविलें हें निश्चयानें सांगवत नाहीं, पण इतकें खरें कीं त्यांनीं आपली ही पीछेहाट फारच कौशल्यानें केली; आणि पाठीमागें तयार करून ठेविलेल्या नव्या व्यूहरेषेवर थांबून तेथें त्यांनीं आपला बचाव केला. ह्या रेषेसच हिंडेनबुर्ग-रेषा असें म्हणतात.

या अवधींत संयुक्त राष्ट्रें कांहीं स्वस्थ बसलीं नव्हतीं. त्यांनीं १९१७ सालच्या उन्हाळ्यांतील मोहिमेची तयारी चालविली होती; व १९१७ च्या वसंतास प्रारंभ होतांच या तयारीचें प्रत्यंतर दिसून आलें. या वेळीं ब्रिटिशांनीं आरासच्या उत्तरेकडील व्हिमी नांवाची टेकडी आणि इप्रेजवळची मेसीन्स नांवाची टेकडी अशा दोन टेकड्या काबीज केल्या. हीं दोन्हीं अभेद्य ठाणीं तटबंदीविषयीं प्रख्यात असून त्यांचा प्रत्येक लहानसहान भागही अभेद्य होता. पण ब्रिटिश वैमानिकांनीं कित्येक महिने निरीक्षण करून त्यांची पूर्ण माहिती मिळविली; सैन्यांतील प्रत्येक मनुष्यास आपणास हल्ला करावयास कोठें जावयाचें आहे हें नेमकें कळावें म्हणून त्या स्थलांचे नमुने तयार करण्यांत आले; आणि सहा महिने खपून मेसीन्सच्या खालीं एक फार अवाढव्य सुरुंग तयार करण्यांत आला. शेवटीं ज्या क्षणीं हा सुरुंग खालून उडविण्यांत आला त्याच क्षणीं टेकडीच्या माथ्यावर हजारों टन तोफेचे गोळे फेंकण्यांत आले. ह्या हल्ल्यांत ब्रिटिशांची भयंकर प्राणहानि झाली खरी पण त्यांनीं तेथील साऱ्या जर्मन शिबंदीचा नि:पात केला. ही टेकडी १९१८ च्या वसंतापर्यंत ब्रिटिशांच्या हातीं राहिली.

लेन्स शहराभोंवतींही फार निकराचें युद्ध झालें. या शहराभोंवतीं पुष्कळ खाणी असून येथील लहान मोठें प्रत्येक घर म्हणजे एकेक किल्लाच बनलें होतें. तथापि ब्रिटिश लोकांनीं एकेक पाऊल जागा सर करीत याच्या उपनगरांत प्रवेश केला. समुद्रकिनाऱ्या लगत फ्लँडर्सच्या मैदानावरही असेंच तुंबळ युद्ध झालें. या प्रदेशांत टेकड्या मुळींच नाहींत पण चिखलाचे भयाण प्रदेश आहेत. त्यांत मधून मधून शेतांत बांधलेलीं घरें होतीं; त्यांस या वेळीं तटबंदी केलेली असून तेथें यांत्रिक तोफा ठेविलेल्या होत्या. वरील दोन्ही ठिकाणीं ब्रिटिशांस थोडेसे विजय मिळाले पण शत्रूची फळी फोडतां आली नाहीं.

दक्षिणेस ब्रिटिशांप्रमाणेंच फ्रेंचांनींही तेथील जर्मन व्यूहरेषेवर चाल केली. लेऑनपासून व्हर्डूनपर्यंत ऐनी नदीच्या किनाऱ्यानें चाल करण्याची कामगिरी त्यांवर सोंपविण्यांत आली असून त्या नदीच्या उत्तर तीरावर ओळीनें असलेल्या टेकड्या सर करणें हा त्या कामगिरींतील पहिला भाग होता. शत्रूंचा सप्पा उडविणारे अचानक हल्ले करण्यांत फ्रेंच लोक प्रवीण आहेत. असलाच एक हल्ला करून त्यांनीं तेथें आपला पाय शिरकावून प्रारंभ तर चांगला केला; पण जर्मनांनीं पुनः पुनः बेजबर फेरहल्ले केल्यामुळें फ्रेंचांचें अतोनात नुकसान होऊन त्यांची प्रगति खुंटली. तथापि १९१७ च्या आगस्टमध्यें व्हर्डूनच्या उत्तरेस त्यांनीं शत्रूवर झडप घालून महत्त्वाचे विजय मिळविले.


याप्रमाणें १९१७ सालीं संयुक्तांवर शत्रूचे हल्ले न होतां मुख्यत्वें तेच शत्रूवर हल्ले करीत असून त्यांत त्यांना किंचित् यशही मिळत गेलें. परंतु इतक्यांत तिकडे रशिया पूर्ण चीत झाल्यामुळें जर्मनांना आपलें अवाढव्य सैन्य पूर्व रणक्षेत्रावरून काढून पश्चिम रणक्षेत्रावर आणतां आलें. यामुळें १९१८ सालीं संयुक्तांस उघडच बचावाचें धोरण स्वीकारावें लागेल असें वाटूं लागलें. या वर्षी वसंत ऋतूंत

जर्मनांनीं संयुक्तांहून फार मोठ्या सैन्याचा जमाव करून त्यांच्या आघाडीवर निरनिराळ्या ठिकाणीं कित्येक जोराचे हल्ले केले. ह्या वेळीं सर्व संयुक्तराष्ट्रांस चिंतेनें ग्रासून टाकिलें होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं. जर्मनांचे हल्ले यशस्वी होऊन त्यांनीं अनेक ठिकाणीं संयुक्तांस कित्येक मैल मागें लोटिलें; संयुक्तांची प्राणहानिही फार होऊन पुष्कळ सैन्य व तोफा शत्रूच्या कबजांत गेल्या; आणि जर्मन लोक १९१४ सालानंतर पुन्हां केव्हांही आले नव्हते इतके पॅरिसच्या जवळ येऊन पोंचले. पण ब्रिटिश आणि फ्रेंच यांचें धैर्य मुळींच खचलें नाहीं. शिवाय याच वेळीं अमेरिकेचें ताज्या दमाचें लक्षावधि सैन्य फ्रान्सांत येऊन उतरत असल्यामुळें त्यांस नवा जोम चढत चालला.

जर्मनीचा शेवटचा हल्ला जुलै महिन्यांत र्‍हीम्सच्या सभोंवतीं झाला; पण येथें आधीं त्यांच्या कल्पनेंतही न आलेल्या गोष्टी त्यांस दिसून आल्या. फ्रेंच व अमेरिकन सैन्यांनिशीं सेनापति फॉक हा मार्न नदी उतरून आलेल्या जर्मन सैन्यावर अचानक तुटून पडला, आणि त्यानें त्यांची भयंकर प्राणहानि करून त्यांस त्या नदीच्या पार पिटाळून लाविलें. १९१४ सालापासून या वेळ पावेतों इतका तीव्र प्रहार जर्मनांस केव्हांही सहन करावा लागला नव्हता आणि या हल्ल्याच्या योगानें प्रस्तुत युद्धांतील शेवटच्या मोहिमेचें पारडें एकदम पालटलें. जरूर पडल्यास अमेरिकन शिलकी सैन्य आपल्या पाठीशीं आहे तेव्हां आतां आपणास आपल्या मनोदयानुरूप गोष्टी घडवून आणतां येतील असें मार्शल फॉक यानें जाणलें, आणि ऑगस्टपासून नोवेंबरच्या प्रारंभापर्यंत साऱ्या आघाडीवर कोठेंही त्यानें जर्मन सेनेस पळाचीही विश्रांति मिळूं दिली नाहीं. साऱ्या विस्तीर्ण पश्चिम रणांगणावर सर्वत्र दोस्तांचीं सैन्यामागून सैन्यें जर्मनांवर तुटून पडलीं आणि त्यांनीं प्रत्येक हल्ल्यांत विजय संपादिला. चालू वर्षाच्या प्रारंभीं जर्मनांनीं जो मुलूख

जिंकिला होता तो सारा त्वरेनें काबीज करण्यांत आला, आणि त्याच्याही पलीकडील मोठीं शहरें व तटबंदीच्या जागा दोस्तांचे हातीं येऊं लागल्या. दक्षिणेस अमेरिकनांनीं सेंट मिहीलचा प्रदेश सर केला. मध्यभागीं फ्रेंच व ब्रिटिश यांनीं सेंट क्वेंटिन, दूआय, केंब्राय, आणि लिले हीं ठाणीं घेतलीं. उत्तरेस बेल्जन, ब्रिटिश व फ्रेंच सैन्यानें रूलर्स, कूर्तराय, आणि ब्रजेस हीं महत्त्वाचीं शहरें काबीज करून बेल्जमचा मोठा प्रदेश शत्रूचे हातून सोडविला; इतकेंच नव्हे, तर बेल्जमच्या समुद्र किनाऱ्यावरून जर्मनांस पार हुसकून लावून त्यांचीं पाणबुड्या ठेवण्याचीं बंदरें जीं झीब्रुग व ऑस्टेंड तींही काबीज केलीं. हजारों जर्मन सैनिकांस पकडून कैद करण्यांत आलें आणि त्यांच्या हजारों तोफा व अपार रणसाहित्य दोस्तांच्या हातीं लागलें. दोस्तांच्या तोफांचा अनिवार प्रहार, त्यांच्या अग्निरथांचे हल्ले, आणि पायदळाची तडफ व शौर्य, यांपुढें जर्मनांची प्रख्यात हिंडेनबुर्गरेषा, किंवा गेल्या चार वर्षांत त्यांनीं आपलें सारें शास्त्रज्ञान खर्चीं घालून तयार केलेलीं इतर मजबुतीचीं ठाणीं, यांचा कांहींच निभाव लागला नाहीं; आणि शेवटीं जर्मनांचा पराभव होऊन त्यांस त्वरेनें पळ काढावा लागला.

दोस्तांच्या सैन्यानें जर्मनी देश प्रत्यक्ष पादाक्रांत करण्यापूर्वींच युद्धाची समाप्ति झाली. बल्गेरिया, तुर्कस्थान व ऑस्ट्रिया ह्या मित्रांनीं जर्मनीस सोडिलें, रणांगणावर त्यांचा पराभव झाला, दोस्तांनीं केलेल्या कोंडमाऱ्यानें तर सारे लोक जेरीस आले, आणि एकंदर जर्मन लोकांस यापुढें टिकाव धरणें अशक्य झालें. शेवटीं जर्मनींत राज्यक्रांति घडून आली. केसर बादशहानें राज्यत्याग करून हॉलंडमध्यें पलायन केलें आणि जर्मनींत नवीन स्थापन झालेल्या सरकारनें अमेरिकेच्या अध्यक्षाच्या मार्फत दोस्तराष्ट्रांकडे युद्ध तहकुबीची याचना केली. जर्मनीच्या प्रतिनिधींस जर्मनांच्या व दोस्तांच्याही व्यूहरेषेच्या मागें मार्शल फॉक


रिगाचें आखात
रिगा
द्विना नदी
द्विन्स्क
बाल्टिक समुद्र
कोनिग्सबर्ग
डानूझिग
जर्मनी
कोव्हनो
व्हिला
टानेनबर्ग
थोर्न
ग्रोड्नो
मिन्स्क
रशिया
वॉरसॉ
ब्रेस्ट लिटोव्हस्क
पिंस्क
प्रिपेट नदी
लोड्झ
पोलंड
लुब्लिन
कोव्हेल
क्रॅको
गॅलिशिया
प्रेझमिसल
लेम्बर्ग
टार्नोपोल
कार्पेथिअन पर्वत
हंगेरी
नीस्टर नदी
शर्नोविट्झ

पूर्व रणांगण

याच्या मुख्य ठाण्यावर येण्याची आज्ञा झाली, आणि तेथें ता. ११ नोवेंबर रोजीं युद्धतहकुबीच्या करारावर सह्या झाल्या.

या करारांतील अटींवरून पाहतां जर्मनीनें आपला पूर्ण पराभव झाल्याचें कबूल केलें. त्यांनीं आपला बहुतेक तोफखाना दोस्तांचे हवालीं केला. ऑल्सेस व लॉरेन हे प्रांत व ऱ्हाईन नदीचे पश्चिमेकडील जर्मनीचा सारा प्रदेश दोस्तांच्या सैन्यानें आपल्या ताब्यांत घ्यावा, आणि पक्या तहाच्या अटी ठरत तोंपर्यंत ऱ्हाईन नदीचें पूर्वतीरही दोस्तांच्या सैन्याचे हुकमतींत असावें असें जर्मनीनें मान्य केलें. शिवाय जर्मनीनें आपल्या आरमाराचा मोठा भाग व पाणबुड्या दोस्तांचे हवालीं केल्या. याप्रमाणें चार वर्षांवर युद्ध झाल्यानंतर न्याय व स्वातंत्र्य यांचे पक्षास मानवी प्रगतीच्या शत्रूंवर विजय मिळाला.

## ( आ ) पूर्व रणक्षेत्र

यूरोपांतील पूर्व रणक्षेत्रांतील युद्धाचें पर्यालोचन करण्यापूर्वीं त्या बाजूची मोठी नदी जी व्हिस्टयूला ती कसकशी वाहते हें प्रथम पाहिलें पाहिजे. या नदीच्या कांठीं थॉर्न, वॉर्सा, व क्रॅको हीं तीन शहरें असून तीं अनुक्रमें जर्मनी, रशिया, व ऑस्ट्रिया यांचे ताब्यांत होतीं. या नदीचा सारा पाणवठा सपाटीचा असून त्याचा सर्व विस्तार सैन्याच्या हालचाली करण्यास सोईचा आहे. फक्त प्रशियाचा ईशान्य भाग सरोवरें व दलदली यांनीं व्यापलेला असल्यामुळें येथेंच काय ती हालचाली करण्यास अडचण पडते. तथापि याही प्रदेशांत जर्मनांनीं सैन्य व दारूगोळा इकडून तिकडे सहज नेतां येईल अशा प्रकारचें आगगाडीच्या रस्त्यांचें एक जाळेंच निर्माण केलें; यामुळें या प्रांतांत कोणत्याही ठिकाणीं त्यांस वाटेल तेव्हां आपलें सैन्य एकत्र जमवितां आलें.

पोलंडमध्यें आगगाडीचे रस्ते आधींच फार थोडे असून प्रस्तुत युद्धांत तेही बहुधा नादुरुस्त झाले आहेत. पण आगगाडीच्या रस्त्यांचा

अभाव रशियाच्या पथ्यावरच पडला. कारण आगगाड्यांच्या अभावीं जर्मनांस आपल्या तोफा व दुसरी जड यंत्रसामग्री या प्रदेशांतून नेणें फार कठीण गेलें. अन्यपक्षीं रशियापाशीं मोठ्या तोफा मुळींच नसल्यामुळें आगगाड्या नसल्या तरी त्याचें फारसें बिघडलें नाहीं.

पूर्व रणक्षेत्राचे स्थूलमानानें तीन विभाग करितां येतील. त्यांतील प्रत्येक भागांत घडलेल्या महत्त्वाच्या गोष्टींचा आतां आपण विचार करूं.

प्रशियाच्या पूर्वभागांत हालचालींस प्रथम सुरवात झाली. रशियाची युद्धाची तयारी नसून त्यास प्रशियावर हल्ला करतां येणार नाहीं अशी पुष्कळ लोकांची कल्पना होती. परंतु जेव्हां जर्मनांनीं फ्रान्सवर हल्ला केला तेव्हां रशियानें कल्पनेच्या बाहेर वेगानें चाल करून जर्मन सैन्याचा कांहीं भाग पश्चिमेकडून पूर्वेकडे खेंचण्यासाठीं पूर्वप्रशियावर सैन्य रवाना केलें. हें धोक्याचें काम हातीं घेतांना त्यास कदाचित् जर्मनराष्ट्राच्या सामर्थ्याची खरी कल्पना आली नसावी. प्रारंभीं प्रारंभीं रशियनांस जय मिळाला पण पुढें जर्मन सेनापति हिंडेनबुर्ग यानें त्यांचा टॅनेन्बर्ग येथें पराभव करून त्यांची अत्यंत हानि केली.

यानंतर जर्मनांनीं पोलंडवर स्वारी करून त्वरेनें वॉर्सा शहराकडे चाल केली. या मोहिमेंत ग्रँड डयूक निकोलस हा रशियाचा सेनापति असून त्यानें आपण हिंडेनबुर्गच्या तोडीचे सेनापति आहों असें सिद्ध केलें. १९१४ च्या शरद् व हेमंत ऋतूंत तीन वेळां जर्मन लोक वॉर्सावर चाल करून आले पण तितक्याही वेळां त्यांस हार खावी लागली. शेवटीं १९१५ च्या ग्रीष्म ऋतूंत त्यांनीं फिरून वॉर्सावर चढाई केली तेव्हां मात्र त्यांस यश आलें. परंतु या मोहिमेचें वर्णन करण्यापूर्वीं ऑस्ट्रियाच्या गॅलिशिया प्रांतांत कसकसा प्रकार घडला तें पाहिलें पाहिजे.

१९१४ सालीं रशियन लोकांनीं गॅलिशियावर मोहीम करून तींत बरेंच यश संपादिलें. लेंबर्ग नांवाचें मोठें शहर रशियाचे हस्तगत झालें; आणि क्रॅको शहरही लवकरच पडेल असा रंग दिसूं लागला. प्रेझमिझलचा एवढा मोठा मजबूत किल्ला, पण तोही रशियाचे हस्तगत होऊन तेथील एक लक्ष ऑस्ट्रियन शिबंदी कैद झाली; आणि रशियाचें सैन्य कार्पेथियन पर्वताच्या माथ्यापर्यंत पोंचून १९१५ च्या वसंतास प्रारंभ होतो न होतो, तों रशियन लोक हंगेरी देशांत उतरतील असें वाटूं लागलें. परंतु याच वसंताच्या प्रारंभाला रशियन लोक मागें आपल्या देशांत आपल्या बचावाचा विचार करीत आहेत असें दृष्टीस पडलें.

नादान सेनापतींच्या हातीं ऑस्ट्रियाचें सैन्य असतां त्याचा रशियानें पराभव केला होता; पण तेंच सैन्य जेव्हां जर्मन सेनापतींनीं आपल्या हुकमतींत घेतलें तेव्हां तें लवकरच आश्चर्यकारक रीतीनें सांवरून त्यानें रशियास गॅलिशियापार हाकून लाविलें. याच वेळीं एक उत्तरेकडून व एक दक्षिणेकडून अशीं दोन जर्मन सैन्यें वॉर्सावर चाल करून येऊन त्यांनीं तें शहर हस्तगत केलें (१९१५). मग साऱ्या पूर्व-रणांगणावर जर्मनांची एकदम मोठी मोहीम सुरू झाली. त्यांच्या माऱ्या-पुढें किल्ल्यामागून किल्ले पडत गेले आणि हिंवाळा सुरू होण्यापूर्वींच ते निःसंशय रिगा घेतात असें वाटूं लागलें.

याप्रमाणें पराभवामागून पराभव होत असतांही रशियनांनीं आपल्या सैन्याची फळी फुटूं दिली नाहीं. शत्रूनें त्यांस घेरण्याचा अनेकवार प्रयत्न केला पण तो एकदांही सफल झाला नाहीं. शेवटीं रशियन लोक द्विना नदीच्या कांठीं जाऊन पोंचले आणि तेथें ते मोठ्या शौर्यानें आपला बचाव करूं लागले. जर्मनांनीं त्यांची फळी फोडण्याचा यत्न केला पण तो फार वेळ टिकला नाहीं. त्यांनीं आपली मोहीम

एकसारखी चालू ठेविली असल्यामुळें जर्मन सैन्य अगदीं थकून गेलें होतें. पूर्व रणक्षेत्राच्या दक्षिणभागीं देखील असाच प्रकार घडला. जर्मन लोक वॉर्सा शहराच्या पलीकडे १०० मैलपर्यंत पूर्वेस घुसले; परंतु पुढें प्रिपेटनदीकांठचा दलदलीचा मुलूख लागल्यामुळें आणि हिंवाळाही नजीक येऊन ठेपल्यामुळें त्यांची प्रगति थांबून ती मोहीम तशीच पुढें चालविणें त्यांस अशक्य झालें.

उभय पक्षांनीं तो हिंवाळा उघड्या मैदानांत काढला. त्यांत एकदां रशियन लोकांनीं दक्षिणेकडे घुसण्याचा प्रयत्न केला; पण वसंत किंवा ग्रीष्म ऋतु सुरू होऊन पुरानें जलमय झालेला प्रदेश कोरडा होईतों कांहीं करतां येणें शक्य नाहीं असें त्यांस आढळून आलें. मग रशियानें आपले सैन्याची पुनः जय्यत तयारी करण्याकडे राहिलेल्या हिंवाळ्याचा उपयोग केला. शस्त्रास्त्रांची उणीव हेंच आपणावर संकटें येण्याचें मुख्य कारण होय ही गोष्ट रशियनांनीं ओळखली; पण रशिया हा मुख्यत्वें कृषिप्रधान देश असल्यामुळें आपल्या देशांत ही उणीव त्वरेनें भरून काढणें त्यांस शक्य नव्हतें. अन्यपक्षीं, परदेशांतून शस्त्रास्त्रें आणविणेंही तितकें सोपें नव्हतें. दार्दानेलिसचा मार्ग तुर्कांचे ताब्यांत असल्यामुळें रशियाचा भूमध्यसमुद्रांत प्रवेश होणें अशक्य होतें. आर्कैजलचें बंदर हिंवाळ्यांत गोठलेलें असतें, आणि पॅसिफिक महासागरावरील त्यांचें बंदर जें व्लॅडिव्होस्टॉक त्याची देखील हिंवाळ्यांत तीच स्थिति असते. या कारणांमुळें दोस्तराष्ट्रांपैकीं जपानशिवाय दुसऱ्या कोणाकडूनही रशियनांस दारूगोळ्याची मदत मिळणें शक्य नव्हतें.

१९१५ सालीं रशियावर ओढवलेल्या अनर्थांतून वर डोकें काढणें त्यास शक्य नाहीं अशी जर्मनांची समजूत झाल्यामुळें ते स्वस्थ बसले; पण या बाबतींत त्यांची चूक झाली. १९१६ च्या उन्हाळ्यांत रशि-

यन लोकांनीं बुखोव्हिना प्रांतावर चाल करून झर्नोविट्झ काबीज केलें आणि पुन्हां लेंबर्ग सर करण्यासाठीं ते पुढें चालून आले. ते पुन्हां कार्पेथिअन गांठतात अशीही आशा दिसूं लागली. पण याही प्रसंगीं जर्मनांनीं ऑस्ट्रियास कुमक पाठवून रशियाची प्रगति कुंठित केली. रशियन लोक शर्तीनें लढले पण त्यांचा हंगेरींत प्रवेश झाला नाहीं.

या मधल्या अवकाशांत रुमानियास युद्धांत पडण्याविषयीं फार निकड लावण्यांत आली होती. रशियनांनीं गॅलिशियावर हल्ला चढविला तेव्हांच रुमानियन लोक त्यांस मिळते तर तें शहाणपणाचें झालें असतें; पण जेव्हां जर्मनांनीं रशियाची गति कुंठित केली त्या वेळीं रुमानियानें ऑस्ट्रियाविरुद्ध शस्त्र उचलिलें. जर्मन लोक विद्युद्वेगानें रुमानियावर धावून गेले. रशियन लोकांनीं रुमानियाच्या साह्यार्थ पुढें चाल केली; पण जर्मन सेनापति मॅकेन्सन यानें बल्गेरियाच्या एका सेनेचें आधिपत्य स्वीकारून रशियनांचा पाठलाग करीत डोब्रुजा प्रांतांतून उत्तरेकडे चाल केली आणि रुमानियाचीं कान्स्टंझा व झर्नाव्होडा हीं शहरें हस्तगत केलीं. नंतर त्यानें डॅन्यूब नदी ओलांडून रुमानियांत दक्षिणेकडून प्रवेश केला आणि बुखारेस्टही सर केलें. शेवटीं पूर्वेकडील कांहीं भागाशिवाय संपूर्ण रुमानिया देश जर्मनांचे हातीं गेला.

१९१६ सालांतील रशियाची प्रगति एकदम कां थांबली याचें तेव्हां सर्वांस मोठें कोडें पडलें; पण पुढील हिंवाळ्यांत त्याचा उलगडा होऊन १९१७ च्या प्रारंभास रशियामध्यें राज्यक्रांति झाल्याचें जगास कळून आलें. रशियादेशावर फार काळ पावेतों अनियंत्रित बादशाही चालत आली असून त्या बादशहांचे हाताखालीं एक मंत्रिसभा आणि कायमचें अधिकारिमंडळ असे. या राज्यपद्धतीनें सामान्य प्रजाजनांवर फार जुलूम होऊन तिजविषयीं त्यांचे मनांत तिटकारा उत्पन्न झाला होता. शिवाय, त्यांनीं तिचा शेवट करण्याचे पुष्कळ प्रयत्न युद्धापूर्वी

केले होते पण त्यांस केव्हांही यश आलें नव्हतें. परंतु प्रस्तुत युद्धामुळें राज्यक्रांति करूं इच्छिणाऱ्या लोकांस पुन्हां संधि मिळाली. ज्यांत अगदीं सामान्य स्थितींतीलच सैनिक होते अशीं मोठमोठीं सैन्यें या युद्धामुळें एकत्र झालीं; आणि विशेषतः जर्मनांच्या चिथावणीनें त्यांचीं मनें कलुषित होऊन जेव्हां त्यांनीं राज्यक्रांतीचें कार्य हातीं घेतलें तेव्हां त्यांस त्यांत यश मिळवितां आलें. पेट्रोग्राड हेंच या चळवळीचें केंद्रस्थान होतें. तेथें एकाएकीं रशियन बादशहास त्याचे मुख्य मंत्र्यासह कैद करण्यांत आलें आणि सारी सत्ता डयूमा नामक रशियाची पार्लमेंटसभा, आणि कामकरी व सैनिक यांच्या प्रतिनिधींचें मंडल, या दोन संस्थांचे हातीं आली. या दोन संस्थांमध्यें पुष्कळ लोक लढाई चालविण्यास अनुकूल होते. पण लढाई म्हणजे गरीब लोकांवर जुलूम करण्याचें श्रीमंतांच्या हातांतील एक शस्त्रच होय अशीही पुष्कळांची कल्पना होती. सर्व राष्ट्रांमधील गरीब लोकांनीं लढण्याचें नाकारलें तर आपोआप लढाई थांबेल असें त्यांस वाटत होतें; आणि आपण स्वतः लढण्याचें नाकारून या कार्यास प्रारंभ करण्याचा त्यांनीं विचार केला. याच्या योगानें फार गोंधळ माजला, आणि या वेळीं देशांतील पूर्वींच्या सर्व अधिकाऱ्यांचे हातची सत्ता नाहींशी झाल्यामुळें देशांतील मुलकी कारभार चालविण्यास कोणीच अधिकारी नव्हते. अशा प्रसंगीं १९१७ च्या उन्हाळ्यांत रशियन सैन्यानें लढण्याचें बहुतेक सोडून दिलें आणि त्याच वर्षी पुढें युद्ध तहकूब झाल्याचें जाहीर होऊन रशिया व जर्मनी यांमधील तहाच्या वाटाघाटीस सुरवात झाली याबद्दल आपणास आश्चर्य वाटावयास नको.

१९१८ च्या प्रारंभाला ब्रेस्टलिटोव्हस्क येथें तहाच्या करारावर सह्या झाल्या. पण या तहानें रशियास शांतता प्राप्त न होतां तेथें अद्याप बेबंदशाही माजून राहिली आहे; आणि जर्मनीलाही थोडेंसें

सैन्य मोकळें होण्यापलीकडे ह्यापासून फारसा लाभ झाला नाहीं. कारण, पुष्कळसा धान्याचा सांठा आणि इतर जरूरीचे पदार्थांचा पुरवठा आपणास रशियांतून लुबाडतां येईल असें जें जर्मनांस वाटत होतें तें साध्य झालें नाहीं. आणि यापुढें रशियापासून कांहीं लाभ करून घ्यावयाचें जर्मनांचे मनांत आलें असतें तर त्यांना नव्या रशियन सरकाराविरुद्ध उठलेल्या मोठ्या सशस्त्र सैन्यांशीं दोन हात करावे लागते, आणि जपाननें सैबीरियांत उचल केल्यामुळें कदाचित् त्याशींही युद्ध करण्याचा प्रसंग येता. शिवाय जर्मनांस भरसमुद्राशीं येण्यास संधि मिळूं नये म्हणून ब्रिटिशांनीं रशियाच्या उत्तर टोंकास आर्टिक समुद्राचे किनाऱ्यावर आपलें सैन्य उतरलें.

## ( इ ) बाल्कन राष्ट्रें

ऑस्ट्रियाच्या दृष्टीनें सर्व्हियाची गैरवर्तणूक हें युद्धाचें मूळ कारण असल्यामुळें सर्व्हियास शासन करणें हा ऑस्ट्रियाचा पहिला उद्देश होता; म्हणून १९१४ सालीं त्यानें सर्व्हियावर फौज रवाना केली. पण तिचा चांगला समाचार घेऊन तीस मागें पिटाळण्यांत आलें. ऑस्ट्रियानें दुसरी स्वारी केली पण तिचीही हीच स्थिति झाली. पुढें जर्मनी ऑस्ट्रियाचे मदतीस आला आणि बल्गेरियानेंही सर्व्हियावर शस्त्र उगारलें. तेव्हां १९१५ च्या शरदृतूंत सर्व्हियाचा पूर्ण विध्वंस होऊन या स्वारीचा शेवट झाला.

या कामीं दोस्त राष्ट्रांकडे बराच ठपका येतो. संयुक्तांचें सैन्य यापूर्वीच सॅलोनिकाला उतरलेलें होतें हें खरें आहे, पण सर्व्हियाचे मदतीस जाण्यासाठीं जी मोठी चढाई करावी लागली असती ती शिरावर घेण्याइतकी त्या सैन्याची तयारी नव्हती. शिवाय दोस्त राष्ट्रांस असा विश्वास वाटला कीं बल्गेरियन लोक तटस्थ राहतील, किंवा ते लढाईंत पडल्यास ग्रीस तरी सर्व्हियाशीं केलेल्या तहास अनुसरून


त्याचे मदतीस येईल. परंतु प्रत्यक्ष प्रकार असा घडला कीं बल्गेरियानें सर्व्हियाविरुद्ध लढाई पुकारली आणि ग्रीस देशानें सर्व्हियाला मदत करण्यासाठीं कांहींच हालचाल केली नाहीं; अर्थात् याचा परिणाम असा झाला कीं सर्व्हियाचा नि:पात उडाला. सर्व्हियन सैन्य शेवट-पर्यंत लढून आल्बानियाचे डोंगरांमधून समुद्रकिनाऱ्यापर्यंत आलें. तेथून त्यांस दोस्तांनीं काढून कॉर्फ्यू या बेटांत नेऊन ठेविलें. मागें सर्व्हियांतील बिनलढाऊ नागरिकांस त्यांचे जुने वैरी जे बल्गेरियन त्यांचे तावडींत सांपडून अमर्याद हालअपेष्टा सोसाव्या लागल्या.

या प्रसंगीं ग्रीक लोकांनीं केलेलें वर्तन अत्यंत नीचपणाचें होतें. मागील बाल्कन युद्ध समाप्त झालें तेव्हां ग्रीक लोकांनीं सर्व्हियाशीं तह करून बल्गेरियानें सर्व्हियावर स्वारी केल्यास सर्व्हियाला मदत करण्याचें आश्वासन दिलें होतें. पण जेव्हां हें अभिवचन पुरें करण्या-विषयीं दोस्तांनीं ग्रीसला सांगितलें तेव्हां त्यानें ती गोष्ट अमान्य केली. याचें मुख्यत्वें इतकेंच कारण होतें कीं ग्रीसच्या राजाचा ओढा जर्मनीकडे होता. या राजाच्याच वजनामुळें कित्येक ग्रीक प्रजाजनांचीही जर्मनी-विषयीं सहानुभूति उत्पन्न होऊन प्रस्तुत युद्धांत जर्मनीच विजयी होणार अशी त्यांची समजूत झाली होती. बल्गेरियन हे ग्रीस व सर्व्हिया या उभयतांचेही शत्रु होते; आणि याप्रसंगीं त्या आपल्या शत्रूचा चुराडा उडविण्याची व आपले जुने दोस्त जे सर्व्हियन लोक त्यांस साह्य करण्याची उत्कृष्ट संधि ग्रीक लोकांपुढें चालत आली होती. पण जर्मनीच्या भीतीमुळें त्यांस ती साधण्याचें धैर्य झालें नाहीं. ग्रीक लोकांनीं सर्व्हियाशीं केलेल्या या दगलबाजीच्या वर्तनामुळें सारें जग त्यांचा तिरस्कार करूं लागलें. तथापि सुदैवानें पुष्कळ ग्रीक लोकांस या वर्तनाची लाज वाटली. त्यांनीं राजास घालवून दिलें आणि आपली फौज दोस्तांच्या मदतीस सॅलोनिका येथें पाठविली.

सर्व्हियाचें चिमुकलें सैन्य कॉर्फ्यू बेटांतून परत आणण्यांत आलें. तेव्हां त्यानें बल्गेरियापासून मोनॅस्टिर शहर जिंकून घेतलें. परंतु ब्रिटिशांचें व फ्रेंचांचें जें मोठें सैन्य मॅसिडोनियांत होतें त्यानें या वेळीं विशेष हालचाल केली नाहीं. शेवटीं १९१८ च्या शरद् ऋतूंत त्या सैन्यानें पुढें चाल करून १२० मैलांच्या आघाडीवर ऑस्ट्रियन व बल्गेरियन सैन्यावर हल्ला केला आणि त्याचा पूर्ण पराभव करून टाकिला. बल्गेरियन सैन्याची फाटाफूट होऊन त्याचे दोन भाग एकमेकांपासून अलग झाले आणि तो देश ता० ३० सप्तेंबर रोजीं बिनशर्त शरण आला. या विजयाच्या योगानें तुर्कस्थान आपल्या दोस्तांपासून अलग पडला आणि हाल अपेष्टा भोगणारे सर्व्हियन लोक आपला देश जिंकून बसलेल्या ऑस्ट्रियनांस तेथून हांकून देण्यास समर्थ झाले.

## ( ई ) तुर्कांशीं युद्ध

तुर्कांचा प्रारंभापासूनच युद्धांत पडण्याचा बेत होता हें आतां आपणांस कळून आलें आहे. पण बहुधा युद्धाच्या साहित्याचे तुटवड्यामुळें त्यांस आपला बेत बराच लांबणीवर टाकावा लागला. इजिप्त देश परत मिळविणें हा त्यांचा मुख्य उद्देश होता. परंतु ब्रिटिशांनीं मेसॉपोटेमियावर मोहीम केल्यामुळें आणि गॅलिपोलींत दोस्तांचें सैन्य उतरल्यामुळें तुर्कांचें बहुतेक सारें चांगलें सैन्य या दोन ठिकाणीं गुंतून गेलें. जर्मनीनें अधिकारी, द्रव्य व दारूगोळा यांचा तुर्कांस भरपूर पुरवठा केला पण सैनिकांची मदत त्यास केव्हांच करतां आली नाहीं. या कारणांमुळें इजिप्तवर हल्ला चढविण्यास योग्य असें सैन्य तुर्कांस उभारतां आलें नाहीं. तुर्कांनीं सुवेजच्या कालव्यापर्यंत मजल मारिली होती परंतु ब्रिटिशांनीं हिंदी सैन्याच्या मदतीनें त्यांचे कालवा ओलांडण्याचे सारे प्रयत्न हाणून पाडिले.


काळा समुद्र
ट्रेबिझॉन्ड
रिझे
बैबुरी
कार्स
टिफ्लिस
एरीवान सरोवर
अश्कला
हसनकला
एर्झेरुम
क्निस
मेलझघर्ट
युफ्रेटीस नदी
सारपूत
मूश
व्हान सरोवर
बिट्लिस
वास्तान
सर्त
जुल्फा
आरास नदी
ताब्रिझ
उरुम्या सरोवर
कास्पिअन
समुद्र
रेश्त
निसबिन
मोसल
रवणदुझ
काझविन
तेहेरान
खानिकिन
कसर-इ-शिरीन
हमदान
कांगावर
केरमानशाहा
बुरुजिर्द
सुलतानाबाद
बगदाद
टेसीफोन
कुट एल
अमारा
शेख साद
दिझफुल
अहवाझ
बसरा
मोहमेरा
इराणचें
आखात
इंग्रजी मैल
० ५० १०० १५०

मेसॉपोटेमिया

१९१४ सालच्या नोवेंबरचे प्रारंभीं मेसॉपोटेमिया जिंकण्यासाठीं हिंदुस्थानांतून जी फौज रवाना करण्यांत आली तिला चांगला जय मिळाला. बस्रा सर करून जयावर जय मिळवीत हें सैन्य बहुतेक बगदादपाशीं येऊन थडकलें; पण युद्ध आणि रोगराई यांच्या योगानें या सैन्यांत फार प्राणहानि झाल्यामुळें आणि तुर्कांचें सैन्य दिवसें दिवस वाढत चालल्यामुळें नोवेंबर १९१५ त टेसिफोनची लढाई झाल्यावर ब्रिटिशांस माघार घेणें भाग पडलें व कूट एलअमरा या ठिकाणीं हें सैन्य तुर्कांच्या वेढ्यांत सांपडलें. तेथें ब्रिटिश व हिंदी फौजेनें आपला बचाव करण्याचे कामीं मोठें शौर्य दाखविलें. पण त्यांच्या मुक्ततेसाठीं दक्षिणेकडून निघालेल्या सैन्याची तुर्क लोकांनीं मुळींच प्रगति होऊं दिली नाहीं. शेवटीं वेढ्यांत सांपडलेल्या सैन्याजवळची अन्नसामग्री पार संपली तेव्हां एकंदर सहा महिनेपर्यंत वेढ्यांत भयंकर कष्ट सोसल्यावर हें सैन्य शत्रूच्या हस्तगत झालें. ही गोष्ट १९१६ चा एप्रिलांत घडली. यावेळीं ह्या सैन्याची संख्या अवघी नऊ हजारांवर आली होती.

या उन्हाळ्यांत तैग्रीस नदीवरील रणक्षेत्रांत कांहींच बदल झाला नाहीं. शेवटीं चिरापेक्षित चढाईस सुरवात होऊन ब्रिटिश व हिंदी फौजेनें कूटच्या पार मजल मारून १९१७ च्या प्रारंभीं बगदाद शहरांत प्रवेश केला. या मोठ्या विजयानंतर त्यांनीं त्याचेही उत्तरेस मजल मारून आणखी विजय संपादिले, आणि इ. स. १९१८ च्या ऑक्टोबरांत तुर्क लोक शरण येण्याचे कांहीं दिवस अगोदर जनरल मार्शल यानें मेसॉपोटेमियांतील उरलेल्या सर्व तुर्की सैन्याचा पुरता विध्वंस केला.

आशियामायनरमध्यें तुर्क आणि रशियन यांच्यामध्यें ज्या लढाया झाल्या त्यांत कधीं तुर्कांस तर कधीं रशियनांस जय मिळत गेला;

पण शेवटीं १९१६ च्या फेब्रुवारींत एर्झेरुम हा मोठा किल्ला रशियानें सर केला. हा किल्ला अतिशय डोंगराळ प्रदेशांत असून हजारों फूट उंच आहे; आणि येथें बर्फ इतकें पडतें कीं हिंवाळ्यांत या बाजूला कांहीं एक हालचाल करणें शक्य नाहीं असेंच साहजिकपणें वाटतें. परंतु सकृद्दर्शनीं भासणाऱ्या या अशक्यतेमुळेंच तुर्क लोक बेसावध होते. आणि अशा वेळीं रशियन लोकांनीं दडत दडत बर्फांतून पुढें सरून शत्रूवर अचानक निकराचा हल्ला करून तो किल्ला सर केला. यानंतर रशियन लोकांनीं काळ्या समुद्रावरील ट्रेबिझाँड हें बंदर काबीज केलें. अशा प्रकारें संपूर्ण आर्मेनिया प्रांत रशियाचे ताब्यांत गेला. या प्रांतांत पुष्कळ खिस्ती धर्माचे लोक रहात असून कित्येक शतकें त्यांस तुर्कांचा जुलूम सोसावा लागला आहे. प्रस्तुत युद्धाचे प्रसंगीं तर तुर्कांनीं या आर्मेनियन लोकांच्या कत्तली करून त्यांस बहुतेक नामशेष करून टाकिलें.

१९१७ त रशियाची दैना उडाल्यावर आशियामायनरकडील कांहींच बातमी कळली नाहीं, तथापि तुर्कांनीं लवकरच तो सारा प्रदेश आक्रमिला असावा. इराणामध्येंही त्यांनीं गडबड उडवून ब्रिटिशांस भय उत्पन्न केलें; पण मध्यंतरीं इतरत्र अशा गोष्टी घडल्या कीं त्यांच्या योगानें रशियाच्या दैनेमुळें झालेली दोस्तांची हानि सव्याज भरून निघाली.

पॅलेस्टाइनमधून ईजिप्तवर हल्ला करण्याचे कामीं तुर्कांस कसें अपयश आलें हें आपण वर पाहिलेंच आहे. या पॅलेस्टाइन प्रांतांतच ब्रिटिशांनीं तुर्कांवर शेवटचा हल्ला केला. इ. स. १९१७ त ब्रिटिश आणि हिंदी सैनिकांची एक मोठी सेना इजिप्तमध्यें जमविण्यांत आली; तिनें तुर्कांस पॅलेस्टाइनमध्यें फार दूरवर पिटाळून लाविलें. ब्रिटिश सेनापति जनरल अलेंबी यानें त्याचसालीं दिसेंबर महिन्यांत जेरुसलेम

हें पवित्र शहर काबीज केलें, आणि इ. स. १९१८ सालीं बराच काळपावेतों पॅलेस्टाइन प्रांताच्या पूर्व हद्दीवर तो मजबूत आघाडी धरून बसला. अखेर सतेंबर महिन्यांत त्यानें तुर्कांवर भयंकर प्रहार करून त्यांचा नि:पात उडविला. यावेळीं ७० हजार तुर्क कैद करण्यांत आले आणि विशेष प्रतिबंध न होतां ब्रिटिश सैन्य दमास्कस व अलेपो शहरांपर्यंत चालून गेलें ! या पराभवानें तुर्क लोक पुरते जेरीस येऊन ता० ३१ ऑक्टोबर रोजीं बिनशर्त शरण आले.

## ( उ ) इटली

इटॅलियन लोकांनीं युद्धांत प्रवेश करतांच ऑस्ट्रियावर हल्ला करावयास उत्तर व ईशान्य सरहद्दीवर आपलें सैन्य रवाना केलें. हा प्रदेश उंच उंच पर्वतांनीं व्यापलेला असून ऑस्ट्रियन लोकांनीं जर्मनांच्या नेतृत्वाखालीं तेथील प्रत्येक खिंडीस तटबंदी केली होती. इटॅलियन लोकांची हळू हळू प्रगति होत होती. परंतु १९१६ च्या मे महिन्यांत ऑस्ट्रियानें त्यांवर भयंकर हल्ला करून त्यांस मागें इटलीच्या सपाट प्रदेशांत हाकून लाविलें. तथापि इटॅलियनांनीं पुन्हा आपल्या सैन्यांत नवीन भर घालून ऑस्ट्रियनांस परत सरहद्दीवरील पर्वतांपर्यंत मागें रेटिलें आणि गॉरिट्झ हें महत्त्वाचें शहर सर केलें. परंतु जर्मनांचे हस्तकांनीं रशियाप्रमाणेंच इटलींतही पाताळयंत्रीपणा चालविला होता. त्यांस या कारस्थानांत यश येऊन इटॅलियन सैन्यावर त्याचा परिणाम झाला, आणि १९१७ च्या अखेरीस जेव्हां ऑस्ट्रियानें जर्मनीची मदत घेऊन या सरहद्दीवर सर्वत्र मोठा हल्ला केला तेव्हां तो पूर्ण यशस्वी झाला. या वेळीं इटलीचा पुरता विनाश होण्याची वेळ आली होती; पण फ्रेंच व ब्रिटिश यांच्या मोठ्या फौजा त्याच्या बचावार्थ आल्प्स पर्वत ओलांडून ऐन वेळेवर येऊन पोंचल्या म्हणून ती निभावली. तेव्हांपासून इटलीला पुन्हा नवीन जोम येऊन १९१८ च्या जूनमध्यें

ऑस्ट्रियानें त्यावर जो हल्ला केला तो जर्मनांच्या फ्रान्सवरील हल्ल्या-प्रमाणें त्यांच्याच आंगावर जोरानें उलटला; आणि इटॅलियनांनीं शत्रूंचें जबर नुकसान करून त्यांचा पिआव्ह नदीपार पाठलाग केला.

इटलींतील युद्धाचा शेवट अचानकपणानें झाला. ऑक्टोबरमध्यें ब्रिटिश व फ्रेंच यांच्या मदतीनें इटॅलियनांनीं निर्धारानें पुढें चाल केली आणि ती पूर्णपणें यशस्वी झाली. ऑस्ट्रियन सैन्य कचाटींत सांपडलें आणि त्यांपैकीं ३ लक्ष सैनिक पाडाव झाले. त्यांचें बाकीचें सैन्यही शस्त्र खालीं ठेवण्यास अत्यंत उत्सुक झालें होतें. शेवटीं नोवेंबरचे प्रारंभीं ऑस्ट्रियन लोक बिनशर्त शरण आले आणि त्यांच्या बादशहानें गादीचा राजीनामा दिला. बल्गेरिया व तुर्कस्थान यांचे पराभवानंतर लवकरच ही गोष्ट घडून आली, आणि तिच्या योगानें जर्मनांचा शेवटला आधार तुटून त्यांचाही लवकरच निःपात उडणार हें निश्चित झालें.

## ( ऊ ) वसाहती

युद्ध सुरू झालें तेव्हां जर्मनीचे ताब्यांत आफ्रिकेंतील पुढील प्रदेश होते:—१ कामेरून, २ जर्मन नैर्ऋत्य आफ्रिका, आणि ३ जर्मन पूर्व आफ्रिका. एक वर्ष लढाई करून फ्रेंच व ब्रिटिश सैन्यानें कामेरूनची वसाहत काबीज केली. जर्मन नैर्ऋत्य आफ्रिका केप कॉलनीच्या सैन्यानें सर केली. जर्मन पूर्व आफ्रिकेंत जर्मनांची विशेष मजबुती असल्यामुळें ती पूर्णपणें जिंकून घेण्यास तीन वर्षें निकराचें युद्ध करावें लागलें. सांप्रत ही वसाहत ब्रिटिशांच्या ताब्यांत आहे.

अगदीं पूर्वेकडे जपानी लोकांचें फार दिवसांपासून जर्मनीशीं रहस्य नव्हतेंच. त्यांनीं ब्रिटिशांमागून लवकरच जर्मनीविरुद्ध युद्ध जाहीर केलें आणि त्वरेनें चीनमधील सिंगटौ नामक जर्मनांच्या वसाहतीवर हल्ला करून थोडे दिवस वेढा दिल्यावर ती काबीज केली.

पॅसिफिक महासागरांत सॅमोआ हें जर्मनीच्या ताब्यांतील मुख्य ठिकाण होतें. शिवाय त्या महासागरांतील कांहीं लहान लहान बेटांवर जर्मनांचीं बिनतारी संदेशयंत्रांचीं ठिकाणें होतीं. हीं सर्व ठिकाणें ऑस्ट्रेलियन लोकांनीं आपल्या कबज्यांत घेतलीं आहेत.

---

प्रकरण नववें

# युद्धनीति

## ( अ ) जर्मनी

रानटी लोकांचें आपआपसांत युद्ध होतें तेव्हां ते परस्परांचा पूर्ण उच्छेद करण्याचा प्रयत्न करितात. ते आपल्या शत्रूंचीं घरें व त्यांच्या शेतांतील उभीं पिकें जाळतात, मिळेल त्या वस्तूंची लूट करितात, आणि पुरुष, बायका, मुलें यांची सरसहा कत्तल उडवितात. पण सुधारलेलीं राष्ट्रें युद्धाचे वेळीं कांहीं नियम पाळतात. हे नियम कांहीं अंशीं भूतदयेच्या प्रेरणेनें आणि कांहीं अंशीं स्वहिताच्या दृष्टीनेंही पाळले जातात. युद्धांत एखाद्या राष्ट्रास फार निर्दयपणानें वागविण्यांत आलें असलें आणि दैववशात् तेंच पुढें यशस्वी झालें तर त्याची सूड घेण्याची वासना दुप्पटीनें प्रबळ होते.

या कारणांमुळें सुधारलेल्या राष्ट्रांमधील युद्धांत रानटी लोकांमधील युद्धापेक्षां भूतदयेचा अंश अधिक असतो. अलीकडे अलीकडे यूरोपांतील राष्ट्रांनीं युद्धपद्धतींत कशी सुधारणा करावी या विषयाचा पुष्कळ विचार केला आहे. या विषयावर प्रथम ग्रंथ लिहिण्याचा मान ग्रोशिअस नामक एका डच मनुष्यास आहे. त्यानें "युद्धकालांतील व शांतताकालांतील जनतेचे हक्क" या नांवाचा एक ग्रंथ केला आणि त्यापासूनच आधुनिक अंतर्राष्ट्रीय कायद्याचा उगम झाला असें मानण्यांत येतें. ग्रोशिअसच्या वेळेनंतर पुढें या कायद्यांत पुष्कळ

सुधारणा झाली असून ह्या विषयावर पुष्कळ ग्रंथही झाले आहेत. पण नुसते ग्रंथ लिहून किंवा युद्धपद्धतींचे नियम ठरवून मुळींच भागत नाहीं, तर ते नियम जगांतील सर्व राष्ट्रांकडून प्रत्यक्ष कृतींत उतरले पाहिजेत.

सर्व सुधारलेल्या लोकांत अशा प्रकारची अंतर्राष्ट्रीय व्यवस्था घडवून आणण्याकरितां त्यांच्या प्रतिनिधींची परिषद् १९०७ सालीं हॉलंडमधील हेग या प्रमुख शहरीं भरविण्यांत आली. युद्धाचे समयीं सर्व राष्ट्रांनीं कोणते नियम पाळणें जरूर आहे हें ह्या परिषदेनें ठरविलें. आणि जर्मनीसुद्धां सर्व मोठमोठ्या राष्ट्रांच्या प्रतिनिधींनीं त्या करारावर सह्या केल्या. तथापि जर्मनीनें स्वत: या करारांतील जवळ जवळ प्रत्येक नियम सांप्रतच्या युद्धांत मोडला आहे ही खेदाची गोष्ट होय.

हेगच्या परिषदेनें ठरविलेले नियम जर्मनी मोडीत आहे अशा जेव्हां प्रथम कागाळ्या येऊं लागल्या तेव्हां त्यांत तथ्यांश कितपत आहे याची चौकशी करण्यासाठीं फ्रेंच व ब्रिटिश लोकांचीं कमिशनें नेमण्यांत आलीं. या कमिशनांमधील सर्व सभासद चांगले सुप्रसिद्ध व जबाबदार लोक असून त्यांनीं केलेला निर्णय अविश्वसनीय आहे असें म्हणतां येणार नाहीं. त्यांच्या निर्णयांत पुढील गोष्टी नमूद आहेत:—

१. जर्मन लोकांनीं पांढरें निशाण व तांबडा क्रूस या चिन्हांचा वारंवार दुरुपयोग केला आहे. पांढरें निशाण दाखविणें ही शरण येण्याची खूण होय. हिचा उपयोग जर्मनांनीं शत्रूस फसवून आपल्या तोफांच्या आटोक्यांत आणण्याकरितां केला आहे. त्याचप्रमाणें दारूगोळा वाहून नेणाऱ्या गाड्यांवर त्यांनीं तांबडे क्रूस लाविलेले आहेत.

२. त्यांनीं इस्पितळांवर मारा केला असून इस्पितळी जहाजेंही बुडविलीं आहेत.

३. लढाईंत पकडलेल्या कैद्यांस त्यांनीं अत्यंत निर्दयपणानें वागविलें आहे. घायाळ होऊन पडलेल्या सैनिकांचे कपडे देखील त्यांनीं हिसकावून घेतले आहेत, आणि त्यांची शुश्रूषा करण्याचें नाकारलें आहे. एका प्रसंगीं तर कैदी लोकांचा जेथें तळ होता तेथें विषमज्वराची सांथ सुरू झाली असतां त्यांनीं तेथील कैद्यांची वास्तपुस्त न घेतां त्यांस औषधपाण्यावांचून व अन्नावांचून मरूं दिलें आहे.

४. प्रत्यक्ष रणांगणांत जर्मनांनीं पुष्कळ आसुरी शस्त्रांचा उपयोग केला आहे. त्यांनीं शत्रूचा निःपात उडविण्यासाठीं विषारी धूर व प्रवाही तप्तरस यांचा उपयोग केला आहे. नैर्ऋत्य आफ्रिकेंत त्यांनीं पाणी पिण्याच्या विहिरींत विषारी पदार्थ टाकिले आहेत. त्यांनीं मोकळ्या समुद्रांत पाणसुरुंग पेरले आहेत. त्यांच्या योगानें त्यांच्या शत्रूंचीं व तटस्थ राष्ट्रांचींही बरींच व्यापारी जहाजें बुडालीं. ब्रिटिश किनाऱ्यावरील बिनतटबंदीच्या शहरांवर त्यांच्या क्रूझरांनीं मारा केला आहे. त्यांच्या झेपेलिनांनीं ब्रिटिशांच्या शहरांवर अंधाऱ्या रात्रीं बांब टाकून शेंकडो निरपराधी लोकांचे प्राण घेतले आहेत. विनाश करणें इतकाच त्यांचा उद्देश असून बायका, मुलें, किंवा वृद्ध लोक या सर्वांचा त्यांनीं सरसकट संहार केला आहे. जर्मन लोकांनीं आगाऊ सूचना न देतां जहाजें बुडविलीं असून लुसिटॅनिया बोट किंवा दुसऱ्या उतारू नेणाऱ्या बोटी बुडवितांना त्यांनीं उतारूंचे प्राण वाचविण्याचा कांहींच प्रयत्न केला नाहीं. सारांश, जर्मन लोकांनीं प्राचीन रानटी लोकांच्या युद्धपद्धतीचें सर्वत्र अनुकरण केलें असून त्यांनीं आपल्या क्रूर कर्मांनीं साऱ्या जगास तिटकारा आणिला आहे.

युद्धाचे वेळीं देशांतील रहिवाशांचे दोन वर्ग करण्यांत येतात; लढाऊ लोक किंवा सैनिक, आणि बिनलढाऊ लोक किंवा नागरिक. यापैकीं दुसऱ्या वर्गांत व्यापारी, शिक्षक, डॉक्टर इत्यादिकांचा समा-

वेश होतो. आतां या दुसऱ्या वर्गांतील लोकांनीं जर जेत्यांस त्रास दिला नाहीं तर त्यांचे प्राण घेणें हें सुधारलेल्या समाजाच्या नियमांस काळोखी आणणारें आहे. जर एकादें सारेंच्या सारें शहर शत्रूचा प्रतिकार करीत असेल तर मात्र तें जाळून टाकण्यास हरकत नसते. परंतु जर्मनांनीं बेल्जममधून चाल करीत असतां दर पावलाला वरील नियमांचा अतिक्रम केला आहे. मधून मधून एकाद्या बेल्जन नागरिकानें क्वचित् त्यांजवर गोळी झाडली असेल हें संभवनीय आहे. पण तेवढ्यावरून लगेच जर्मनांनीं तें सारें शहर जाळून तेथील सर्व रहिवाशांची कत्तल करून राक्षसी सूड उगविला आहे! लोव्हेन नामक बेल्जन शहरांत 'लोव्हेन युनिव्हर्सिटी' नांवाचें प्राचीन इतिहास-प्रसिद्ध विश्वविद्यालय होतें; परंतु जर्मन अत्याचारांपुढें हें शहरही निभावलें नाहीं.

जर्मन लोक आपल्या बुद्धिमत्तेबद्दल व व्यवहारकुशलतेबद्दल मोठा अभिमान बाळगतात. पण हे दोन्ही गुण त्यांनीं जिंकलेल्या देशांचा विध्वंस करण्याचे कामीं मात्र उत्तम रीतीनें प्रगट केले आहेत. त्यांनीं बेल्जम व फ्रान्स देशांतील अरण्यें तोडून टाकिलीं, लिल् आणि लोड्झ येथील यंत्रसामग्री लुबाडून नेली, आणि सर्वियांतील ग्रंथसंग्रहालयें सुद्धां लुटलीं. त्यांच्या ताब्यांत सांपडलेल्या सर्व प्रजाजनांस व लढाईंतील कैद्यांस त्यांनीं गुलामांप्रमाणें राबविलें. या हतभागी लोकांस जर्मन सैन्यास पोसण्यासाठीं शेतांत काम तरी करावें लागे, अगर उपाशी तरी मरावें लागे.

प्रस्तुत युद्धाची तयारी करण्याचे कामीं जर्मनीनें योजिलेल्या साधनांचा येथें थोडक्यांत उल्लेख करूं. प्रत्येक राष्ट्र युद्धाची तयारी करीतच असतें. परराष्ट्रांत रहात असलेले वकील व सामान्य लोकही तेथें असतांना तेथील लष्करी बल, राज्यपद्धति, आणि राज्यासंबंधाच्या इतर

अनेक बाबी यांची माहिती आपआपल्या देशाचे उपयोगाकरितां मिळ-वीत असतात; आणि हें अगदीं योग्य आहे. परंतु जर्मन लोक इतकेंच करून थांबले नाहींत. त्यांच्या गुप्तहेरखात्यानें सर्वत्र आपलें जाळें पसरिलें. चोहोंकडे त्यांचीं कांहीं ना कांहीं उद्योगधंद्याचीं लहान मोठीं दुकानें होतीं. तसेंच त्यांच्या विमाकंपन्यांचे व इतर नाना प्रकारचे उद्योग चालू होते; पण अंतस्थपणें चालविलेलें गुप्तहेरांचें काम छपविण्याचीं हीं सारीं ढोंगें होतीं. परदेशांत पाहुणचार घेणारा प्रत्येक जर्मन मनुष्य कमी जास्त प्रमाणानें पगारी हेर होता, आणि जर्मन सरकारच्या परराष्ट्रांतील वकिलाती देखील त्या त्या देशाविरुद्ध चालविलेल्या लष्करी तयारीचीं स्थानें होतीं. युद्ध सुरू झाल्यापासून ह्या सर्व गोष्टी बाहेर आल्या आहेत; आणि सर्व लोकांस असें वाटूं लागलें आहे कीं इतउत्तर जर्मन लोकांस आपल्या देशांत राहावयास येऊं देणें उचित नाहीं. इतकेंच काय, पण कोणत्याही परकीय देशांतील रहिवाशांचा आपल्या देशांत प्रवेश होऊं देणें देखील कदाचित् अवघड होईल. जर्मनीच्या वर्तनामुळें राष्ट्रांमधील परस्पर विश्वासास धक्का बसला असून तो पुन्हां पूर्ववत् उत्पन्न करणें हें शांततेच्या काळीं करण्याचें एक कामच होईल.

## ( आ ) ग्रेटब्रिटन

आतां आपण ब्रिटिश सैन्य युद्धांत कोणत्या प्रकारें वागलें तें पाहूं. ब्रिटिशांच्या धैर्याचें वर्णन करण्याची मुळींच गरज नाहीं; कारण त्याचीं उदाहरणें प्रत्यहीं दिसून आलीं आहेत. शिवाय, इतर दोस्त राष्ट्रांनीं देखील आपलें धैर्य उत्तम रीतीनें प्रगट केलें आहे. तथापि ब्रिटिशांचा उत्साह, त्यांचा विनोदीपणा, त्यांची स्वार्थ-निरपेक्षता, आणि शत्रूला सौजन्यानें वागविण्याची बुद्धि, या गुणांच्या योगानें ब्रिटिश सैनिक स्तुतीस विशेष पात्र झाले आहेत.

जेव्हां युद्धांत घडलेल्या गोष्टींची पुढेंमागें छाननी केली जाईल तेव्हां इंग्लंडनें जर्मन कैद्यांस कोणत्या रीतीनें वागविलें हें लोकांच्या नजरेस येऊन जर्मनीनें इंग्लिश कैद्यांस कोणत्या रीतीनें वागविलें याच्याशींही त्याची तुलना होईल.

सैनिकांस निर्दयतेनें वागण्याचाच तेवढा मोह पडतो असें नाहीं, तर दुसरेही अनेक प्रकारचे मोह पडतात. ही गोष्ट लॉर्ड किचनेर यानें ब्रिटिश फौजेची फ्रान्सांत रवानगी केली तेव्हांच त्याचे ध्यानीं आली होती. म्हणून त्यानें सैनिकांचे प्रयाणसमयीं त्यांस उपदेश करतांना कोणत्याही प्रकारच्या चैनबाजींत न पडण्याविषयीं आणि फ्रान्सांतील नागरिकांशीं वागतांना कोणत्याही प्रकारचें गैरशिस्तपणाचें वर्तन न करण्याविषयीं बजावलें होतें. लॉर्ड किचनेर याचा उपदेश ब्रिटिश शिपाई विसरले नाहींत; इतकेंच नव्हे, तर ते आज इतके दिवस ज्या देशांत पाहुणचार घेत आहेत तो देश सोडून ते स्वदेशास परत येतील तेव्हां फ्रेंचांस त्यांच्या स्नेहभावाचें स्मरणच होत राहील.

आतां या युद्धांत उभयपक्षीं कांहीं प्रसंगीं क्षात्रधर्म कसा दाखविला गेला याचें एक उदाहरण देऊन हें प्रकरण समाप्त करूं.

एकदां एक जर्मन सैनिक ब्रिटिश व जर्मन खंदकांच्या दरम्यान घायाळ होऊन पडला असतां असें घडलें कीं कांहीं ब्रिटिश सैनिकांनीं चुकून त्यावर गोळ्या झाडल्या. तें पाहतांच त्यांवरील ब्रिटिश अधिकाऱ्यानें त्यांस एकदम गोळीबार थांबविण्याचा हुकूम करून लगेच तो स्वतः त्या जखमी जर्मनास वांचविण्यासाठीं आपला खंदक सोडून निघाला. तेव्हां जर्मनांनीं तो ब्रिटिश अधिकारी कोणत्या उद्देशानें येत आहे हें बरोबर न समजल्यामुळें त्यावर गोळ्या झाडल्या; तरी देखील तो अधिकारी न डगमगतां तसाच पुढें गेला आणि त्यानें त्या घायाळ सैनिकास उचलून जर्मन खंदकांत नेऊन पोंचाविलें. या वेळीं त्याच्या

येण्याचा हेतु काय हें जर्मनांस स्पष्ट कळून आलें आणि तेथील एका जर्मन अधिकाऱ्यानें एकदम पुढें होऊन आपल्या छातीवरील जर्मन सैन्यांतील अत्यंत मर्दपणाचें चिन्ह जो लोखंडी क्रूस तो काढून त्या ब्रिटिश अधिकाऱ्याचे वक्षस्थलावर लटकावून दिला. नंतर जेव्हां तो ब्रिटिश अधिकारी तेथून परतला, तेव्हां जर्मन सैनिकांनीं त्याबद्दल अंत:करणपूर्वक जयघोष केला. त्या ब्रिटिश अधिकाऱ्याच्या ह्या कृत्यानें ब्रिटिश व जर्मन सैनिकांचीं मनें इतकीं सद्गदित झालीं कीं यापुढें कांहीं काळपावेतों त्या स्थलीं त्यांची लढाई अगदीं बंद पडली.

जर या युद्धामध्यें वाइटांतून कांहीं चांगलें निघावयाचें असेल तर तें कांहीं अंशीं यासारख्या क्षात्रधर्मास तेजस्विता आणणाऱ्या कृत्यांनींच निघेल; आणि आपल्या अंगीं अजूनही अशीं मर्दपणाचीं कृत्यें करण्याचें सामर्थ्य असून शत्रूंच्याही मर्दपणाचें अभिनंदन करण्याचें औदार्य आपल्यांत आहे असें इंग्रज लोकांस खात्रीनें म्हणतां येईल.

---

प्रकरण दहावें

## ब्रिटन आणि ब्रिटिशसाम्राज्य यांमधील युद्धकालीन परिस्थिति

हें युद्ध सुरू होण्यापूर्वींच पुष्कळ इंग्रज लोकांस असें वाटत होतें कीं जर्मनीच्या अनिवार महत्त्वाकांक्षेमुळें यूरोपखंडांत युद्ध उद्भवेल; पण तें इतक्या लवकर उद्भवेल असें मात्र कोणाचे मनांत आलें नसेल. बाल्कन युद्ध एकच वर्ष अगोदर संपलें असून ब्रिटन, जर्मनी, व इतर राष्ट्रें यांच्या प्रतिनिधिमंडलानें तहाच्या अटी ठरविल्या होत्या. अर्थात् १९१४ च्या जुलैंत इंग्लंड व जर्मनी यांमध्यें तंट्याची बाब कोणतीच नव्हती. शिवाय, यावेळीं ब्रिटिश प्रधानमंडळ लिबरलपक्षाचें असून

त्यांतील बहुतेक मंत्री शांतताप्रिय होते आणि कित्येक तर जर्मनांचे चहाते होते. परंतु अगदीं थोड्या दिवसांच्या अवधींत हें सारें पालटून एकदम युद्ध सुरू झालें. एकाएकीं उद्भवलेल्या या अरिष्टाशीं तोंड देण्यासाठीं ब्रिटिशांनीं कोणते उपाय योजिले तें आपण आतां पाहूं.

प्रथम, बँकांच्या संरक्षणाची तजवीज करणें प्राप्त होतें. बहुतेक देशांत लोक आपली शिल्लक बँकांत ठेवितात. या पद्धतीनें एक तर लोकांस आपल्या पैशावर व्याज मिळतें आणि दुसरें पैसा सांभाळण्याच्या काळजींतून ते मुक्त होतात. बँका आपलें स्वतःचें बहुतेक भांडवल व त्याप्रमाणेंच ठेवीदारांच्या ठेवीही निरनिराळ्या उद्योगधंद्यांत गुंतवितात, आणि ठेवीदारांच्या नित्याच्या सामान्य मागण्या भागविण्यापुरतीच रोकड आपणापाशीं बाळगितात. यामुळें बँक लहान असो कीं मोठी असो, एकाएकीं मागणी आल्यास सर्व ठेवी एकदम परत करणें तिला शक्य नसतें. पूर्वींच्या अनुभवानें असें निदर्शनास आलें होतें कीं जेव्हां जेव्हां एकाद्या मोठ्या युद्धास प्रारंभ होतो तेव्हां तेव्हां न जाणों आपल्या पैशास धोका येईल असें वाटून सर्व लोक आपल्या ठेवी परत आपले हातीं घेण्यास उत्सुक होतात. परंतु सर्वच ठेवीदारांनीं आपल्या ठेवी एकदम परत मागण्याचें ठरविलें तर बँका बंद होण्याचा प्रसंग येतो आणि त्यामुळें व्यापारही कुंठित होतो. अशा प्रकारचा गोंधळ उडूं नये म्हणून प्रस्तुत युद्ध सुरू होतांच ब्रिटिश सरकारनें कोणासही आपली सर्व ठेव एकदम बँकेंतून काढून घेतां येणार नाहीं, तर सर्वांस आवश्यक खर्चापुरतीच रक्कम मिळूं शकेल असा हुकूम काढला. हा हुकूम दोन महिनेपर्यंत अमलांत होता. पण तेवढ्या काळांत युद्ध चालविण्यास लागणारा सर्व खर्च भागविण्याची ऐपत इंग्लंडला आहे, व्यापार आणि कारखाने पूर्ववत् सुरू असून मागणी येतांच बँका पैसा पुरवीत आहेत, आणि युद्धामुळें बँकांची पत मुळीं देखील कमी झाली नाहीं, असें सर्वांस आढळून आलें.

दुसरें, अन्नसामग्रीचा पुरवठा करणें जरूर होतें. इंग्लंड देशास लागणारी बहुतेक अन्नसामग्री परदेशांतून येते. परंतु युद्ध चालू असतां मालाची वाहतूक नीट होत नाहीं. यास्तव देशांत अन्नसामग्रीची वाण पडूं नये म्हणून ब्रिटिश सरकारास व्यवस्था करणें भाग पडलें. त्याप्रमाणें त्यांनीं मोठ्या प्रमाणावर ज्या खरेद्या केल्या त्यांत जावा बेटांत उत्पन्न होणारें उसाचें सारें पीक आणि नॉर्वेच्या किनाऱ्यावर पकडली जाणारी सारी मासळी त्यांनीं सट्ट्यानें विकत घेतली.

तिसरें, जहाजांतून होणाऱ्या राष्ट्राराष्ट्रामधील व्यापारास उत्तेजन देणें व मदत करणें भाग होतें. जेव्हां जहाजांतून माल पाठविण्यांत येतो तेव्हां लोक त्याचा विमा उतरतात. तेणेंकरून समुद्रांत जहाजें बुडाल्यास मालकांस विमाकंपन्यांकडून मालाची किंमत भरून मिळते. परंतु सांप्रतच्या युद्धांत जर्मन पाणबुड्यांनीं व क्रूझरांनीं इतकीं जहाजें बुडविलीं कीं तेणेंकरून विम्याचे दर भलतीकडे चढले. तेव्हां ब्रिटिश सरकारनें व्यापारी व विमाकंपन्या बुडूं नयेत म्हणून सुमारें निम्या जहाजांचा अगदीं बेताच्या दरानें विमा घेण्याचें स्वत: पतकरिलें.

वरील सर्व गोष्टींची व्यवस्था सरकारनें इतक्या त्वरेनें व कौशल्यानें केली कीं सर्व लोकांचा सरकारवर पूर्ण विश्वास बसला. पार्लमेंटांत प्रतिपक्ष म्हणून जो एक तट असतो तो शांततेच्या काळीं अधिकृत पक्षास विरोध करण्याचें धोरण स्वीकारून देशाच्या अंतर्गत राज्यव्यवस्थेसंबंधानें नाना प्रकारचे वाद उपस्थित करितो. तथापि या प्रसंगीं उभयपक्षांत समेट होऊन असें ठरलें कीं युद्ध सुरू असेपर्यंत ज्या प्रश्नांसंबंधीं मतभेद होण्याचा संभव आहे अशा प्रश्नांबद्दलच्या नवीन सूचना पार्लमेंट सभेपुढें आणूं नयेत, आणि सर्वांनीं शत्रूचा पराभव करण्यासाठीं एक व्हावें.

गेल्या चार वर्षांच्या अवधींत प्रधानमंडळांत अनेक फेरफार झाले. प्रधानमंडळ मोठें असल्यास त्यांत मतभेद होण्याचा फार संभव असतो व कामही दिरंगाईनें चालतें यास्तव प्रधानमंडळांतील मंत्र्यांची संख्या हळूहळू कमी करण्यांत येऊन अलीकडे युद्धप्रधान-मंडळांत पांचच सभासद असून त्यांचे हातीं सर्व गोष्टींबद्दलची पूर्ण अखत्यारी सोंपविण्यांत आली होती. पूर्वीचा मुख्य प्रधान ॲस्क्विथ याचे जागीं लॉइड जॉर्ज हा प्रधान झाला. लॉइड जॉर्ज हा उमेदीचा, दूर-दर्शी, व उत्साही पुरुष आहे. युद्धाचे प्रारंभीं इंग्लंडांत दारूगोळ्याची कांहींशी उणीव होती; परंतु लॉइड जॉर्ज यानें केलेल्या उत्तम व्यव-स्थेमुळें इंग्लिश लोक आपणास पुरून आपले दोस्तांस देतां येईल इतका मुबलक दारूगोळा तयार करूं लागले. तसेंच श्रीमंतांप्रमाणेंच गरीबांसही पोटभर अन्न मिळावें म्हणून यानें देशांतील सर्व खाद्य-पेयपदार्थ सरकारी नियंत्रणाखालीं घेतले. यानें योजिलेल्या आणखी एका मोठ्या उपायाबद्दल आपण याचे ऋणी आहों. यानें दोस्तराष्ट्रांचें एक संयुक्त युद्धमंडळ स्थापिलें. या मंडळाच्या बैठकी फ्रान्सांत होत असून फ्रान्सांतील दोस्तांच्या संपूर्ण सैन्यावर यानें जनरल फॉक यास सरसेनापति नेमिलें.

युद्ध फार दिवस सुरू राहिल्यास धान्यादिकांच्या किंमती फार वाढल्यामुळें मजूर वर्गास अत्यंत हाल सहन करावे लागतात. परंतु इंग्लंडांत हे हाल प्रथम वाटले होते तितक्या थरास जाऊन पोंचले नाहींत. युद्ध सुरू झाल्यावर प्रथम कांहीं महिने व्यापार थोडासा बसला, पण तो पुढें पुन्हां जोमांत आला. शिवाय युद्धो-पयोगी साहित्य तयार करण्याचे कामांत लोक इतके गुंतले गेले कीं कोणासही बेरोजगार रहावें लागलें नाहीं. मजुरांच्या मजुरीचे दर पुष्कळ वाढले, आणि लढाईवर असलेल्या सैनिकांच्या बायका व मुलें यांस

भरपूर वेतन मिळालें. परंतु सर्वच पदार्थांच्या किंमती वाढल्यामुळें कारकून, शिक्षक, वगैरे नियमित प्राप्तीच्या मध्यमवर्गीतील लोकांचे मात्र पुरे हाल झाले. सर्व जगांत निरनिराळ्या देशांत शौर्यानें लढत असतां हजारों लोक मृत्युमुखीं पडले. ग्रेटब्रिटनमधील उच्चनीच सर्व दर्जाच्या लोकांनीं स्वार्थत्याग केला. एकीकडे राष्ट्राची हानि आणि दुसरीकडे राष्ट्राचा भगीरथ प्रयत्न यांच्या योगानें समाजांतील भिन्न भिन्न वर्गांमध्यें फारच सहानुभूति उत्पन्न झाली.

इंग्लंडकडच्या ह्या एकंदर प्रयत्नांत स्त्रियांच्या कामगिरीचा विशेष उल्लेख केला पाहिजे. देशाच्या बहुतेक साऱ्या सामान्य कामाचें ओझें स्त्रियांनीं उचललें. ज्या कामांचा पूर्वी स्त्रियांस कधींच प्रसंग नव्हता असलीं कामें म्हणजे शेतें नांगरणें, झाडें तोडणें, ट्रॅमगाड्या चालविणें, रेल्वेवरील कामें करणें इत्यादि कामेंही स्त्रियांनीं आपल्या शिरावर घेतलीं. तसेंच दारूगोळा, सैनिकांचे कपडे, इतर लवाजमा, आणि जर्मन तटबंदींतील चुनेगच्ची पक्क्या भिंती धुळीस मिळविणारे भक्कम कुलपी गोळे देखील तयार करण्याचें पुष्कळ श्रेय स्त्रियांकडेच आहे.

इंग्लिश वसाहतींनीं देखील आपली सारी साधनसंपत्ति मातृदेशाच्या सेवेस सादर केली. युद्धाच्या प्रारंभास दक्षिण आफ्रिकेंतील कांहीं डच रहिवाशांस बंड उभारण्याचा मोह पाडण्यांत आला. परंतु बोथा व दुसरे डच सेनापति यांनीं तें बंड मोडून काढण्याचे कामीं पुढाकार घेतला. जर्मनांच्या चिथावणीनें आयर्लंडांत देखील जरा गडबड झाली. तेथील बंडखोर लोकांनीं आयर्लंड हें प्रजासत्ताक राज्य झाल्याचें जाहीर केलें; परंतु बहुजनसमाज त्यांस अनुकूल नव्हता. सदर बंडाचा बीमोड झाल्यावर त्यांतील कांहीं पुढाऱ्यांस फांशीं देण्यांत आलें व इतरांस कैदेची शिक्षा झाली. या कैद्यांमध्यें एक उच्च घराण्यांतील स्त्री होती. तिनें जरी पुरुषासारखा पोषाख करून बंडखोरांस

लढण्यास उत्तेजन दिलें होतें तरी तिला सोडून देण्यांत आलें. या स्त्रीस मिळालेली सौम्य शिक्षा आणि मिस् कॅव्हेल इला जर्मनांनीं दिलेली फांशीची शिक्षा यांची तुलना केल्यास इंग्लिश व जर्मन लोकांच्या वागण्याच्या पद्धतींतील अंतर कोणासही सहज कळून येईल. मिस् कॅव्हेल ही एक इंग्लिश परिचारिका असून बेल्जममध्यें रोग्यांची व घायाळांची सेवा करण्यासाठीं स्वयंसेविका म्हणून गेली होती. तिनें कांहीं कैद्यांस पळून जाण्यास मदत केली अशा आरोपावरून तिला जर्मनांनीं पकडलें व तिजवर बंदुकीच्या गोळ्या झाडून तिचा प्राण घेतला. अशा कडक रीतीनें वागणें हें लष्करी कायद्याप्रमाणें कदाचित् बरोबर असेल; पण भूतदयेचा कायदा लष्करी कायद्यापेक्षां उच्च प्रतीचा आहे. कधीं कधीं दया दाखविणें म्हणजे गुन्ह्यास प्रोत्साहन देण्याजोगेंच होतें ही गोष्ट मात्र खरी आहे. उदाहरणार्थ, आयर्लैंडांतील बंडखोरांपैकीं एक मनुष्य मागें बोअर युद्धांत इंग्लिशांविरुद्ध लढला असतांही त्यास जीवदान देण्यांत आलें होतें. पण तोच मनुष्य जेव्हां पुन्हां आयर्लैंडांतील बंडांत सामील झाला तेव्हां या निमकहराम शत्रूस पुन्हां जीवदान देणें इंग्लिशांस योग्य न वाटून त्यास राजद्रोहाबद्दल फांशीं देण्यांत आलें.

ज्यांचा आपण वर उल्लेख केला आहे ते आयर्लैंडांतील बंडखोर लोक संख्येनें अगदींच थोडे होते. आयर्लैंडमधील बहुतेक लोक इंग्लंडचे हितचिंतक असून त्यांतील हजारों लोक इंग्लंडच्या इभ्रतीसाठीं फ्रान्सांत व इतरत्र लढले. शिवाय गॅलिपोलींत जें सैन्य उतरलें त्यांतील मुख्य तुकडी आयरिशच होती हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

अपवादादाखल झालेल्या या दोन बंडांशिवाय संपूर्ण ब्रिटिश साम्राज्यांत कोठेंही अप्रीतीचा गंध उत्पन्न झाला नाहीं. कॅनडा, ऑस्ट्रेलिया, आणि न्यूझीलंड यांनीं इंग्लंडच्या मदतीस पांच लाखांवर फौज पाठविली. गॅलिपोलींत ऑस्ट्रेलियन फौजेचें पुष्कळच शौर्य दिसून आलें

असून अगदीं अलीकडे फ्लँडर्समध्यें कॅनेडियन सैन्यानेंही तसाच पराक्रम गाजविला आहे.

## तटस्थ राष्ट्रें

स्वीडन, हॉलंड, व स्पेन हीं यूरोपांतील प्रमुख तटस्थ राष्ट्रें होत. यांपैकीं स्वीडनचे मनांत रशियाविषयीं फार दिवसांचा आकस असल्याकारणानें जरी स्वीडन तटस्थ असलें तरी त्याचा दोस्तराष्ट्रांकडे विशेषसा ओढा नव्हता. विशेषत: बेल्जमचा नाश झालेला पाहून हॉलंड देश ब्रिटनपेक्षां जर्मनीस अधिक भीत होता. तेव्हां खरा तटस्थ देश असा एकटा स्पेनच काय तो राहिला.

प्रथम अमेरिकेचें मत द्विधा झालें होतें. तेथील लाखों प्रजाजनांच्या अंगांत जर्मन रक्त खेळत असून जर्मनींतून तेथें रहाण्यास आलेले लोक उत्साही, श्रीमंत, व वजनदार आहेत. जेव्हां युद्ध सुरू झालें तेव्हां या लोकांनीं अमेरिकेचा जर्मनीकडे ओढा उत्पन्न करण्याच्या उद्देशानें मोठा प्रयत्न केला. दोस्तराष्ट्रें अन्यायानें वागत आहेत असें अमेरिकनांस भासविण्याकरितां कित्येक नामांकित जर्मन वक्ते अमेरिकेस गेले. जर्मन पत्रें व हस्तपत्रकें यांस तर साऱ्या देशभर ऊत आला होता. दोस्त राष्ट्रें अमेरिकेपासून युद्धोपयोगी साहित्य विकत घेत असून समुद्रावर तें पकडून हस्तगत करून घेण्याइतकें सामर्थ्य जर्मन आरमारांत नव्हतें. म्हणून जर्मनीस अनुकूल असलेले लोक असें भासवूं लागले कीं जर अमेरिकेनें इंग्लंडला हत्यारांचा पुरवठा केला तर अप्रत्यक्षपणें जर्मनीच्या विरुद्ध तो देश वागला असें होतें, आणि तेणेंकरून खरी तटस्थता राखण्यास तो चुकला असें म्हणावें लागेल. इंग्लंडला अमेरिकेंतून होणारा हत्यारांचा पुरवठा बंद पाडण्यासाठीं हर प्रयत्न करण्यांत आले; तथापि प्रेसिडेंट विल्सन याजवर तटस्थतेच्या ह्या कल्पनांचा पगडा बसला नाहीं. अमेरिकेंतील जर्मन लोकांकडून तेथील

दारूगोळा तयार करण्याच्या प्रचंड कारखान्यांचा विध्वंस करण्याचेही पुष्कळ गुप्त कट करण्यांत आले, आणि कित्येक मोठे जर्मन अधिकारी व खुद्द ऑस्ट्रियाचा अमेरिकेंतील वकील यांनीं असल्या कटांस मदत केल्यावरून त्यांस अमेरिकेंतून घालवून देण्यांत आलें.

प्रेसिडेंट विल्सन याची जर्मनीशीं विरोध करण्याची मुळींच इच्छा नव्हती. जर्मनीनें बेल्जमचा चुराडा उडविला आणि युद्धाचे नियम पावलोपावलीं मोडले तरी प्रेसिडेंट विल्सननें जर्मनीचा मुळींच निषेध केला नाहीं. कदाचित् पुढें तहाची वाटाघाट सुरू होईल तेव्हां लढणाऱ्या राष्ट्रांमध्यें आपणास मध्यस्थाचें काम करतां येईल, व आपण तटस्थ राहिल्यास आपल्या निःपक्षपातीपणाबद्दल कोणासही शंका घेतां येणार नाहीं, असें त्यास वाटलें असावें. परंतु ही त्याची आशा सफल झाली नाहीं.

जेव्हां जर्मन लोक खुद्द अमेरिकेंत गुप्त कट उभारण्याचे प्रयत्न करूं लागले, आणि जेव्हां उतारूंचे जहाजांवरील अमेरिकन नागरिकांस ते बुडवूं लागले, तेव्हां आपण मध्यें पडण्याचा समय प्राप्त झाला असें प्रेसिडेंट विल्सन यास वाटलें. १५०० उतारू घेऊन अमेरिकेहून इंग्लंडकडे येणारें ल्युसिटॅनिया या नांवाचें मोठें जहाज जर्मनीनें बुडविलें तेव्हां त्यावरील बहुतेक सर्व लोक प्राणास मुकले. असलीं निर्दयपणाचीं कृत्यें वारंवार घडूं लागलीं तेव्हां प्रेसिडेंट विल्सन यानें जर्मनीस एक खलिता लिहून असल्या कृत्यांचा निषेध केला. परंतु जर्मनीनें कोणत्याही प्रकारें स्पष्ट आश्वासन न देतां पुष्कळ दिवस पत्रव्यवहार मात्र सुरू ठेविला, आणि मध्यंतरीं जर्मन लोकांच्या पाणबुड्या, उतारूंचीं जहाजें बुडवीत होत्या त्या होत्याच.

युनायटेड स्टेट्सला असल्या गोष्टी फार दिवस खपल्या नाहींत. प्रेसिडेंट विल्सन यानें जर्मनीस अगदीं स्पष्टपणें कळविलें कीं जर इतउत्तर जर्मन लोकांच्या कृत्यामुळें कोणा अमेरिकन मनुष्यास समुद्रांत

बुडून मरण्याचा प्रसंग येईल तर युनायटेड स्टेटस्‌ला आत्मसंरक्षणार्थ हातीं शस्त्र धरावें लागेल. नंतर जर्मनीनें अभिवचन दिलें कीं कोणतेंही उतारू किंवा माल नेणारें जहाज बुडविण्यापूर्वीं जहाजांवरील प्रवासी व खलाशी लोक यांस होड्यांत उतरून त्यांचा बचाव करण्यांत येईल. जर्मनांनीं हें अभिवचन पुढें मोडलें, व प्रवासी किंवा खलाशी यांच्या बचावाचा बिलकूल प्रयत्न न करितां त्यांनीं सर्व प्रकारचीं जहाजें बुडविलीं. प्रेसिडेंट विल्सन यानें जर्मनीचा जेव्हां पुन्हां निषेध केला तेव्हां तर त्यांनीं त्याकडे लक्षच दिलें नाहीं. अर्थात् अमेरिकेस कोणतेंही गत्यंतर न राहून त्या राष्ट्रानें १९१७ च्या मार्च महिन्यांत जर्मनीविरुद्ध युद्ध जाहीर केलें.

युनायटेड स्टेट्समध्यें मनुष्यल व द्रव्यबल मुबलक आहे. या राष्ट्रानें दोस्तांस अमर्याद कर्ज देऊन मदत केली. त्याच्या लढाऊ जहाजांनीं अटलांटिक महासागरांत पाणबुड्यांवर पाळत राखिली. बुडविण्यांत आलेल्या जहाजांची जागा भरून काढण्यासाठीं त्यानें नवीं व्यापारी जहाजें बांधिलीं आणि गेल्या सालीं फार मोठें सैन्य फ्रान्सांत पाठविलें. युद्धाचा शेवट लावणाऱ्या लढाईत या साऱ्या सैन्यानें मदत केली असें नाहीं; तथापि हें सैन्य पाठीशीं असल्यामुळें मार्शल फॉक यांस ब्रिटिश व फ्रेंच शिलकी सैन्य निर्धास्तपणें रणांगणावर नेतां आलें. प्रेसिडेंट विल्सन यानें युद्धतहकुबीच्या वाटाघाटींत आपल्या आंगचे दृढता, कौशल्य, आणि भूतदया हे जे गुण प्रगट केले त्यांविषयीं सर्वांनीं त्याचें ऋणी राहिलें पाहिजे.

---

प्रकरण अकरावें

## हिंदुस्थान आणि प्रस्तुत महायुद्ध

१९१४ सालापूर्वीं हिंदुस्थान कधींही यूरोपांतील लढायांत सामील झालें नव्हतें. परंतु प्रस्तुत युद्धांत तें इंग्लंडच्या खांद्यास खांदा लावून

समरांगणांत उतरलें असून त्यानें आपलें सारें मनुष्यबल व द्रव्यबल साम्राज्याच्या हितार्थ अर्पण केलें आहे. हिंदी लोक राजनिष्ठ व कृतज्ञ असून आपण न्यायाच्या बाजूनें लढलों आहों अशी त्यांची भावना आहे. ब्रिटिशसत्तेमुळें आपल्या देशांत शांतता प्रस्थापित होऊन आपल्यास उत्कर्षाचा मार्ग सुलभ झाला हें ते जाणतात. ब्रिटिश राज्यकारभार न्यायाचा व निःपक्षपाती असून ब्रिटिश सरकार कोणाच्याही धर्मांत हात घालीत नाहीं हें त्यांस माहीत आहे. तसेंच हिंदुस्थानासारख्या विस्तीर्ण देशाचा राज्यकारभार इतक्या न्यायीपणानें व कौशल्यानें इंग्लंडशिवाय दुसऱ्या कोणासही चालवितां आला नसता हेंही ते जाणतात. ह्या सर्व गोष्टी त्यांस प्रत्यक्ष दिसतात व पटतात, म्हणूनच ब्रिटिश राज्यावर कोणतेंही संकट आलें असतां हिंदी लोकांस उदासीन राहवत नाहीं. राजनिष्ठा हा त्यांचा अंगभूत गुण आहे. ‘नाविष्णुः पृथिवीपतिः’ असें त्यांचें शास्त्रवचन आहे. शिवाय सांप्रतचा त्यांचा बादशहा म्हणजे नुसता राज्यकर्ता पुरुष नसून त्यानें न्यायाच्या व सत्याच्या बाजूनें जुलूम व वचनभंग करणाऱ्या शत्रूविरुद्ध शस्त्र उचललें आहे हेंही ते जाणतात. यामुळें युद्धाचा वणवा पेटतांच त्या वेळचा हिंदुस्थानचा व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिंज यास हिंदी प्रजा राजनिष्ठ राहून साह्य करील याबद्दल आपल्या बादशहांस अंतःकरणपूर्वक आश्वासन देतां आलें.


युद्धाचे सुरवातीस इंग्लंडचें सैन्य किती थोडें होतें आणि जर्मनीची केवढी प्रचंड सेना फ्रान्सवर लोटली होती या गोष्टी आपण वर पाहिल्याच आहेत. हिंदुस्थान सरकारनें फ्रान्सांतील ब्रिटिशांचे मदतीसाठीं हिंदुस्थानांतील फौज ताबडतोब पाठविण्याचें जेव्हां ठरविलें तेव्हां सर्व हिंदी लोकांस आनंद होऊन अभिमानही वाटला.

हिंदुस्थानांतील बहुतेक ब्रिटिश फौज फ्रान्स देशांत पाठविण्यांत आली आणि तिचे बरोबरच सहकारित्वानें लढण्यासाठीं हिंदुस्थानांतील

सर्व लढाऊ जातींचीं पलटणें गेलीं; आणि एकेकाळीं परस्परांशीं लढत असलेल्या पठाण, गुरखे, शीख, रजपूत, पंजाबी वगैरे जातींतील सांप्रतचे लोक ब्रिटिश निशाणाखालीं परस्परांच्या खांद्यास खांदा लावून समानकार्यासाठीं शत्रूशीं लढतांना आढळून आले.

येथें असा प्रश्न उद्भवणें साहजिक आहे कीं, ज्यासाठीं हे लोक लढले तें समान कार्य तरी कोणतें ? या सैन्यांतील शिपायांपैकीं बहुतेकांनीं जर्मनीचें नुसतें नांव मात्र ऐकिलें होतें. आपण ज्या सरकारची नोकरी करीत आहों त्यावरच हिंदुस्थानची शांतता व भरभराट अवलंबून आहे हें त्यांस माहीत होतें, आणि म्हणूनच ब्रिटिश सरकारचे शत्रु ते आपले शत्रु असें त्यांनीं मानिलें. हिंदुस्थानांतील सुशिक्षित लोकांचीही अशीच भावना आहे; शिवाय त्यांनीं दोस्तराष्ट्रें ज्या हेतूनें लढत आहेत त्या हेतूच्या योग्यायोग्यतेबद्दलही विचार केला आहे, आणि त्यांनीं एकमतानें तो हेतु मान्य केला असून त्यास पाठिंबा द्यावयाचें ठरविलें आहे. हिंदी लोकांनीं कोणत्या प्रकारची मदत केली हें आपण लवकरच पाहूं; पण त्याचेपूर्वीं आपण प्रथम हिंदी सैनिकांबरोबर रणांगणाकडे जाऊन त्याचें अवलोकन करूं.

या सैन्यांतील बहुतेक लोकांस समुद्र व जहाजें पाहण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. ज्या देशांत ते गेले तेथील प्रत्येक गोष्ट त्यांस नवीन होती. तेथील हवेची तीव्रता त्यांस अननुभूतपूर्व होती. शिवाय तेथें त्यांस अत्यंत दुर्धर संग्रामाचे हाल भोगावे लागले. यूरोपखंडांत हिंवाळ्यांत हवा इतकी थंड व सरद असते व सैनिकांस खंदकांत इतका वेळपर्यंत उघडें रहावें लागतें कीं, प्रत्यक्ष यूरोपांत राहणाऱ्या सशक्त सैनिकांस देखील या गोष्टी असह्य होतात. हिंदी लोकांस याचा पूर्वीं कधींच अनुभव नसल्यामुळें तर ही त्यांच्या परीक्षेचीच वेळ होती. तथापि ते आपल्या परंपरागत कीर्तीस अनुसरून पूर्णपणें कसास उतरले, व त्यांनीं आपल्या सेनापतींस व स्वदेशबांधवांस संतुष्ट



फ्रान्समधील हिंदी सैन्याची छावणी.

केलें ही अत्यंत समाधानाची गोष्ट होय. फ्रान्स देशांत उतरतांक्षणीं हिंदी सैन्य इप्रेनजीक ब्रिटिश आघाडीवर दाखल झालें; आणि तेथें घडलेल्या घनघोर रणसंग्रामांतील भयंकर झटापटी, अत्यंत आणीबाणीचे समय, आणि शेवटीं त्यांनीं मिळविलेले विजय या सर्वांत ते पूर्णपणें कसोटीस उतरले. रणांगणांतील बहादुरीबद्दल जे सन्मान मिळतात त्यांचाही योग्य वांटा त्यांस मिळाला आहे. शिवाय, त्यांपैकीं पुष्कळांनीं लष्करी सन्मान मिळविले असून ब्रिटिश सैन्यांत पराकाष्ठेचें क्षात्रतेज प्रगट केलें असतां जो व्हिक्टोरिया क्रूस बक्षीस देतात तोही कित्येकांनीं मिळविला आहे. उदाहरणार्थ १२९ व्या बलूची पलटणींतील खुदादादखान नामक एका सैनिकानें यांत्रिक तोफ चालविणाऱ्या आपल्या तुकडींतील इतर सारे सैनिक गतप्राण झाल्यावर देखील



चतरसिंग

एकट्यानें तोफेचा मारा सुरू ठेविल्यामुळें त्यास व्हिक्टोरिया क्रूस देण्यांत आला. नवव्या भोपाळ पायदळ पलटणीपैकीं चतरसिंग नांवाच्या

सैनिकानें आपल्या पलटणींवरील अधिकारी उघड्या रणांगणांत घायाळ होऊन असहाय पडला असतां आपलें आश्रयस्थान सोडून त्याचे मदतीस जाऊन जी उज्ज्वल कर्तव्यनिष्ठा दाखविली व जें क्षात्रतेज प्रगट केलें त्यांबद्दल त्यासही व्हिक्टोरिया क्रूस नजर करण्यांत आला.

अगदीं अलीकडे व्हिक्टोरिया क्रूस मिळविणारा हिंदी मनुष्य म्हटला म्हणजे हिंदी घोडेस्वारांतील भालाईत दफेदार गोविंदसिंग हा होय. यानें आपली तुकडी व ब्रिगेडचें मुख्य ठाणें यांमध्यें संदेश पोंचवि-ण्यास स्वयंसेवक म्हणून तीन वेळां पुढें होऊन उज्वल शौर्य व परा-काष्ठेची कर्तव्यनिष्ठा प्रगट केली. यानें ज्या दोन स्थलांमध्यें संदेश पोंचविला त्यांमधील अंतर १॥ मैलावर असून तेथें शत्रूकडून सारखा अग्निवर्षाव सुरू होता. तिन्ही प्रसंगीं गोविंदसिंगाच्या मांडीखालचा घोडा मरून पडला व त्यास राहिलेला टप्पा पायीं गांठावा लागला, पण सुदैवानें तिन्ही वेळीं संदेश पोंचविण्याचे कामांत त्यास यश मिळालें.

या वीराग्रणींबरोबरच कांहीं वर्षांमागें पेनशन घेतलेल्या एका शीख सैनिकाचा निर्देश करणें जरूर आहे. युद्ध सुरू झालें तेव्हां आर्जें-टाइन रिपब्लिकमध्यें हा उद्योगधंदा करून रहात होता. परंतु युद्धाची वार्ता ऐकतांच हा आपला उद्योगधंदा सोडून स्वतःचें भाडें खर्च करून लंडनला आला, व आपण होऊन आघाडीवर जाण्यास तयार झाला. याचें धैर्य, राजनिष्ठा, आणि कर्तव्यप्रेम यांची स्तुति करावी तितकी थोडीच होणार आहे.

यूरोपांतील हिंवाळ्यांत होणारे हाल दुसऱ्यानें सोसण्यास हिंदी सैन्य तेथें ठेवूं नये असें ठरविण्यांत येऊन १९१५ सालीं त्यांतील बहुतेक सैनिक फ्रान्सांतून इजिप्तमध्यें व राहिलेलें इराणी आखाताकडे पाठविण्यांत आले. तेथें त्यांस दुसऱ्या प्रकारच्या अडचणी व त्रास सोसावा लागला; तथापि हिंदुस्थान व साम्राज्य यांच्या सेवेंत त्यांनीं

बिलकुल कसूर केली नाहीं. मेसॉपोटेमिया आणि पॅलेस्टाइन यांतील शेवटच्या मोहिमांत त्यांनीं जी कामगिरी बजावली तिची सेनापतींनीं फारच प्रशंसा केली आहे.

येथें आपल्यास हिंदुस्थानांतील राजनिष्ठ संस्थानिकांचाही उल्लेख केला पाहिजे. या सर्व संस्थानिकांनीं सैन्याची मदत दिली असून कित्येकांनीं तर प्रत्यक्ष रणांगणावर जाऊन महत्त्वाची कामगिरी बजाविली आहे. देशांतील प्रजाजनांनीं आपल्या सहानुभूतीनें व द्रव्यानें सैनिकांस मदत केली असून युद्धामुळें उद्भवलेल्या आपत्ति दूर करण्यासाठीं आणि सैनिकांच्या सुखसोयींची तरतूद करण्यासाठीं नानाप्रकारचे फंड सुरू केले आहेत. इंपीरिअल रिलीफ फंड म्हणून एक फंड असून सर्व प्रांतांचे निरनिराळे प्रांतानिहाय फंडही आहेत. शिवाय स्त्रियांनीं स्वतंत्र फंड सुरू केले आहेत. या फंडांतून इस्पितळें चालविलीं जातात, इस्पितळी जहाजांस जरूर त्या साहित्याचा पुरवठा करण्यांत येतो, आणि सैनिकांचीं दुःखें अनेक प्रकारें कमी करण्यांत येतात. हतभागी बेल्जन लोकांसही हिंदी लोक विसरले नसून त्यांनीं त्यांचे साह्यार्थ एक फंड उभारला आहे. बेल्जन मुलांसाठीं मुंबई इलाख्यांतील मुलांनीं विशेष परिश्रम घेऊन कांहीं करमणूकीचे खेळ वगैरे करून त्यांच्या दुःखाचा परिहार करण्यासाठीं ६० हजार रुपये वर्गणी जमा केली. निरनिराळ्या फंडांस मदत करणारांचीं नांवनिशी पाहिल्यास त्यांत केवळ संस्थानिक व श्रीमान् व्यापारीच तेवढे दिसतात असें नाहीं, तर हमाल, गिरणीकामगार, खेड्यांतील शेतकरी, विद्यार्थी व शाळेंतील लहान मुलें वगैरे सर्वांनीं शक्त्यनुरूप वर्गणी दिली आहे असें आढळून येतें.

गेल्या सालीं ( १९१८ ) बादशहांनीं पाठविलेला संदेश आणि दिल्ली परिषद् यांजमुळें युद्धविषयक चळवळीची मोठी लाट हिंदुस्था-

नभर उसळली. हल्लीं दुसरें युद्ध कर्ज उभारण्यांत आलें असून कदाचित् उत्तरेकडून हिंदुस्थानावर संकट आल्यास त्यास तोंड देण्यासाठीं हिंदी लोकांचें नवीन मोठें लष्कर तयार करण्यांत येत आहे.

हिंदुस्थाननें या युद्धांत पुष्कळ स्वार्थत्याग केला आहे व या युद्धापासून त्यास कांहीं लाभही होईल. हिंदुस्थानची जगांतील मोठ्या राष्ट्रांत गणना होते अशी येथील लोकांची भावना होणें साहजिक आहे. स्वाभिमान आणि थोरवी प्राप्त होऊन सर्व हिंदुस्थानची दृष्टि विकास पावण्याचा संभव आहे. तत्परता दाखविल्यास त्यांच्या व्यापाराचीही कांहीं वृद्धि होईल. निदान आजकाल हिंदुस्थानांतील लोकांना धाडस आणि कौशल्य यांची किती आवश्यकता आहे हें तरी त्यांचे ध्यानीं येईल.

शिवाय हिंदी लोक आणि ब्रिटिश लोक यांनीं या प्रस्तुतच्या संकटांतून हातांत हात घालून मार्ग काढल्यामुळें परस्परांविषयीं परस्परांचीं मनें अधिक साफ होऊन त्यांचा स्नेहसंबंध अधिक दृढ होईल अशी आशा करावयासही हरकत नाहीं. प्रत्यक्ष पंचम जॉर्ज बादशहांनीं व्हॉइसराय साहेबांस लिहिलेल्या एका पत्रांत अशीच आशा व्यक्त केली आहे. त्या पत्रांतील कांहीं ओळींचा तरजुमा पुढें दिला आहे:—

" माझ्या साम्राज्याचें ऐक्य व स्थैर्य कायम राखण्यासाठीं त्यांतील अखिल प्रजाजनांची एकसमयावच्छेदानें जागृति झाली असें या प्रसंगीं घडलेल्या ज्या अनेक गोष्टींवरून दिसून आलें त्यांत माझे हिंदुस्थानांतील प्रजाजन, मांडलिक, आणि राजेरजवाडे यांनीं माझ्या गादीविषयीं अंत.करणपूर्वक एकनिष्ठा प्रगट केली आणि आपलें जीवित व वित्त अर्पण करण्यांत अनतिशय औदार्य दाखविलें या गोष्टींनीं मी जितका सद्गदित झालों त्याहून अधिक दुसऱ्या कशानेंही झालों नाहीं. या संग्रामांत आम्हांस सर्वांच्यापुढें जाऊं द्या अशी त्यांनीं एकरवानें

जी मागणी केली तिनें माझें अंत:करण अतिशय भरलें असून यांच्या व माझ्या अंत:करणास सतत निगडित करणारा भक्ति व प्रेमरज्जु आज दृढतर झाला आहे. या गोष्टीचा परिणामही फारच मोठा होणार आहे. १९१२ सालीं दिल्लीचा थाटाचा राज्यारोहण-समारंभ आटोपून परत जाते समयीं माझें अभिनंदन करतांना हिंदुस्थान देशानें ब्रिटिश राष्ट्रास आपली सदिच्छा व मित्रभाव यांचा द्योतक जो संदेश पाठविला त्याचें मला या समयीं स्मरण होतें. या दोन्ही देशांचें भवितव्य परस्परांशीं कायमचें संलग्न झालें असल्याबद्दल तुम्हीं जें आश्वासन दिलें त्याची आज परिपूर्णता झाली असल्याचेंही मला आढळून येत आहे."

---

प्रकरण बारावें

## युद्धाचा शेवट व भावी परिणाम

हें जगड्व्याळ युद्ध प्रारंभीं जितक्या त्वरेनें उद्भवलें तितक्याच त्वरेनें तें अचानक थांबलें. युद्धाची मुळींच तयारी नसतां व युद्ध करण्याची इच्छा नसतां ज्यांस शत्रूनें युद्धांत खेचलें, त्या दोस्त राष्ट्रांचाच अंतीं पूर्ण विजय झाला ! परिणामीं सत्यानेंच आसुरी बलावर विजय संपादला, व तो इतका शीघ्र संपादला कीं त्यास इतिहासांत तोडही मिळणार नाहीं !

आपल्या दोस्तांनीं आपणास अवेळीं सोडून जाऊं नये म्हणून जर्मनीनें स्वत:वर आणीबाणीचा प्रसंग आला असतांही अत्यंत स्वार्थत्याग-पूर्वक त्यांस परोपरीनें मदत केली होती. पण शेवटीं गेल्या शरद् ऋतूंत दोस्त राष्ट्रांनीं सर्व आघाड्यांवर एकदम तीव्रतर आघात करण्यास प्रारंभ करतांच केवळ सप्टेंबर ३० ते नोव्हेंबर ३ सन १९१८ च्या केवळ ४० दिवसांच्या अवधींत जर्मनीच्या साऱ्या मित्रराष्ट्रांस एकामागून एक

बिनशर्त शरण येणें भाग पडलें. ऑस्ट्रियाची वाताहत उडते न उडते तोंच एका आठवड्यांत खुद्द जर्मन आरमारानेंच कील येथें बंड केलें. साऱ्या जर्मनीभर राज्यक्रांतीची लाट उसळली. एकामागून एक संस्थानिकांस व सम्राटांस पदच्युत व्हावें लागलें. खुद्द केसर बादशाहा व जर्मन युवराज हॉलंडमध्यें पळून गेले, व जो जर्मन सेनासागर केवळ अजिंक्य असल्याबद्दल साऱ्या जर्मनीस पूर्वी खात्री वाटत होती त्याचा अगदींच चुराडा न व्हावा म्हणून युद्धतहकुबी मिळविण्यास जर्मन सेनापति इतके उत्सुक झाले कीं त्यांनीं दोस्तराष्ट्रांनीं आपल्यावर लादिलेल्या साऱ्या शर्ती केवळ ७२ तासांच्या अवधींत निमूटपणें मान्य केल्या !

इतका सत्वर युद्धाचा शेवट होईल हें वर वर पाहाणारांचे कधीं स्वप्नींही आलें नसेल. पण दोस्त राष्ट्रांचे मुत्सद्दी व त्यांचे लष्करी आणि आरमारी सल्लागार यांस शत्रुराष्ट्रांमध्यें ज्या प्रचंड क्रांति होत होत्या त्यांची पूर्ण जाणीव होती यांत शंका नाहीं.

या गोष्टीची कल्पना येण्यासाठीं १९१८ च्या प्रारंभीं काय स्थिति होती हें पाहिलें पाहिजे. १९१६ सालाच्या फेब्रुवारीपासून जूनपर्यंत व्हर्डूनवर केलेल्या चढाईनंतर सबंध १॥ वर्षांत जर्मन सेनापतींस पश्चिम रणांगणांत पुन्हां कोठें चढाई करतां आली नव्हती; त्यांस या अवधींत बचावाचें धोरण स्वीकारून स्वस्थ बसावें लागलें होतें. पण १९१८ च्या प्रारंभीं ही स्थिति बदलली. रशियांतील बोल्शेव्हिक सरकारच्या कर्तव्यपरायणतेमुळें जर्मन सेनापतींस पश्चिम रणांगणावर इतकी मोठी सैन्यभरती करतां आली कीं त्यांस यावेळीं दोस्तराष्ट्रांविरुद्ध चढाई करण्याचें सामर्थ्य प्राप्त झालें. यापूर्वीं पूर्व रणांगणावर आणि इटलीमध्यें त्यांनीं अनेक विजय मिळविले होते, यामुळें त्यांस याही वेळीं विजय मिळण्याची खात्री वाटली होती; परंतु जर्मनीस विजय मिळवितां आला तर तो शक्य तितका त्वरित मिळावयास पाहिजे

जी मागणी केली तिनें माझें अंतःकरण अतिशय भरलें असून यांच्या व माझ्या अंतःकरणास सतत निगडित करणारा भक्ति व प्रेमरज्जु आज दृढतर झाला आहे. या गोष्टीचा परिणामही फारच मोठा होणार आहे. १९१२ सालीं दिल्लीचा थाटाचा राज्यारोहण-समारंभ आटोपून परत जाते समयीं माझें अभिनंदन करतांना हिंदुस्थान देशानें ब्रिटिश राष्ट्रास आपली सदिच्छा व मित्रभाव यांचा द्योतक जो संदेश पाठविला त्याचें मला या समयीं स्मरण होतें. या दोन्ही देशांचें भवितव्य परस्परांशीं कायमचें संलग्न झालें असल्याबद्दल तुम्हीं जें आश्वासन दिलें त्याची आज परिपूर्णता झाली असल्याचेंही मला आढळून येत आहे. ”

---

प्रकरण बारावें

## युद्धाचा शेवट व भावी परिणाम

हें जगड्व्याळ युद्ध प्रारंभीं जितक्या त्वरेनें उद्भवलें तितक्याच त्वरेनें तें अचानक थांबलें. युद्धाची मुळींच तयारी नसतां व युद्ध करण्याची इच्छा नसतां ज्यांस शत्रूनें युद्धांत खेचलें, त्या दोस्त राष्ट्रांचाच अंतीं पूर्ण विजय झाला ! परिणामीं सत्यानेंच आसुरी बलावर विजय संपादला, व तो इतका शीघ्र संपादला कीं त्यास इतिहासांत तोडही मिळणार नाहीं !

आपल्या दोस्तांनीं आपणास अवेळीं सोडून जाऊं नये म्हणून जर्मनीनें स्वतःवर आणीबाणीचा प्रसंग आला असतांही अत्यंत स्वार्थत्यागपूर्वक त्यांस परोपरीनें मदत केली होती. पण शेवटीं गेल्या शरद् ऋतूंत दोस्त राष्ट्रांनीं सर्व आघाड्यांवर एकदम तीव्रतर आघात करण्यास प्रारंभ करतांच केवळ सप्तेंबर ३० ते नोव्हेंबर ३ सन १९१८ च्या केवळ ४० दिवसांच्या अवधींत जर्मनीच्या साऱ्या मित्रराष्ट्रांस एकामागून एक

बिनशर्त शरण येणें भाग पडलें. ऑस्ट्रियाची वाताहत उडते न उडते तोंच एका आठवड्यांत खुद्द जर्मन आरमारानेंच कील येथें बंड केलें. साऱ्या जर्मनीभर राज्यक्रांतीची लाट उसळली. एकामागून एक संस्था-निकांस व सम्राटांस पदच्युत व्हावें लागलें. खुद्द केसर बादशाहा व जर्मन युवराज हॉलंडमध्यें पळून गेले, व जो जर्मन सेनासागर केवळ अजिंक्य असल्याबद्दल साऱ्या जर्मनीस पूर्वी खात्री वाटत होती त्याचा अगदींच चुराडा न व्हावा म्हणून युद्धतहकुबी मिळविण्यास जर्मन सेनापति इतके उत्सुक झाले कीं त्यांनीं दोस्तराष्ट्रांनीं आपल्यावर लादिलेल्या साऱ्या शर्ती केवळ ७२ तासांच्या अवधींत निमूटपणें मान्य केल्या !

इतका सत्वर युद्धाचा शेवट होईल हें वर वर पाहाणारांचे कधीं स्वप्नींही आलें नसेल. पण दोस्त राष्ट्रांचे मुत्सद्दी व त्यांचे लष्करी आणि आरमारी सल्लागार यांस शत्रुराष्ट्रांमध्यें ज्या प्रचंड क्रांति होत होत्या त्यांची पूर्ण जाणीव होती यांत शंका नाहीं.

या गोष्टीची कल्पना येण्यासाठीं १९१८ च्या प्रारंभीं काय स्थिति होती हें पाहिलें पाहिजे. १९१६ सालाच्या फेब्रुवारीपासून जूनपर्यंत व्हर्डूनवर केलेल्या चढाईनंतर सबंध १॥ वर्षांत जर्मन सेनापतींस पश्चिम रणांगणांत पुन्हां कोठें चढाई करतां आली नव्हती; त्यांस या अवधींत बचावाचें धोरण स्वीकारून स्वस्थ बसावें लागलें होतें. पण १९१८ च्या प्रारंभीं ही स्थिति बदलली. रशियांतील बोल्शेव्हिक सरकारच्या कर्तव्यपरायणतेमुळें जर्मन सेनापतींस पश्चिम रणांगणावर इतकी मोठी सैन्यभरती करतां आली कीं त्यांस यावेळीं दोस्तराष्ट्रांविरुद्ध चढाई करण्याचें सामर्थ्य प्राप्त झालें. यापूर्वी पूर्व रणांगणावर आणि इटलीमध्यें त्यांनीं अनेक विजय मिळविले होते, यामुळें त्यांस याही वेळीं विजय मिळण्याची खात्री वाटली होती; परंतु जर्मनीस विजय मिळवितां आला तर तो शक्य तितका त्वरित मिळावयास पाहिजे

होता; कारण, ब्रिटिश आरमारानें केलेला कोंडमारा एकसारखा दृढतर होत चालल्यामुळें एकट्या जर्मनीसच नव्हे तर साऱ्या मध्ययुरोपियन राष्ट्रांची सर्व दृष्टींनीं अत्यंत शोचनीय स्थिति झाली होती. तेथील सर्व लोकांस अन्न अगदीं मोजकें मिळत होतें, कित्येक पदार्थ तर दृष्टीसही पडत नव्हते, सर्पणाचा दुष्काळ पडला होता, मजुरांचा फारच तुटवडा भासत होता, आणि सर्व प्रजाजनांची एकंदरींत दैन्यावस्था होऊन गेली होती. अल्पावकाशांत विजय प्राप्त होईल म्हणून व्यर्थ भुलथापा देऊन त्यांचें मन युद्धाकडे वळविण्यांत आलें होतें, आणि शत्रूंकडून अपार खंडणी उकळण्याचें आमिष दाखवून त्यांकडून स्वार्थत्यागाची पराकाष्ठा करविण्यांत आली होती. पण युद्धास सुरवात होऊन जवळ जवळ चार वर्षें होत आलीं तथापि यांतील एकही वचन पुरें होण्याचें चिन्ह दिसेना, आणि इकडे तर लोकांच्या हालअपेष्टा हरघडी वृद्धिंगत होत असल्यामुळें सर्वत्र असंतोष वाढत असल्याचें अगदीं स्पष्ट दिसूं लागलें. हा असंतोष नष्ट करण्यासाठीं जर्मनीला शत्रूंवर ताबडतोब प्रहार करणें जरूर होतें, कारण ब्रिटिश आरमारास जर्मन पाणबुड्यांची किंमत वाटेनाशी होऊन दर आठवड्यास त्याच्या संरक्षणछत्राखालीं अमेरिकनांचें अफाट सैन्य एकसारखें फ्रान्समध्यें येऊन उतरत होतें.

या महायुद्धांतील सर्वांत भयंकर आणि अत्यंत निकराचा हल्ला २१ मार्च सन १९१८ रोजीं शत्रूकडून ब्रिटिश सैन्यावर करण्यांत आला. ब्रिटिश सैन्यास मागें रेटून समुद्रांत बुडवावें आणि पॅरिसचा रस्ता खुला करावा हा या हल्ल्याचा हेतु होता; परंतु ब्रिटिश वैमानिकांनीं मागील हिंवाळ्यांत सारखी टेहेळणी करून शत्रूची तयारी कसकशी चालली आहे याची काळजीपूर्वक बिनचूक माहिती मिळविली असल्यानें शत्रूचे बेत विफल करण्यासाठीं आणि ब्रिटिश व फ्रेंच व्यूहरेषेमधून

घुसूं पाहणाऱ्या १५ लक्ष प्रचंड जर्मन सेनेचा संहार करण्यासाठीं शक्य ती तरतूद आगाऊ दोस्तांकडून करण्यांत आली होती. जर्मनीच्या भगीरथ प्रयत्नांपैकीं पहिला प्रयत्न तारीख २८ मार्च रोजीं थंड पडला. या हल्ल्यांत ब्रिटिशांची फार मोठी प्राणहानि झाली पण त्या मानानें जर्मनांचा संहार अतिशयच झाला. या वेळीं ब्रिटिश सैनिकांच्या क्षात्रतेजामुळें पॅरिसचा दुसऱ्यानें बचाव झाला, आणि संयुक्तांची व्यूहरेषा कांहीं मागें सरली तरी ती पूर्ववत् अविच्छिन्न राहिली. पुढील चार महिन्यांत जर्मनांनीं आणखी चार हल्ले केले. या चार महिन्यांपैकीं दोन महिने त्यांनीं आपल्या हतवीर्य झालेल्या सैन्याची पुन्हां घडी बसविण्यांत खर्चले. या हल्ल्यांत त्यांनीं संयुक्तांची व्यूहरेषा तीन ठिकाणीं भेदून त्यांच्या रेषेवर तीन मोठीं लांबरुंद लवणें उत्पन्न केलीं. परंतु ज्याबद्दल त्यांनीं आपल्या सैन्याची इतकी असंख्यात प्राणहानि सोशिली तो त्यांचा हेतु म्हणजे परिणामींचा व शीघ्र विजय त्यांस मिळवितां आला नाहीं. जर्मन लोकांनीं सैनिकांच्या घनदाट रांगा करून हल्ले केल्यामुळें त्यांचें जसें कल्पनातीत नुकसान झालें तसें संयुक्तांचें झालें नाहीं. संयुक्तांनीं बचावाचें धोरण स्वीकारून व आपल्या सैन्याचा फार बेताबातानें उपयोग करून आपली फारशी हानि होऊं दिली नाहीं, यामुळें त्यांचें बरेंच सैन्यबल शिल्लक राहिलें, व त्यांत अमेरिकेंतून येणाऱ्या सैन्याची एकसारखी भर पडत जाऊन तें उलट पुष्कळच वाढलें. जर्मनांनीं समुद्रावर व भूमीवर केलेल्या अत्याचारांचा सूड घेण्यास उत्सुक असलेले तरुण, बळकट, व सुशिक्षित असे जवळ जवळ वीस लक्ष अमेरिकन सैनिक १९१८ च्या जुलैपर्यंत पश्चिम रणांगणावर येऊन दाखल झाले आणि त्यांपैकीं बऱ्याच लोकांनीं पिकार्डी, फ्लँडर्स आणि शँपेन येथील लढायांत आपल्या ब्रिटिश व फ्रेंच दोस्तांच्या खांद्याशीं खांदा लावून शत्रूशीं लढाई केली.

ऑगस्टपर्यंत जर्मनांचें बहुतेक सारें शिलकी सैन्य खलास होईल असा फ्रेंच सेनापतींनीं अंदाज बांधिला होता. शिवाय, पुष्कळ स्थानिक लढायांमध्यें संयुक्तांच्या सेनापतींनीं गेल्या मार्च महिन्यापासून गमावलेल्या प्रदेशापैकीं कांहीं भाग पुन्हां जिंकून घेतला होता. आणि शेवटीं जूनमध्यें पिआव्ह नदीवर ऑस्ट्रियाचा अत्यंत मोठा पराभव झाला तेव्हां इटॅलियन सरहद्दीसंबंधाची फ्रान्सची काळजी एकदम नाहींशी झाली, व या उप्पर ऑस्ट्रियाच्या मोठ्या सैन्याच्या मदतीची आशाच करावयास नको हें जर्मनांस स्पष्ट दिसून आलें.

आतां आपणांस जय मिळण्याचा संभव उरला नाहीं हें अनेक प्रकारें दिसून आलें असतांही जर्मनांनीं १५ जुलै १९१८ रोजीं फ्रेंच रणांगणावरील आपला शेवटचा मोठा हल्ला चढविला. यावेळीं त्यांनीं आपल्या सैनिकांस व लोकांस आणखी एकदां आश्वासन दिलें कीं या चढाईनें हां हां म्हणतां युद्धाचा निकाल लागेल, आणि आपल्या मताप्रमाणें तह करण्यास शत्रूस भाग पाडितां येईल. परंतु प्रारंभापासूनच या हल्ल्यांत प्राणहानि होऊन शत्रूंच्या पदरीं अपयश येऊं लागलें. या चढाईत जर्मनांस विशेषशी प्रगति करतां आली नाहीं हें तर राहोच, पण सैनिक, विमानें, व तोफा या तीनही बाजूंनीं त्यांची हानि होऊन ते मोठ्या संकटांत सांपडले. आणि यापुढें तीनच दिवसांनीं दोस्तांनीं व्यवस्थित रीतीनें चढविलेल्या फेरहल्ल्यामुळें जर्मनांस पिछेहाट करण्याचा प्रसंग येऊन त्यांनीं २७ मे १९१८ रोजीं केलेल्या शँपेन मधील चढाईंत मिळविलेला सारा मुलूख सोडून त्यांस पलीकडे जावें लागलें.

अशा प्रकारें १८ जुलै रोजीं संयुक्तांनीं केलेल्या आश्चर्यकारक चढाईस सुरुवात झाली. ही चढाई मध्यंतरीं मुळींच न मंदावतां समुद्राच्या भरतीप्रमाणें सारखी वृद्धिंगत होऊन संपूर्ण पश्चिम रणांगणभर पसरली;

इतकेंच नव्हे, तर बाल्कन प्रदेश, पॅलेस्टाइन, मेसॉपोटेमिया आणि इटली या सर्व देशांत ती एकसमयावच्छेदेंकरून सुरू झाली. या चढाई-मुळें ११४ दिवसपर्यंत सारें जग विस्मयचकित होऊन गेलें, व त्यास आपल्या भवितव्यतेबद्दल नव्यानें आशा वाटूं लागली. आणि शेवटीं शत्रूचे सुमारें १० लक्ष सैनिक पाडाव होऊन १२ हजारांवर तोफा हस्तगत झाल्यावर मध्यवर्ती राष्ट्रांच्या पूर्ण पराजयांत तिचें पर्यवसान झालें.

या मोहिमेंतील अनेक गोष्टी येथें नमूद करण्याजोग्या आहेत. केवळ सहा आठवड्यांचे अवधींत १९१६ सालीं जर्मनांनीं जिंकिलेल्या साऱ्या प्रदेशांतून त्यांस दोस्त राष्ट्रांनीं मागें हाकून लाविलें व आपली पूर्वींची मार्च महिन्यांतील सरहद्द पुन्हां गांठिली. आपलें थकलेलें सैन्य पुन्हा स्थिर होऊन शत्रूंस थोपवून धरूं शकेल, आणि ज्या व्यूहरेषेइतकी मजबूत व्यूहरेषा आजपर्यंत कोणत्याही युद्धांत तयार करण्यांत आली नव्हती त्या प्रख्यात हिंडेनबुर्ग रेषेवर हिंवाळ्यांत तळ देऊन आप-णांस स्वसंरक्षण करतां येईल, ही जर्मनांची आशाही अगदींच थोडे दिवस टिकली.

ज्याच्या अद्भुत सेनानायकत्वामुळें या महायुद्धास नवीनच वळण लागलें तो मार्शल फॉक यावेळीं जर्मनांस मुळींच उसंत मिळूं देत नव्हता. त्यानें चालविलेले प्रहार आतां एकावर एक इतक्या जलदीनें आणि इतक्या नेमानें बसूं लागले कीं त्यांपुढें गेल्या दोन तीन वर्षांत अत्यंत काळजीनें तयार केलेल्या व्यूहरेषांचें कांहीं थोडे दिवसांपली-कडे संरक्षण करणें अशक्य झालें. या प्रसंगीं ऑस्ट्रियाकडून किंवा पूर्व रणांगणावरून सैन्याची मोठी कुमक आली असती तरच जर्म-नीचा पराभव कांहींसा लांबणीवर पडला असता; पण तशी मदत त्यांस मुळींच मिळाली नाहीं.

प्रथम दोस्तराष्ट्रांची चढाई पश्चिम रणांगणाच्यां केवळ मध्यभागींच सुरू होती. पण १२ सतेंबर १९१८ रोजीं अमेरिकनांनीं व्हर्डूनच्या दक्षिणेस निकराचा हल्ला चढवून मेट्झचा मजबूत किल्ला व शत्रुसैन्याच्या संरक्षणास उपयोगी पडणारा दळणवळणाचा मार्ग यांस शह दिल्यानंतर ती चढाई उत्तर समुद्रापासून इराणच्या सरहद्दीपर्यंतच्या अतिविस्तीर्ण आघाडीवर निरनिराळ्या भागांत एकसमयावच्छेदानें सुरू झाली; आणि बल्गेरिया, तुर्कस्थान व ऑस्ट्रिया ह्या राष्ट्रांस फ्रान्सांतील दोस्त सैन्यानें चालविलेल्या जर्मनांच्या गळेचेपींतून त्यांचा बचाव करावयास सैनिक किंवा तोफा पाठविण्याची ताकत राहिली नाहीं, इतकेंच नव्हे, तर त्यांची स्वतःचीच इतिश्री होण्याचा समय येऊन ठेपला.

यापुढें दोस्तांनीं अत्यंत आश्चर्यकारक रीतीनें केलेल्या चार मोहिमांनीं एकेका आठवड्याचे आंत या फशीं पडलेल्या राष्ट्रांचा निकाल लाविला. या राष्ट्रांच्या सैन्यांनीं कोठें एक तर कोठें दोन दिवस कसा बसा प्रतिकाराचा प्रयत्न केला, पण त्यानंतर त्यांचें पुन्हां डोकें वर होणार नाहीं अशा रीतीनें त्यांचा चुराडा उडाला. या शत्रूंपैकीं प्रत्येक राष्ट्राचें बरेंच मोठें सैन्य पकडून कैद करण्यांत आलें, आणि त्यांस दोस्तांना शरण येणें भाग पडून दोस्तराष्ट्रें सांगतील त्या अटी त्यांस मान्य कराव्या लागल्या.

ता. ३० सप्टेंबर रोजीं बल्गेरिया शरण आला. पुढें एक महिन्यानें जेव्हां जनरल ॲलनबीनें अलेपो काबीज केलें आणि जनरल मार्शल यानें मोसल शहरांत प्रवेश केला तेव्हां म्हणजे ३१ ऑक्टोबर रोजीं तुर्कस्थान शरण आलें. वरील दोघां सेनापतींनीं केलेल्या संयुक्त चढाईस तोंड देण्याला तुर्कांपाशीं सैन्यच उरलें नव्हतें. याच सुमारास पिआव्ह नदीतटाकीं ऑस्ट्रियावर इटॅलियनांनीं हल्ला चढविला तेव्हां ऑस्ट्रियनांचा या युद्धांत अभूतपूर्व असा नाश झाला. केवळ चार

पांच दिवसांच्या अवधींत त्यांचे ८ लक्ष सैनिक व पांच हजार तोफा दोस्तांच्या हातीं सांपडल्या; तेव्हां त्या राष्ट्रानेंही युद्धतहकुबीची याचना केली, व ती ता० ३ नोवेंबर १९१८ रोजीं मान्य करण्यांत आली.

आतां जर्मनांची पाळी येऊन ठेपली. त्यांस एकट्यांसच फार दिवस युद्ध सुरू ठेवणें शक्य नव्हतें. इटॅलियन सैन्य व बाल्कन प्रदेशांतील संयुक्तांचें सैन्य आतां एकवटून त्यास ऑस्ट्रियांतून बिनधोकपणें घुसून जर्मनीच्या दक्षिण सरहद्दीवर येऊन थडकण्याचा मार्ग खुला झाल्यामुळें जर्मनीस त्या बाजूनें नवी भीति उत्पन्न झाली. इतकेंच नव्हे, तर पश्चिम रणांगणावर दर आठवड्यास त्यांस जास्त जास्त माघार घ्यावी लागली. ऑक्टोबरचे प्रारंभींच इंग्लिश खाडींतील झीब्रुज व ऑस्टेंड हीं बंदरें त्यांचे हातून जाऊन पाणबुड्यांच्या साहाय्यानें संयुक्तांचें बल कमी करण्याची त्यांची आशा पार विलयास गेली ९ ऑक्टोबर १९१८ रोजीं फ्रेंच व अमेरिकन सैन्य सेडन येथें जाऊन थडकलें, व त्यामुळें १८७० सालीं झालेल्या तिसऱ्या नेपोलियनच्या पराभवाचें परिमार्जन झालें. दुसऱ्याच दिवशीं बेल्जन लोकांनीं घेंट शहरांत प्रवेश केला. अमेरिकन सैन्य मेट्झ पासून अगदीं थोड्या मैलांवर येऊन थडकलें, आणि युद्धाच्या प्रारंभीं ज्या ठिकाणीं ब्रिटिशांनीं पराक्रमाची शर्थ करून शत्रूस थोपवून धरलें होतें त्या मॉन्स ठाण्या-नजीक ब्रिटिशसैन्य येऊन भिडलें. आणखी तीन आठवडे असेंच युद्ध चालू राहातें, तर जर्मनांचा प्रत्यक्ष रणांगणावर पूर्ण पराजय झालेला आपणांस दिसला असता. पण ता० ११ नोवेंबर रोजीं जर्मनीच्या प्रतिनिधींनीं युद्धतहकुबीची याचना करून दोस्त राष्ट्रांनीं घातलेल्या कडक अटी मान्य केल्या. पुढें लवकरच ऱ्हाईन नदीच्या कांठचे प्रचंड जर्मन किल्ले एकही गोळा उडविल्याशिवाय ताब्यांत घेण्यासाठीं दोस्तांच्या विजयी सैन्यानें जर्मनीकडे चाल सुरू केली. आणि ता० २१ नोवेंबर

रोजीं सारें जर्मन आरमार नाक मुठींत धरून ॲडमिरल बिॲटी यास शरण आलें.

अशा रीतीनें जगावर आलेलें आजपर्यंतचें सर्वांत मोठें अरिष्ट दूर झालें. हें अतिभीषण महायुद्ध चाललें असतां १५३१ दिवसपर्यंत मृतांस मूठमाती देण्यास देखील अवसर मिळाला नाहीं. या अवधींत सर्व सुधारलेल्या राष्ट्रांनीं ज्या आपत्ति व जे क्लेश भोगिले ते केवळ अवर्णनीय होत. एकट्या ब्रिटिश सैन्यांतीलच अधिकारी व सैनिक मिळून ३,०४९,९९१ इतके लोक कामास आले. यांपैकीं ६५८,७०४ रणांगणांत पडले आणि बाकीचे घायाळ किंवा बेपत्ता झाले. या बेपत्ता झालेल्या लोकांतील सरासरी १८०,००० इसम मृतांतच गणावे लागतील अशी भीति वाटते. याशिवाय आरमार, व्यापारी जहाजें, आणि मच्छीमार होड्यांचे तांडे यांवरील प्राणहानि वेगळीच ! एकंदरींत सुमारें १० लक्ष ब्रिटिश लोक या युद्धांत मृत्युमुखीं पडले ! फ्रान्स, बेल्जम, आणि सर्व्हिया याची हानि तर याहूनही अधिक झाली आहे. आणि शत्रुराष्ट्रांतील लोकसंख्येपैकीं दर ३० त १ त्या राष्ट्रांतील राजकर्त्यांच्या आसुरी महत्त्वाकांक्षेस व सामर्थ्यलोभास बळी पडला आहे. हा एवढा दारुण संहार पाहिल्यावर आतां यापुढें भविष्यत् काळीं तरी असलें युद्ध उद्भवणेंच अशक्य करून टाकावें असा मित्रराष्ट्रांनीं जो संकल्प केला आहे त्याचें आपणांस आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं.

तह झाल्यावर प्रत्यक्ष काय काय घडून येईल हें अद्यापि कोणास पूर्णपणें सांगतां येणें शक्य नाहीं. तथापि कांहीं कांहीं गोष्टी उघड दिसतात. ज्या ध्येयासाठीं मित्रराष्ट्रें इतक्या चिकाटीनें, धैर्यानें, आणि एकोप्यानें लढलीं त्या ध्येयास परिणामीं विजय प्राप्त झाला आहे. मनुष्यजातीच्या सुधारणेंतील अत्युत्तम तत्त्वांसाठीं हें युद्ध झालें. प्रामा-

णिकपणा, दिलेल्या वचनाची चाड, थोरांशीं न्यायानें वागणें, आणि लहानांशीं सौजन्यानें व औदार्यानें वागणें, हीं तीं उदात्त तत्त्वें होत. हीं तत्त्वें म्हणजे भावी जनतेसाठीं मिळवून ठेविलेलें उत्तम धनच होय. याखेरीज आजवर अकल्पित असे अनेक लाभही या युद्धांत आपणांस प्राप्त झाले आहेत. आपण या युद्धांतून पार पडलों ते राष्ट्राराष्ट्रांतील बंधुत्वाची नवी भावना शिकून व आपल्या मित्रराष्ट्रांशीं सलोखा होऊन पार पडलों आहों. तसेंच या युद्धांत ज्या उच्च ध्येयांच्या सिद्ध्यर्थ लक्षावधि वीरांनीं धारातीर्थीं देह ठेविले, आणि लक्षावधि स्त्रियांनीं अत्यंत परिश्रम करून हाडांचीं काडें केलीं, त्यांचा तो देहत्याग आणि ते परिश्रम वायां न जावे म्हणून त्या ध्येयांच्या उत्कर्षासाठीं झटण्याचा निश्चय दृढतर करून आपण ह्या युद्धांतून बाहेर पडलों आहों.

अंतस्थ भेदभावांमुळें मध्यवर्ती राष्ट्रांची सध्या फाटाफूट झाली आहे, पण मित्रराष्ट्रें मात्र संयुक्त राहिलीं आहेत. शत्रुराष्ट्रांत सिंहासनें ढांसळून सरकारें बदलत असतां इकडे मित्रराष्ट्रांत परस्परांमधील करार पाळले जात असून सर्वत्र सुव्यवस्था नांदत आहे. या मित्रराष्ट्रांत लढाई चालू असतांना एकसारखा सलोखा होता; सध्यां शांततेच्या अरुणोदयाचे वेळींही तीं संयुक्तच आहेत; आणि पुढेंही सर्वांचें अंतर्राष्ट्रीय नात्यानें कायमचें बंधुत्व राहावें या उद्देशानें असेंच संयुक्त राहण्याचा त्यांचा मानस आहे.

१६५०